RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष १, अंक ४८] मंगळवार, डिसेंबर ८, २०१५/अग्रहायण १७, शके १९३७ [पृष्ठे १७४ किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/लिगल/२०१५/१०८४.—विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (एच), (आय), (जे), (एल), (एम), (ओ), (वाय), (झेडडी), (झेडइ), (झेडएफ), (झेडजी), (झेडएच) आणि (झेडपी) सह कलम ३६ च्या उप-कलम १ चे परंतुक, कलम ३९ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी)चा उप-खंड (२), कलम ३९ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी) च्या उप-खंड (दोन) चा दुसरा परंतुक, कलम ४०च्या खंड (सी) चा उप-खंड( दोन), कलम ४०च्या खंड (सी) च्या उप-खंड( दोन) चा दुसरा परंतुक, कलम ४१ चा पहिला परंतुक, कलम ५१चा पहिला परंतुक, कलम ६१, कलम ६२चे उप-कलम (२) आणि (५), कलम (६४) चे उप-कलम (१) आणि (३), कलम ६५, आणि कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालीलप्रमाणे विनियम करीत आहे. हे विनियम "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११" ला अधिक्रमित करतील.

**१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ——**

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५" असे म्हणावे.

१.२ हे विनियम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू राहतील.

१.३ हे विनियम, सध्या अस्तित्त्वात असलेल्या आणि भविष्यातील सर्व विद्युत निर्मिती कंपन्या, पारेषण परवानाधारक, वितरण परवानाधारक, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) आणि त्यांचे वारसदार यांना या विनियमांखाली समाविष्ट असलेल्या सर्व प्रकरणी एकूण महसुली गरज, वीज दर आणि एमएसएलडीसीचे शुल्क व आकार निश्चित करण्यासाठी १ एप्रिल २०१६ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत, लागू राहतील.

१.४ हे विनियम शासकीय **राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील :

परंतु असे की, ३१ मार्च, २०१६ पर्यंतच्या कालावधीतील आढावा बाबींसह सर्व प्रयोजनांसाठी, एकूण महसुली गरज आणि वीज दराच्या निश्चितीकरणाच्या संबंधातील बाबींचे नियमन "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५" किंवा "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११" सुधारणांसह, त्यामधील तरतुदींनी, लागू असेल त्याप्रमाणे, करण्यात येईल.

२. **व्याख्या**—

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(१) " **लेखा विवरणपत्र** " म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता, खालील विवरणपत्रे म्हणजेच—

(एक) आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक परवानाप्राप्त किंवा विनियमित व्यवसायाच्या संदर्भात वेगवेगळा तयार केलेला, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेला, ताळेबंद ;

(दोन) आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक परवानाप्राप्त किंवा विनियमित व्यवसायाच्या संदर्भात वेगवेगळा तयार केलेला, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेला, नफा-तोटा लेखा ;

(तीन) आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक परवानाप्राप्त किंवा विनियमित व्यवसायाच्या संदर्भात वेगवेगळे तयार केलेले, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेले, रोकड आवक विवरणपत्र ;

(चार) कंपनी अधिनियम, १९५६ किंवा कंपनी अधिनियम, २०१३ मध्ये, लागू असेल त्याप्रमाणे, समाविष्ट असलेल्या नमुन्यानुसार तयार केलेला ताळेबंद ;

(पाच) कंपनी अधिनियम, १९५६ किंवा कंपनी अधिनियम, २०१३ मध्ये, लागू असेल त्याप्रमाणे, समाविष्ट असलेल्या आवश्यकतांची पूर्तता करणारे नफा आणि तोटा पत्रक ;

(सहा) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या लागू असलेल्या लेखा मानकांनुसार तयार करण्यात आलेले रोकड आवक (कॅश फ्लो) विवरणपत्र ;

(सात) वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल ;

(आठ) एक कंपनी म्हणून असलेला संस्थेचा एकूण खर्च, महसूल, मत्ता आणि दायित्वे आणि आयोगाने विनियमित केलेल्या आणि विनियमित न केलेल्या प्रत्येक व्यवसायाच्या कामकाजाचा खर्च, महसूल, मत्ता आणि दायित्वे यांच्यामधील ताळमेळ दाखविणारे, वैधानिक लेखापरीक्षकांनी उचितपणे प्रमाणित केलेले, ताळमेळ विवरणपत्र ;

(नऊ) कंपनी अधिनियम, १९५६ किंवा कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत, लागू असेल त्याप्रमाणे, केंद्र शासनाने विहित केलेले खर्चाचे अभिलेखे ;

यासह त्यासंबधीच्या टिपण्या व आयोग वेळोवळी निर्देश देईल त्यानुसार इतर पुष्टी देणारी विवरणपत्रे व माहिती :

परंतु असे की, परवान्याच्या अटींनुसार प्रत्येक परवानाप्राप्त व्यवसाय आणि प्रत्येक विनियमित व्यवसायासाठी वेगवेगळी लेखा विवरणपत्रे तयार करून आयोगाला सादर करण्यात येतील :

परंतु आणखी की, परवान्याच्या अटींनुसार प्रत्येक परवानाप्राप्त व्यवसायासाठी आणि प्रत्येक विनियमित व्यवसायासाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून वेगवेगळी लेखा विवरणपत्रे सादर करण्यात आली नाहीत तर, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांनी दाखल केलेल्या याचिका, याचिकाकर्त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयोगाकडून फेटाळल्या जाऊ शकतील :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी लेखा विवरणपत्रांसह वैधानिक लेखापरीक्षकाचे अभिप्राय, निरीक्षणे आणि लेख्यांवरील टिपण्या सादर करतील आणि त्यासोबत वैधानिक लेखापरीक्षकांनी अधोरेखित केलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांचा सारांश आणि असे प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील जोडण्यात येईल :

परंतु असेही की, स्थानिक प्राधिकरणातर्फे वीज वितरणाचा व्यवसाय करण्यात येत असल्यास, लेखा विवरणपत्रे यांचा अर्थ अशा स्थानिक प्राधिकरणाने, त्यास लागू असलेल्या संबंधित अधिनियम किंवा संविधीनुसार, वर उल्लेखलेल्या बाबींच्या संदर्भात तयार केलेली व ठेवलेली माहिती :

परंतु असेही की, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) जोपर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडचा भाग असेल तोपर्यंत एमएसएलडीसीकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला वेगळी लेखा पुस्तके ठेवावी लागतील आणि ही लेखा पुस्तके वैधानिक लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करून घ्यावी लागतील ;

(२) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६), वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह ;

(३) **"एकूण महसुली गरज"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा एमएसएलडीसीशी संबंधित महसुली गरजेमध्ये अनुज्ञेय खर्च आणि भांडवलावरील परतावा समाविष्ट असतील व ही महसुली गरज या विनियमांतील तरतुदींनुसार वीज दरातून किंवा शुल्क व आकारांतून वसूल करावयाची असते ;

(४) **"वाटप विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षासाठी, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक त्यांच्या मत्तांच्या इष्टतम वापरासाठी करीत असलेल्या प्रत्येक अन्य व्यवसायाच्या संबंधातील एक विवरणपत्र, ज्यामध्ये कोणत्याही महसूल, खर्च, मत्ता, दायित्व, राखीव निधी किंवा तरतूद, इ. ची रक्कम दाखविलेली असते, जी अशा प्रत्येक अन्य व्यवसायांमध्ये, त्या आकाराच्या आधाराच्या तपशीलासह खर्ची घातलेली असते ; किंवा निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये विभाजन किंवा वाटणीद्वारे, विभाजन किंवा वाटणीच्या आधाराच्या तपशीलासह, निश्चित करण्यात आलेली असते :

परंतु असे की, या विनियमांच्या प्रयोजनासाठी, एखाद्या पुरवठ्याच्या क्षेत्रासाठी वितरण परवानाधारकाचा परवानाप्राप्त व्यवसाय हा वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसायामध्ये विभागण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निर्मिती केंद्राचा मालक वितरण परवानाधारक असल्यास आणि/किंवा त्याची देखभाल आणि/किंवा संचालन करीत असल्याच्या संबंधात असे वाटप विवरणपत्र अशा रीतीने तयार करण्यात येईल की, जेणेकरून वीज दराचे निश्चितीकरण टप्पा-निहाय, संच-निहाय आणि/किंवा संपूर्ण निर्मिती केंद्रासाठी करता येणे शक्य होईल ;

(५) **"वाटप केलेली क्षमता"** या संज्ञेचा अर्थ आयोगाने पारेषण मुक्त प्रवेश किंवा वितरण मुक्त प्रवेशासाठी लागू असलेले नियमन करण्यासाठी केलेल्या विनियमांमध्ये नमूद केलेल्या व्याख्यांनुसार ;

(६) **"लेखापरीक्षक"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने नियुक्त केलेला लेखापरीक्षक, जो अशा नियुक्तीसाठी कंपनी अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार, अर्हताप्राप्त असेल ;

(७) **"सहाय्यकारी ऊर्जा वापर"** निर्मिती केंद्र/संचाच्या बाबतीत एका ठराविक कालावधीच्या संबंधात, सहाय्यकारी ऊर्जा वापर म्हणजे, त्यांच्या सहाय्यकारी उपकरणांनी, जसे की - निर्मिती केंद्राचे स्विचयार्डसह आणि निर्मिती केंद्रातील पारेषण हानिसह, संयत्र आणि मशीनरी चालविण्यासाठी वापरण्यात येत असणाऱ्या उपकरणांनी वापरलेले ऊर्जेचे परिमाण होय आणि ते विद्युत निर्मिती केंद्राच्या सर्व संचांच्या जनरेटर टर्मिनल्सनी निर्माण केलेल्या एकूण ऊर्जेच्या बेरजेच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येईल :

परंतु असे की, त्यामध्ये निर्मिती केंद्रातील कर्मचारी निवासाच्या वसाहतीसाठी आणि अन्य सुविधांसाठी पुरविलेली वीज आणि निर्मिती केंद्राच्या ठिकाणी बांधकामासाठी वापरलेल्या विजेचा समावेश करण्यात येणार नाही ;

(८) (ए) **"उपलब्धता"** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र/संचाच्या संबंधी कोणत्याही कालावधीकरिता उपलब्धता म्हणजे त्या कालावधीतील सर्व दिवसांकरिता एमएसएलडीसीने प्रमाणित केल्यानुसार दैनंदिन सरासरी घोषित क्षमतांची सरासरी जी, विद्युत निर्मिती केंद्र/संचाच्या स्थापित क्षमतेमधून, या विनियमांत विनिर्दिष्ट केल्यानुसार, मेगावॅटमधील प्रमाणकानुसार (normative) सहाय्यकारी वापर वजा केल्यावर येणाऱ्या वजाबाकीच्या टक्केवारीत, व्यक्त करण्यात येईल व तिची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :—

$$\text{उपलब्धता} = 100x \sum_{i=1}^{N} DC_i / \{N \times IC \times (1 - AUX_n)\}\%$$

जेथे - N = दिलेल्या कालावधीतील काल-गटांची संख्या.

DC = अशा कालावधीतील $i^{th}$ काल-गटासाठी मेगावॅटमधील सरासरी घोषित क्षमता.

IC = विद्युत निर्मिती केंद्र/संचाची मेगावॅटमधील स्थापित क्षमता.

AUX = मेगावॅटमधील प्रमाणानुसार सहाय्यकारी वापर, जो एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येतो.

(बी) **"उपलब्धता"** पारेषण यंत्रणेच्या संबंधी एका ठराविक कालावधीसाठी उपलब्धता म्हणजे त्या कालावधीतील तासांमधील वेळ, ज्यामध्ये पारेषण यंत्रणा तिच्या प्रमाणित दाबाने विजेचे पारेषण करू शकते, जी त्या ठराविक कालावधीतील एकूण तासांच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येते व जिची परिगणना या विनियमांतील **जोडपत्र – २** मधील तरतुदींनुसार करण्यात येईल ;

(९) **"संतुलन व हिशोबपूर्तीची संहिता (Balancing and Settlement Code)"** म्हणजे आयोगाने किंवा आयोगाच्या मान्यतेने एमएसएलडीसीने ठरवून दिलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता ज्यानुसार महाराष्ट्र राज्यांतील ग्रिडचा वापर करणाऱ्यांच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये आवश्यक अशी देवाणघेवाण करण्यात येईल व त्यांच्या करारांतर्गत ऊर्जा व प्रत्यक्ष वापरलेली ऊर्जा यांच्यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यात येईल ;

(१०) **"आधारभूत (बेस) दर"** म्हणजे भारतीय स्टेट बँकेने वेळोवेळी जाहीर केलेला त्याचा आधारभूत (बेस) दर;

(११) **"लाभधारक"** म्हणजे,—

(ए) निर्मिती केंद्राच्या संबंधात ज्या निर्मिती केंद्राचे विजेचे दर या विनियमांनुसार निश्चित करण्यात येतात अशा केंद्रातून विजेची खरेदी करणारा खरेदीदार ;

(बी) पारेषण परवानाधारकाच्या संबंधात, पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता ;

(सी) वितरण वायर्स व्यवसायाच्या संबंधात, वितरण यंत्रणेला जोडलेल्या निर्मिती कंपन्या आणि ग्राहक ;

(डी) किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाच्या संबंधात, ग्राहक ;

(इ) एमएसएलडीसीच्या संबंधात, वितरण परवानाधारक आणि मुक्त प्रवेश ग्राहक, जे विजेच्या पारेषणासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करतात आणि/किंवा विजेच्या वहनासाठी राज्यातील परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर करतात आणि/किंवा शेड्युलिंग आणि रिअल टाइम ग्रिडचे प्रचालन, राज्यातील ऊर्जेचे हिशोब ठेवणे, पूल लेख्यांचे प्रचालन, इ. च्या संबंधात एमएसएलडीसीच्या सेवेचा लाभ घेतात ;

(१२) **"गट (ब्लॉक)"** कम्बाइन्ड सायकल औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात गट म्हणजे ज्यामध्ये Combustion turbine- generators, associated waste heat recovery boilers, connected steam turbine-generators and auxiliaries, यांचा समावेश होतो ;

(१३) **"ठोक वीज पारेषण करार"** म्हणजे केलेला असा करार की ज्यातील अटी व शर्तींनुसार पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश करण्याचा, हक्क प्राप्त होतो ;

(१४) **"कायद्यातील बदल"** म्हणजे खालीलपैकी कोणतीही घटना घडणे होय :—

(ए) कोणताही नवीन भारतीय कायदा अधिनियमित करणे, अंमलात आणणे किंवा घोषित करणे ; किंवा

(बी) कोणत्याही विद्यमान भारतीय कायद्याची स्वीकृती, सुधारणा, फेरबदल, रद्द करणे, किंवा पुन्हा अधिनियमित करणे ; किंवा

(सी) सक्षम न्यायालय, न्यायाधिकरण किंवा भारतीय शासकीय संस्था (instrumentality) यांनी, जे अशी अर्थनिश्चिती किंवा वापर करण्यासाठी कायद्यांतर्गत अंतिम प्राधिकरण असेल, कोणत्याही भारतीय कायद्याच्या अर्थनिश्चितीमध्ये किंवा वापरामध्ये केलेला बदल ; किंवा

(डी) प्रकल्पासाठी उपलब्ध असलेली किंवा प्राप्त केलेली कोणतीही संमती किंवा परवानगी किंवा मान्यता किंवा परवान्याच्या कोणत्याही अटीमध्ये किंवा प्रसंविदेमध्ये कोणत्याही सक्षम वैधानिक प्राधिकरणाने केलेला बदल ; किंवा

(इ) भारत सरकार आणि अन्य कोणतेही सार्वभौम सरकार यांच्यामध्ये कोणताही द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय करार/तह अंमलात येण्यामुळे किंवा त्यामध्ये बदल होण्यामुळे या विनियमांतर्गत विनियमित होत असलेल्या निर्मिती केंद्र किंवा पारेषण यंत्रणेवर होणारे परिणाम ; किंवा

(एफ) केंद्र किंवा कोणत्याही राज्य शासनाने लावलेल्या कोणत्याही कर किंवा शुल्कातील बदल किंवा लागू केलेले कोणतेही नवीन कर किंवा शुल्क ;

(१५) **"आकार"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी ने त्यांनी दिलेल्या सेवांसाठी वसूल करावयाच्या रकमा ;

(१६) **"एकाच वेळी असलेली (कोइन्सीडेन्ट) सर्वोच्च मागणी"** म्हणजे राज्याची सर्वोच्च मागणी असण्याच्या वेळी वितरण परवानाधारकांसाठी निर्मिती-पारेषणाच्या जोडणीच्या ठिकाणी मापन केलेली मागणी;

(१७) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(१८) **"कामकाज प्रचालन विनियम"** म्हणजे आयोगाच्या कामकाज प्रचालनाचे नियमन करणारे आयोगाचे विनियम;

(१९) **"करारबद्ध क्षमता"** म्हणजे दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने त्याच्या दीर्घ-कालिन वीज खरेदी योजनेचा एक भाग म्हणून वीज खरेदी कराराच्या किंवा व्यवस्थेच्या माध्यमातून करारबद्ध केलेली मेगावॅटमधील क्षमता आणि ही क्षमता, पारेषण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या मानीव पारेषण क्षमता हक्कांच्या सममूल्य असेल;

(२०) **"नियंत्रण कालावधी"** म्हणजे १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०२० दरम्यानचा चार वर्षांचा कालावधी, जो आयोगाद्वारे वाढविला जाऊ शकेल;

(२१) **"अंतिम मुदतीचा दिनांक (कट-ऑफ डेट)"** म्हणजे प्रकल्पाचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेल्या वर्षाच्या दोन वर्षांनंतर संपणाऱ्या वर्षातील ३१ मार्च आणि जर प्रकल्पाचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत घोषित करण्यात आले असेल तर, अशा वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेल्या वर्षाच्या तीन वर्षांनंतर संपणाऱ्या वर्षातील ३१ मार्च, हा अंतिम मुदतीचा दिनांक राहील;

(२२) **"दिवस"** म्हणजे ०००० वाजता सुरू होणारा २४ तासांचा कालावधी;

(२३) **"वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याचा दिनांक" किंवा "सीओडी" म्हणजे :—**

**(ए)** औष्णिक निर्मिती केंद्राच्या निर्मिती संचाच्या किंवा गटाच्या बाबतीत, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजाचा दिनांक म्हणजे निर्मिती कंपनीने, लाभधारकांना पूर्वसूचना, असल्यास, दिल्यानंतर अखंडित वीज निर्मिती क्षमतेचे कमाल प्रमाण (एम सी आर) किंवा स्थापित क्षमता (आय सी) यशस्वी कसोटी चाचणीद्वारे (ट्रायल रन) सिद्ध केल्यानंतर घोषित केलेला दिनांक आणि संपूर्ण निर्मिती केंद्राच्या बाबतीत, निर्मिती केंद्राच्या शेवटच्या निर्मिती संचाचे किंवा गटाचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याचा दिनांक :

परंतु असे की, जेव्हा लाभधारकाला निर्मिती केंद्राकडून वीज खरेदी करण्यासाठी करारबद्ध करण्यात आलेले असते तेव्हा, निर्मिती कंपनीकडून लाभधारकांना सात दिवसांची पूर्व-सूचना दिल्यानंतर कसोटी चाचणीस प्रारंभ होईल आणि कसोटी चाचणी पूर्ण झाल्यानंतर ०००० वाजता, शेड्युलिंगला सुरुवात होईल :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनी, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने आणि राज्य ग्रिड संहितेने विनिर्दिष्ट केलेल्या तांत्रिक मानकांची निर्मिती केंद्राने पूर्तता केल्याचे प्रमाणित करील.

**(बी)** पम्प्ड स्टोअरेज जल विद्युत निर्मिती केंद्रासह, जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या निर्मिती संचाच्या बाबतीत, निर्मिती कंपनीने ०००० वाजल्यापासून घोषित केलेला दिनांक आणि संपूर्ण निर्मिती केंद्राच्या संबंधात, निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेशी अनुरूप पिकिंग क्षमता यशस्वी कसोटी चाचणीद्वारे सिद्ध केल्यानंतर निर्मिती कंपनीने घोषित केलेला दिनांक :

परंतु असे की, जेव्हा लाभधारकाला निर्मिती केंद्राकडून वीज खरेदी करण्यासाठी करारबद्ध करण्यात आलेले असेल तेव्हा, निर्मिती केंद्राच्या निर्मिती संचासाठीची शेड्युलिंग प्रक्रिया किंवा निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेशी अनुरूप पिकिंग क्षमता यशस्वी कसोटी चाचणीद्वारे सिद्ध करण्याच्या प्रात्यक्षिकास, निर्मिती कंपनीकडून लाभधारकांना सात दिवसांची पूर्व-सूचना दिल्यानंतर, प्रारंभ होईल आणि कसोटी चाचणी पार पडल्यानंतर ०००० तासांपासून शेड्युलिंगला प्रारंभ होईल :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनी, केंद्रीय विद्युत प्राधिकरण आणि राज्य ग्रिड संहितेने विनिर्दिष्ट केलेल्या तांत्रिक मानकांची निर्मिती केंद्राने पूर्तता केल्याचे प्रमाणित करील.

परंतु असेही की, जर जलाशय किंवा जलसाठ्याच्या पद्धतीवर चालणाऱ्या जल विद्युत निर्मिती केंद्राला स्थापित क्षमतेशी अनुरूप पिकिंग क्षमता सिद्ध करणे पाण्याच्या अपुऱ्या साठ्यामुळे किंवा जलाशयाच्या पातळीमुळे शक्य झाले नाही तर, निर्मिती केंद्राच्या शेवटच्या संचाचा वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याचा दिनांक हा संपूर्ण निर्मिती केंद्राच्या वाणिज्यिक कामकाज सुरू झाल्याचा दिनांक म्हणून विचारात घेण्यात येईल आणि जेव्हा जलसाठ्याची/जलाशयाची अशी पातळी साध्य करण्यात येईल तेव्हा अशा जल-विद्युत निर्मिती केंद्राला, निर्मिती संचाच्या किंवा निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेशी अनुरूप पिकिंग क्षमता असल्याचे सिद्ध करून दाखविणे, बंधनकारक राहील :

परंतु असेही की, जर नदीच्या पाण्यावर चालणारे जल-विद्युत निर्मिती केंद्र किंवा त्याच्या निर्मिती संचाचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज, पाण्याचा पुरवठा कमी असतानाच्या कालावधीत, जेव्हा अशी पिकिंग क्षमता सिद्ध करण्यासाठी पाण्याचा पुरवठा पुरेसा नसतो अशा कालावधीत सुरू झाल्याचे घोषित करण्यात आले तर, जेव्हा पाणीपुरवठा पुरेसा उपलब्ध होईल तेव्हा असे जल-विद्युत निर्मिती केंद्र किंवा निर्मिती संच, स्थापित क्षमते इतकी पीकिंग क्षमता असल्याचे सिद्ध करून दाखवतील.

**(सी)** पारेषण यंत्रणेच्या बाबतीत, विजेचे पारेषण करण्याची आणि संपर्काकरिता संकेत (सिग्नल) पाठविण्याची चाचणी यशस्वी झाल्यानंतर, पारेषण यंत्रणेचा भाग नियमित सेवारत असल्याचे पारेषण परवानाधारकाने ०००० तासापासून घोषीत केलेला दिनांक :

परंतु असे की, पारेषण परवानाधारक किंवा त्याचे पुरवठादार किंवा कंत्राटदार यांच्याशी सबंधित नसलेल्या कारणासाठी परंतु संबंधित निर्मिती केंद्र किंवा अपस्ट्रीम किंवा डाऊनस्ट्रीम पारेषण यंत्रणा किंवा वितरण यंत्रणा सुरू करण्यात झालेल्या विलंबामुळे, जर पारेषण यंत्रणा किंवा पारेषण यंत्रणेच्या एखाद्या भागाला नियमित सेवा देण्यात अडथळा आला तर, पारेषण परवानाधारक अशी पारेषण यंत्रणा किंवा तिच्या एखाद्या भागाच्या वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजाच्या दिनांकास आयोगाकडे मंजुरी मागू शकेल :

परंतु आणखी असे की, विद्यमान पारेषण परवानाधारकाच्या बाबतीत, अशी विनंती या विनियमांतर्गत दाखल करावयाची त्यांच्या बहु-वर्षीय वीज दर याचिकेचा किंवा मध्यावधी आढावा याचिकेचा किंवा समायोजन याचिकेचा एक भाग म्हणून समाविष्ट करता येईल ;

(२४) **"निर्भांडवलीकरण (डी-कॅपिटलायझेशन)"** म्हणजे आयोगाने मान्यता दिल्यानुसार काढून टाकावयाच्या मत्तांना अनुरूप एकूण स्थिर मत्तांमधील कपात ;

(२५) **"घोषित क्षमता"** निर्मिती केंद्राकरिता घोषित क्षमता म्हणजे, राज्य ग्रिड संहितेमध्ये व्याख्या केलेल्या दिवसाच्या कोणत्याही काल-गटाच्या बाबतीत किंवा सबंध दिवसाकरिता, इंधन किंवा पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन आणि संबंधित विनियमांत घालण्यात आलेल्या इतर मर्यादांच्या अधीन राहून, अशा विद्युत निर्मिती केंद्राने एक्स-बस मेगावॅटमध्ये वीज पुरविण्याची घोषित केलेली क्षमता ;

(२६) **"मानीव वितरण परवानाधारक"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत वितरण परवानाधारक म्हणून मानण्यात आलेली व्यक्ति ;

(२७) **"डिझाइन ऊर्जा"** जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात डिझाइन ऊर्जा म्हणजे, ९० टक्के भरवशाच्या वर्षांत ९५ टक्के स्थापित क्षमता असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राकडून, निर्माण होऊ शकणारी ऊर्जा ;

(२८) **"वितरण व्यवसाय"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या-क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याचा व्यवसाय ;

(२९) **"वितरण परवानाधारक"** म्हणजे असा परवानाधारक ज्याला त्याच्या पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले असेल;

(३०) **"वितरण वायर्स व्यवसाय"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेचे वहन करण्याकरिता वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याचा व्यवसाय;

(३१) **"सविस्तर प्रकल्प अहवाल योजना" (किंवा "डीपीआर योजना")** म्हणजे या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली अंदाजित भांडवली खर्चाची कमाल मर्यादा ओलांडणारी भांडवली खर्च योजना, ज्यासाठी निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने प्रस्तावित गुंतवणूक योजनांना तत्त्वतः मंजुरीसाठी आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एक सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करून त्यास आयोगाची तत्त्वतः पूर्व-मंजुरी घेणे आवश्यक असेल ;

(३२) **"वीज दर आणि आकारांपासून अपेक्षित महसूल"** म्हणजे निर्मिती कंपनीला किंवा पारेषण परवानाधारकाला किंवा वितरण परवानाधारकाला विनियमित व्यवसायापासून प्रचलित वीज दर आणि आकारांपासून प्राप्त होऊ शकणारा अंदाजित महसूल ;

(३३) **"अस्तित्त्वात असलेला निर्मिती संच/केंद्र"** म्हणजे १ एप्रिल २०१६ पूर्वी वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याचे घोषित केलेला विद्युत निर्मिती संच किंवा केंद्र ;

(३४) **"घटना"** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील पूर्व-निर्धारित किंवा पूर्व-नियोजित नसलेले प्रसंग ज्यात दोष, घटना व बिघाड यांचा समावेश असेल ;

(३५) **"वाढवलेले आयुर्मान"** म्हणजे आयोगाकडून प्रकरण-निहाय तत्त्वावर परवानगी दिल्यानुसार, निर्मिती केंद्र किंवा त्याचा संच किंवा पारेषण यंत्रणा आणि त्याचा भाग यांच्या उपयुक्त आयुर्माना पलीकडे वाढवलेले आयुर्मान;

(३६) **"शुल्क" म्हणजे** एमएसएलडीसीने नोंदणी, सदस्यत्व किंवा आयोगाने निश्चित केल्यानुसार अन्य कोणत्याही कारणासाठी दिलेल्या सेवांकरिता वसूल करावयाच्या रकमा;

(३७) **"दैवी आपत्तीची घटना"** कोणत्याही व्यक्ती/संस्थेच्या संदर्भात दैवी आपत्तीची घटना म्हणजे, कोणतीही घटना किंवा परिस्थिती किंवा घटना किंवा परिस्थितीचा संयोग, जी त्या व्यक्तीच्या वाजवी नियंत्रणाखाली नसते आणि त्या व्यक्तीने एखादी कृती केल्यामुळे किंवा न केल्यामुळे होत नाही आणि जी, त्या व्यक्तीला योग्य काळजी आणि दक्षता घेऊनही टाळता येणे शक्य होत नाही व जी उपरिनिर्दिष्ट बाबींच्या सर्वसाधारणतेपुरती मर्यादित न ठेवता त्यात खालील घटनांचाही समावेश असेल :—

(ए) दैवी प्रकोप की जे वीज, वादळ, ॲक्शन ऑफ एलिमेंट, भूकंप, पूर, मुसळधार पाऊस, दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्ती यापुरतेच मर्यादीत नाहीत ;

(बी) राज्य स्तरावर परिणाम करणारा आणि परवानाधारकाच्या पुरवठा क्षेत्रात व्यापक परिणाम करणारा संप आणि औद्योगिक अशांतता, परंतु यामध्ये परवानाधारकाच्या स्वत:च्या कंपनीमधील संप आणि औद्योगिक अशांतता वगळून ;

(सी ) युद्ध, आक्रमण, सशस्त्र संघर्ष किंवा परदेशी शत्रुची कृती, बंडाळी, दंगल, क्रांती, अतिरेकी किंवा लष्करी कारवाई अशी कोणतीही कृती ;

(डी) न टाळता येणारा अपघात, की जे आग, स्फोट, किरणोत्सर्गी प्रदूषण आणि विषारी रासायनिक प्रदूषण यापुरेतच मर्यादीत नाहीत ;

(इ) भार प्रेषण केंद्राच्या आवश्यकतेनुसार किंवा त्यांनी निर्देशित केल्याप्रमाणे ग्रिडमध्ये करण्यात आलेला बंद किंवा व्यत्यय ;

(३८) **"वीज निर्मिती व्यवसाय"** म्हणजे (एक) कोणत्याही जागेस विजेचा पुरवठा करण्यासाठी किंवा पुरवठा शक्य करण्यासाठी, किंवा (दोन) अधिनियम आणि त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियम व विनियमांनुसार कोणत्याही वितरण परवानाधारकाला विजेचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा (तीन) कलम ४२ च्या उप-कलम (२) अंतर्गत करण्यात आलेल्या विनियमांच्या अधीन राहून, कोणत्याही ग्राहकाला विजेचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी, विद्युत निर्मिती केंद्रामधून विजेची निर्मिती करण्याचा व्यवसाय ;

(३९) **"निर्मिती कंपनी"** म्हणजे, वीज निर्मिती केंद्राची मालकी असलेली किंवा ते चालवित असलेली किंवा त्याची देखभाल करत असलेली अशी कोणतीही कंपनी किंवा कॉर्पोरेट संस्था किंवा व्यक्तींचा संघ किंवा संस्था, मग तो विधिसंस्थापित असेल किंवा नसेल, किंवा कृत्रिम न्यायिक व्यक्ती ;

(४०) **"निर्मिती केंद्र" (किंवा "केंद्र")** म्हणजे विजेच्या निर्मितीसाठीचे केंद्र किंवा त्यांचा संच, ज्यामध्ये वीज निर्मितीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारे स्टेप-अप ट्रान्सफॉर्मर, स्विचगिअर, स्विचयार्ड, केबल्स किंवा अन्य संलग्न उपकरण यांचा समावेश असलेली कोणतीही इमारत आणि संयत्र आणि त्याची जागा; या जागेचा वापर निर्मिती केंद्रासाठी करण्याचा हेतू असतो आणि निर्मिती केंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची कोणतीही इमारत, आणि जेथे पाण्याच्या शक्तीपासून विजेची निर्मिती करण्यात येते, त्यामध्ये पेनस्टॉक्स (जलनिस्सारक, जलमार्ग), हेड ॲण्ड टेल वर्क्स, मेन आणि रेग्युलेटिंग रिझर्व्हायर, धरणे आणि अन्य जलविद्युत कामांचा समावेश असतो, परंतु यामध्ये कोणत्याही उप-केंद्राचा समावेश नसतो.

(४१) **"एकूण कॅलरीफिक मूल्य" किंवा ("जीसीव्ही")** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात "एकूण कॅलरीफिक मूल्य" म्हणजे एक किलोग्रॅम घन इंधनाच्या किंवा एक लिटर द्रवरुप इंधनाच्या किंवा एक स्टँडर्ड घन मिटर वायुरुप इंधनाच्या, जसे असेल तसे, पूर्ण प्रज्वलनातून निर्माण झालेली किलो कॅलरीजमधील उष्णता ;

(४२) **"केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण"** म्हणजे जनरेटर टर्मिनल्समध्ये एक युनिट (kWh) विद्युत ऊर्जा निर्माण करण्यासाठी पुरवावी लागणारी किलो कॅलरीजमधील उष्णता ;

(४३) **"उच्च दाब"** किंवा (**"एच टी"**) म्हणजे केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या व लागू असलेल्या नियम आणि विनियमांत "उच्च" किंवा "अति उच्च" दाब म्हणून व्याख्या केलेले सर्व दाब ;

(४४) **"औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र"** म्हणजे निर्मिती केंद्र किंवा त्याचा संच जे ऊर्जेचा मुख्य स्त्रोत म्हणून खनिज इंधन जसे की, कोळसा, लिग्नाइट, गॅस, द्रव इंधन किंवा यांचे संयोग, यांचा वापर करून विजेची निर्मिती करते ;

(४५) **"भारतीय शासकीय संस्था (इंडियन गव्हर्नमेंटल इस्ट्रुमेंटॅलिटी)"** म्हणजे भारत सरकार, राज्य सरकार आणि भारत सरकार किंवा ज्या राज्यात प्रकल्प स्थित आहे अशा राज्य सरकारद्वारा नियंत्रित केले जाणारे कोणतेही मंत्रालय किंवा विभाग किंवा मंडळ किंवा एजन्सी किंवा नियामक किंवा अर्ध-न्यायिक प्राधिकरण ;

(४६) **"अनिश्चित वीज"** म्हणजे निर्मिती केंद्राच्या संच किंवा गटाचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्यापूर्वी ग्रिडमध्ये अंतःक्षेपित करण्यात आलेली वीज ;

(४७) **"स्थापित क्षमता"** म्हणजे विद्युत निर्मिती केंद्राच्या सर्व संचांच्या नामपट्टीवर नमूद करण्यात आलेल्या क्षमतांची बेरीज किंवा विद्युत निर्मिती केंद्राची क्षमता (जिची जनरेटर टर्मिनल्समध्ये दखल घेतली जाते) ;

(४८) **"राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा"** म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रामध्ये पारेषण वाहिन्यांद्वारे विजेचे वहन करणारी कोणतीही यंत्रणा आणि त्यामध्ये राज्यातील पारेषण परवानाधारकांच्या सर्व पारेषण वाहिन्या, उप-केंद्रे आणि संलग्न उपकरणे यांचा समावेश होतो :

परंतु असे की, पारेषण यंत्रणा व वितरण यंत्रणा यांच्यामधील आणि वीज निर्मिती केंद्र व पारेषण यंत्रणा यांच्यामधील विभाजनाच्या ठिकाणाची व्याख्या ही अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (बी) अंतर्गत केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या विनियमांना अनुसरून असेल ;

(४९) **"परवानाधारक"** या विनियमांच्या प्रयोजनासाठी परवानाधारक म्हणजे आयोगाने यथोचितपणे प्राधिकृत केलेला पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, जसे असेल तसे ;

(५०) **"बाजारपेठ प्रचालन कार्य (मार्केट ऑपरेशन फंक्शन)"** म्हणजे विजेचे शेड्युलिंग, प्रेषण, माहिती मिळविणे, ऊर्जेचे लेखे ठेवणे आणि फारकतीची हिशोबपूर्ती, पारेषण हानिची परिगणना आणि विभाजन, पूल लेख्यांचे कामकाज आणि अतिभार आकार लेखा, पूरक सेवांचे प्रशासन, माहितीचे प्रसारण आणि अधिनियम किंवा विनियम किंवा आदेशाद्वारे एमएसएलडीसीला नेमून दिलेली अन्य कोणतीही कार्ये ;

(५१) **"कमाल अखंडित प्रमाण" [ किंवा "मॅक्झिमम कन्टयुनिअस रेंटींग" ("एम सी आर")]** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या युनिटच्या संबंधात कमाल अखंडित प्रमाण म्हणजे प्रमाणित मापदंडांना अनुसरून उत्पादकाने हमी दिलेले जनित्राच्या टर्मिनल्सच्या ठिकाणचे कमाल अखंडित वीज उत्पादन, आणि कम्बाइन्ड सायकलवर आधारित औष्णिक विद्युत निमिती केंद्राच्या गटाच्या संबंधात म्हणजे उत्पादकाने हमी दिलेले, पाणी किंवा वाफेचे अंतःक्षेपण (लागू असल्यास), आणि ५० हर्टझ ग्रिड फ्रिक्वन्सी आणि विनिर्दिष्ट केलेल्या जागेवरील स्थितीनुसार, जनित्राच्या टर्मिनल्सच्या ठिकाणी कमाल अखंडित वीज उत्पादन ;

(५२) **"नवीन विद्युत निर्मिती संच/केंद्र"** म्हणजे १ एप्रिल २०१६ रोजी किंवा त्यानंतर वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्याचे घोषित करण्यात आले आहे असा विद्युत निर्मिती संच किंवा केंद्र ;

(५३) **"नव्वद (९०) टक्के भरवशाचे वर्ष"** म्हणजे संयंत्र कार्यरत राहण्याच्या अपेक्षित कालावधीच्या ९०% इतकी किंवा त्यापेक्षा जास्त वार्षिक ऊर्जा निर्मिती होण्याची संभावना असणारे वर्ष ;

(५४) **"एकाच वेळी नसलेली (नॉन-कोइन्सिडेन्ट) कमाल मागणी"** म्हणजे एखाद्या कालावधी दरम्यान वितरण परवानाधारकासाठी निर्मिती-पारेषणाच्या जोडणीच्या ठिकाणी मोजण्यात आलेली सर्वोच्च मागणी आणि जी संपूर्ण राज्यातील यंत्रणेच्या सर्वोच्च मागणीच्या वेळी असू शकते किंवा असू शकणार नाही ;

(५५) **"सविस्तर प्रकल्प अहवाल आवश्यक नसणारी योजना"** म्हणजे विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांनी आयोगाची तत्त्वतः पूर्व-मंजुरी घेणे आवश्यक नसेल अशी अंदाजित भांडवली खर्चाची या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कमाल मर्यादेच्या आत असणारी भांडवली खर्च योजना ;

(५६) **"वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न"** म्हणजे वीज दरापासूनच्या उत्पन्ना व्यतिरिक्त अन्य विनियमित व्यवसायापासून मिळालेले उत्पन्न, ज्यात अन्य व्यवसायापासूनच्या कोणत्याही उत्पन्नाचा समावेश नसेल आणि वितरण परवानाधारकाच्या किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाच्या बाबतीत, क्रॉस-सबसिडी अधिभार आणि अतिरिक्त अधिभार आणि अन्य व्यवसायापासून जमा होणाऱ्या रकमांचा समावेश नसेल ;

(५७) **"प्रमाणकानुसार वार्षिक संयंत्र उपलब्धता घटक" (किंवा "एन ए पी ए एफ")** जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात म्हणजे जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता विनियम ४६ मध्ये विनिर्दिष्ट केलेला उपलब्धता घटक ;

(५८) **"अधिकारी"** म्हणजे आयोगाचा अधिकारी ;

(५९) **"संचालन आणि देखभाल खर्च" (किंवा "ओ अँण्ड एम खर्च")** निर्मिती कंपनीच्या बाबतीत म्हणजे निर्मिती कंपनीच्या किंवा त्याच्या भागाच्या संचालन व देखभालीवर झालेला खर्च आणि त्यामध्ये मनुष्यबळ, दुरुस्ती, सुटे भाग, वापरून संपणाऱ्या वस्तू, विमा आणि वरकड खर्च या बाबींवरील खर्चाचा समावेश असेल, परंतु त्यामध्ये इंधन खर्चाचा समावेश नसेल ; आणि परवानाधारकाच्या बाबतीत, पारेषण परवानाधारकाने किंवा वितरण परवानाधारकाने संचालन व देखभालीवर किंवा त्याच्या भागावर केलेला खर्च आणि त्यामध्ये मनुष्यबळ, दुरुस्ती, सुटे भाग, वापरून संपणाऱ्या वस्तू, विमा आणि वरकड खर्च या बाबींवरील खर्चाचा समावेश असेल ;

(६०) **"मूळ प्रकल्प खर्च"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक यांनी प्रकल्पाच्या मूळ व्याप्तीनुसार अंतिम मुदतीच्या दिनांकापर्यंत केलेला व आयोगाने मान्य केलेला भांडवली खर्च ;

(६१) **"याचिकाकर्ता"** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, ज्यांनी अधिनियम आणि या विनियमांनुसार वीज दर किंवा शुल्क व आकारांच्या निश्चितीकरणासाठी किंवा अचूक समायोजनासाठी किंवा मध्यावधी कामगिरीच्या आढाव्यासाठी याचिका दाखल केलेली असेल आणि यामध्ये अशा निर्मिती कंपन्या किंवा पारेषण परवानाधारक, वितरण परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांचा समावेश होतो, की ज्यांचा वीज दर किंवा शुल्क व आकार ठरविण्यासाठी किंवा अचूक समायोजन किंवा मध्यावधी कामगिरीचा आढावा घेण्यासाठी आयोगाने स्वतःहून पुढाकार घेतला आहे ;

(६२) **"संयंत्र उपलब्धता घटक" (किंवा "प्लँट अव्हेलेबीलिटी फॅक्टर-पी ए एफ")** जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात कोणत्याही कालावधीकरिता संयंत्र उपलब्धता घटक म्हणजे एमएसएलडीसीने प्रमाणित केल्याप्रमाणे त्या कालावधीतील सर्व दिवसांकरिता दैनंदिन घोषित क्षमतांची सरासरी जी मेगावॅटमधील स्थापित क्षमतेच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येते, जी प्रमाणकानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापराने कमी करण्यात येते ;

(६३) **"संयंत्र भार घटक" (किंवा "प्लँट लोड फॅक्टर-पीएलएफ")** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात ठराविक कालावधीकरिता संयंत्र भार घटक म्हणजे, अशा कालावधीतील प्रत्यक्ष विद्युत निर्मितीस अनुरूप बाहेर पाठविलेली एकूण ऊर्जा, जी त्या कालावधीतील स्थापित क्षमतेस अनुरूप बाहेर पाठविलेल्या ऊर्जेच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येते व जिची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :—

**संयंत्र भार घटक** $\% = 100 \times \sum_{i=1}^{N} AG_i / \{ N \times IC \times (1 - AUX_n) \} \%$

जेथे—

N = दिलेल्या कालावधीतील काल-गटांची संख्या.

AG = अशा कालावधीतील त्या $i^{th}$ काल-गटांसाठी मेगावॅटमधील प्रत्यक्ष विद्युत निर्मिती.

IC = विद्युत निर्मिती केंद्राची मेगावॅटमधील स्थापित क्षमता.

AUX = मेगावॅटमधील प्रमाणकानुसार सहाय्यकारी वापर, जो एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत व्यक्त करण्यात येतो.

(६४) **“पूल लेखा”** म्हणजे आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दर (एबीटी) पद्धती अंतर्गत लागू असलेले अनिर्धारित आंतरबदल (यूआय लेखा) किंवा राज्यांतर्गत एबीटी पद्धतीअंतर्गत निश्चित करण्यात आलेले राज्यांतर्गत एबीटी हिशेबपूर्ती आकार यांच्याशी संबंधित प्रदानांसाठी राज्यामध्ये चालविण्यात येत असलेले लेखे किंवा आयोगाच्या निर्देशांनुसार किंवा विनियमांनुसार एमएसएलडीसीकडून चालविण्यात येत असलेले रिॲक्टिव्ह एनर्जी एक्सचेंजीज (रिॲक्टिव्ह एनर्जी अकाऊंट) किंवा असे कोणतेही अन्य लेखे ;

(६५) **“प्रकल्प”** म्हणजे विद्युत निर्मिती केंद्र किंवा पारेषण यंत्रणा, जसे असेल तसे, आणि जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, निर्मिती सुविधेच्या सर्व भागांचा म्हणजे पेनस्टॉक्स, हेड ॲण्ड टेल वर्क्स, मेन ॲण्ड रेग्युलेटिंग रिझर्वायर्स धरणे आणि अन्य हायड्रॉलिक वर्क्स, इनटेक वॉटर कंडक्टर सिस्टिम, विद्युत निर्मिती केंद्र आणि निर्मिती संच, जे वीज निर्मितीसाठी वाटून घेण्यात आले आहेत, या सर्वांचा समावेश होतो ;

(६६) **“काळजीपूर्वक छाननी”** म्हणजे एकूण महसुली गरज आणि वीज दर किंवा शुल्क व आकार निश्चित करण्यासाठी, निधी उभारण्याची योजना, कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर, खर्च आणि वेळेमध्ये झालेली वाढ आणि आयोगाकडून उचित म्हणून विचारात घेण्यात येणारे असे अन्य घटक यांच्यावर केलेला किंवा प्रस्तावित केलेल्या खर्चाच्या वाजवीपणाची केलेली तपासणी ;

(६७) **“पम्प्ड स्टोअरेज जल विद्युत निर्मिती केंद्र”** म्हणजे असे जल विद्युत केंद्र जे खालच्या पातळीवरील जलसाठ्यातून उंच पातळीवरील जलसाठ्यात पम्पाने खेचून जल शक्तिच्या रूपात साठवलेल्या ऊर्जेमधून वीज निर्माण करते ;

(६८) **“प्रमाणित दाब”** म्हणजे पारेषण यंत्रणा ज्या दाबावर चालावी असा डिझाइन करण्यात आलेला दाब किंवा त्या खालील असा कमी दाब ज्याने पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याशी विचारविनिमय करून, वाहिनी तात्पुरती भारीत केली जाते ;

(६९) **“किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसाय”** म्हणजे वितरण परवानाधारकाने त्याच्या परवान्यातील अटींना अनुसरून त्याच्या ग्राहकांना विजेची विक्री करण्याचा व्यवसाय ;

(७०) **“नदीच्या पाण्यावर चालणारे निर्मिती केंद्र”** म्हणजे निर्मिती केंद्राच्या आधी जलाशय नसणारे जल-विद्युत निर्मिती केंद्र ;

(७१) **“नदीच्या पाण्यावर चालणारे जलाशयासह असणारे निर्मिती केंद्र”** म्हणजे जल-विद्युत निर्मिती केंद्र ज्याच्या जलाशयामध्ये सर्वोच्च कालावधीतील विजेची मागणी आणि सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीमधील मागणीतील फरकानुसार वीज निर्मिती करण्यासाठी आवश्यक पाण्याचा साठा असतो ;

(७२) **“लहान गॅस टर्बाइनवर आधारित निर्मिती केंद्र”** म्हणजे ५० मेगावॅट किंवा त्यापेक्षा कमी क्षमता असलेल्या गॅस टर्बाईन्ससह ओपन सायकल गॅस टर्बाइन किंवा कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्र ;

(७३) **“जल-साठवणूक पद्धतीचे विद्युत केंद्र”** म्हणजे मोठ्या प्रमाणावर जल साठवणुकीची क्षमता असलेले जल-विद्युत निर्मिती केंद्र जेथे विजेच्या मागणीतील बदलांना अनुरूप असे बदल वीज निर्मितीमध्ये करणे शक्य होते ;

(७४) **“राज्य ग्रिड संहिता”** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (एच) अंतर्गत आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेली संहिता ;

(७५) **“पारेषण यंत्रणा”** म्हणजे संलग्न उप-केंद्रासह किंवा त्याशिवाय असलेली वाहिनी किंवा वाहिन्यांचा गट, आणि त्यामध्ये पारेषण वाहिन्या व उप-केंद्रांशी संलग्न असलेल्या उपकरणांचा समावेश होतो ;

(७६) **“पारेषण क्षमता हक्क”** म्हणजे ठोक विद्युत पारेषण करारात ठरवून दिल्याप्रमाणे पारेषण यंत्रणेत विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि वीज खेचण्याच्या ठिकाणांमध्ये, सर्वसाधारण परिस्थितीत, मेगावॅटमध्ये वीज हस्तांतरित करण्याचा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा हक्क ;

(७७) **“पारेषण परवानाधारक”** म्हणजे पारेषण वाहिन्या टाकण्याचे किंवा त्यांचे संचालन करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत आयोगाकडून प्राधिकृत करण्यात आलेला परवानाधारक ;

(७८) **“पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता”** या विनियमांच्या प्रयोजनासाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता म्हणजे वितरण परवानाधारक आणि दीर्घकालिन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता, परंतु अंशतः मुक्त प्रवेश उपयोगकर्ता वगळून ;

(७९) **“संच”** (कम्बाइन्ड सायकलवर चालणाऱ्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांव्यतिरिक्त अन्य) औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात संच म्हणजे, वाफेवर चालणारे जनित्र, टर्बाइन-जनित्र आणि सहाय्यकारी साधने किंवा कम्बाइन्ड सायकलवर चालणाऱ्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात म्हणजे टर्बाइन-जनित्र आणि सहाय्यकारी साधने आणि जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधात म्हणजे टर्बाइन-जनित्र व त्याची सहाय्यकारी साधने ;

(८०) **"उपयुक्त आयुर्मान"** निर्मिती केंद्राचा संच, पारेषण यंत्रणा आणि वितरण यंत्रणेच्या संबंधात उपयुक्त आयुर्मान, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजाच्या दिनांकापासून, खालीलप्रमाणे असेल :—

| | |
|---|---|
| १. कोळसा / लिग्नाईटवर आधारित औष्णिक वीज निर्मिती केंद्र | २५ वर्षे |
| २. वायु / द्रव इंधनावर आधारित औष्णिक वीज निर्मिती केंद्र | २५ वर्षे |
| ३. जल विद्युत निर्मिती केंद्रासह जल विद्युत निर्मिती केंद्र पम्प्ड स्टोअरेज | ३५ वर्षे |
| ४. एसी आणि डीसी उप-केंद्र | २५ वर्षे |
| ५. गॅस इन्सुलेटेड उप-केंद्र | २५ वर्षे |
| ६. पारेषण वाहिनी (उच्च-दाब एसी आणि उच्च-दाब डीसी सह) | ३५ वर्षे |
| ७. वितरण वाहिनी | ३५ वर्षे |
| ८. संपर्क यंत्रणा | १५ वर्षे |

परंतु असे की, एसी आणि डीसी उप-केंद्रे आणि गॅस इन्सुलेटेड उप-केंद्रे, ज्यांच्यासाठी १ एप्रिल २०१६ रोजी किंवा त्यानंतर निविदा मागविण्यासाठी सूचना जारी करण्यात आली असेल, त्यांचे उपयुक्त आयुर्मान ३५ वर्षे असल्याचे विचारात घेण्यात येईल ;

परंतु आणखी असे की, उपयुक्त आयुर्मान पूर्ण केलेल्या प्रकल्पाचे आयुर्मान आणखी वाढविण्याबाबत आयोग निर्णय घेईल ;

(८१) **"वर्ष"** म्हणजे आर्थिक वर्ष ("आ.व.") ;

(८२) **"झेड-घटक आकार"** म्हणजे या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे इंधन अधिभार समायोजन आणि निश्चित केलेल्या नियंत्रण करण्यासारख्या नसलेल्या घटकांशी सबंधित खर्च, यासारख्या नियंत्रण करण्यासारख्या नसलेल्या घटकांमुळे निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक आणि वितरण परवानाधारक यांना संबंधितांकडून वसूल करण्याची परवानगी असलेला आकार.

२.२ (ए) या विनियमांत वापरण्यात आलेले शब्द किंवा उक्ती परंतु ज्यांची येथे व्याख्या करण्यात आलेली नाही त्यांचा अर्थ, अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियम किंवा विनियमांत, त्यांना दिलेल्या अर्थानुसार राहील.

(बी) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## ३. विनियमांची व्याप्ती आणि याचिकेची मर्यादा—

३.१ अधिनियमाखाली ज्या बाबींसंबंधात आयोगास अधिकारिता आहे त्या सर्व बाबींसाठी, या विनियमांनुसार एकूण महसुली गरज, विजेचे दर आणि शुल्क व आकार, त्याबाबतच्या अटी व शर्तीसह, आयोग निश्चित करील व त्यामध्ये खालील बाबींचाही समावेश असेल :—

(एक) नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनचा वीज पुरवठा वगळून, विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास करावयाचा वीज पुरवठा ;

(दोन) विजेचे राज्यातंर्गत पारेषण करण्यासाठी ;

(तीन) मधली (इंटरव्हिनिंग) पारेषण सुविधा वापरण्यासाठी ;

(चार) विजेचे वहन करण्यासाठी ;

(पाच) विजेचा किरकोळ पुरवठा करण्यासाठी ;

(सहा) एमएसएलडीसीकरिता शुल्क आणि आकारांच्या बाबतीत ;

(सात) वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणारे आयोगाचे विनियम आणि आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांनुसार, अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (२)च्या पहिल्या परंतुकांतर्गत विजचे वहन आकार व अधिभारासाठी ;

(आठ) वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणारे आयोगाचे विनियम आणि त्यात आयोगाच्या आदेशांनुसार, अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (४) अंतर्गत विजेच्या वहन आकारांवर अतिरिक्त अधिभार ;

परंतु असे की, या विनियमांच्या अनुक्रमे भाग इ, एफ, जी , एच आणि आय अंतर्गत असलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन, लागू असतील त्याप्रमाणे, आयोग वीज दर आणि शुल्क व आकार निश्चित करील ;

३.२ या विनियमांत कोणतीही तरतूद असली तरी, जर केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार पारदर्शक बोली प्रक्रियेतून वीज दर निश्चित करण्यात आला असेल तर, आयोग असा वीज दर स्वीकारील :

परंतु असे की, केंद्र सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे यथोचितपणे पालन करण्यात आले आहे याबाबत आयोग आपली खात्री पटण्यासाठी आवश्यक वाटणारी माहिती मागवेल ती याचिकाकर्ता आयोगास पुरवील.

**भाग - ए : सर्वसाधारण तत्त्वे**

**४. बहु-वर्षीय वीज दराची चौकट.——**

४.१ आयोग, बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीच्या अंतर्गत, दिनांक १ एप्रिल २०१६ पासून, विनियम ३.१ च्या खंड (एक), (दोन), (तीन), (चार), (पाच), (सहा), (सात) आणि (आठ) मध्ये समाविष्ट असलेल्या बाबींकरिता, वीज दर आणि शुल्क व आकार निश्चित करील.

४.२ बहु-वर्षीय वीज दराची चौकट, निर्मिती कंपनी, पारेषण परवानाधारक, वितरण वायर व्यवसाय आणि विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय, यांच्याकरिता एकूण महसुलाची गरज आणि वीज दर व आकारांपासूनच्या अपेक्षित महसुलाची आणि एमएसएलडीसीच्या शुल्क आणि आकार यांची परिगणना करण्यासाठी, खालील घटकांवर आधारित असेल :—

(एक) अंदाजित एकूण महसुली गरज, विद्यमान वीज दर किंवा एमएसएलडीसीच्या बाबतीत शुल्क व आकारांपासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसुली तूट, आणि नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता प्रस्तावित वीज दर किंवा शुल्क आणि आकार, असणारी बहु-वर्षीय वीज दराची याचिका निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांच्याकडून सादर करण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी वर्गवारी-निहाय वीज दर प्रस्तावित करील :

परंतु आणखी असे की, कामगिरीचे मापदंड, ज्यांच्या मार्गदर्शिका या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत त्यांच्या आधारे, संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसुली गरजेचा अंदाज करण्यात येईल.

(दोन) नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी आयोगाकडून निर्मिती कंपन्या, पारेषण परवानाधारक, वितरण वायर्स व्यवसाय, विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय, आणि एमएसएलडीसी, यांच्याकरिता एकूण महसुली गरज आणि वीज दर किंवा शुल्क व आकार निश्चित करण्यात येतील :

परंतु असे की, आयोग, नियंत्रण कालावधीसाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमधील एमएसएलडीसीच्या शुल्क आणि आकारांच्या विभागणीच्या प्रमाणास देखील मान्यता देईल :

(तीन) नियंत्रण कालावधीच्या पहिल्या दोन वर्षासाठी मान्यता दिलेल्या अंदाजांच्या तुलनेत कामकाजविषयक व वित्तीय कामगिरी आणि एकूण महसुली गरज, विद्यमान वीज दरापासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसुली तूट, यांचे सुधारित अंदाज आणि नियंत्रण कालावधीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षासाठी प्रस्तावित वर्गवारी-निहाय वीज दर यांच्या मध्यावधी आढाव्यासाठी, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांच्याकडून याचिका सादर करण्यात येईल ;

(चार) मध्यावधी आढाव्यासाठीच्या याचिकेसोबत, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांच्याकडून, संबंधित वर्षासाठी मान्यता दिलेल्या अंदाजाच्या तुलनेत, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षासाठी लेखापरीक्षित लेख्यांच्या आधारे अचूक समायोजन आणि नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या वर्षासाठी कामकाजविषयक व वित्तीय कामगिरीचे तात्पुरते अचूक समायोजन, सादर करण्यात येईल ;

(पाच) मध्यावधी आढाव्याच्या आधारे, नियंत्रण कालावधीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षासाठी आयोगाकडून निर्मिती कंपन्या, पारेषण परवानाधारक, वितरण वायर्स व्यवसाय, विजेचा किरकोळ पुरवठा व्यवसाय, एमएसएलडीसी यांच्याकरिता सुधारित एकूण महसुली गरज आणि वीज दर किंवा शुल्क व आकारांचे निश्चितीकरण ;

(सहा) मध्यावधी आढाव्याबरोबरच, संबंधित वर्षासाठी मान्यता दिलेल्या अंदाजांच्या तुलनेत, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षासाठी अचूक समायोजन, नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या वर्षासाठी कामकाजविषयक व वित्तीय कामगिरीचे तात्पुरते अचूक समायोजन आणि याचिकाकर्त्याच्या नियंत्रणाखालील (नियंत्रण करण्यासारखे घटक) घटकांमुळे व नियंत्रणाबाहेरील (नियंत्रण न करण्यासारखे घटक) घटकांमुळे झालेल्या कामागिरीतील तफावतींचे आयोगाकडून वर्गीकरण ;

(सात) आयोगाने या विनियमांत विनिर्दिष्ट केलेल्या नियंत्रण न करण्यासारख्या घटकांमुळे झालेल्या मान्यताप्राप्त नफ्याचा लाभ ग्राहकांना देणे किंवा झालेला तोटा ग्राहकांकडून वसूल करणे, यासंबंधीचे सूत्र ;

(आठ) आयोगाने या विनियमांत विनिर्दिष्ट केलेल्या नियंत्रण करण्यासारख्या घटकांमुळे उद्‌भवणारा मान्यताप्राप्त नफा किंवा तोटा ग्राहकांत विभागून घेण्याचे सूत्र.

**५. नियंत्रण कालावधीमध्ये दाखल करावयाच्या याचिका—**

५.१ या विनियमांखाली नियंत्रण कालावधीमध्ये दाखल करावयाच्या याचिका खालीलप्रमाणे आहेत :—

(ए ) बहु-वर्षीय वीज दराची याचिका १५ जानेवारी २०१६ पर्यंत दाखल करण्यात येईल आणि यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१४-२०१५ करिता अचूक समायोजन ;

परंतु असे की, आर्थिक वर्ष २०१४-२०१५ पूर्वीच्या वर्षाचे अचूक समायोजन अद्याप पूर्ण व्हावयाचे असेल तर त्या वर्षीचे अचूक समायोजन आयोग, जर त्यास उचित वाटले तर, आर्थिक वर्ष २०१४-२०१५ च्या अचूक समायोजनासोबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंतर्गत करील ;

(दोन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१५-२०१६ करीता तात्पुरते अचूक समायोजन ;

(तीन) या विनियमांतर्गत नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी एकूण महसुली गरज ;

(चार) या विनियमांतर्गत नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी विद्यमान वीज दर आणि आकारांपासून विजेच्या विक्रीतून मिळालेला महसूल आणि अंदाजित महसुली तूट ;

(पाच) या विनियमांतर्गत नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी प्रस्तावित वर्गवारी-निहाय वीज दर किंवा शुल्क व आकार ;

(बी) मध्यावधी आढाव्यासाठी याचिका ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत दाखल करण्यात येईल आणि यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१५-२०१६ साठी अचूक समायोजन ;

(दोन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१६-२०१७ साठी अचूक समायोजन ;

(तीन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१७-२०१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन ;

(चार) नियंत्रण कालावधीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षांसाठी एकूण महसुली गरज, विद्यमान वीज दर आणि आकारांपासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसुली तूट यांचे सुधारित अंदाज आणि प्रस्तावित वर्गवारी-निहाय वीज दर ;

(सी) नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षांसाठी अचूक समायोजनासाठी याचिका ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत दाखल करण्यात येईल आणि यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१७-२०१८ साठी अचूक समायोजन ;

(दोन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१८-२०१९ साठी अचूक समायोजन ;

(तीन) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ अंतर्गत करावयाचे आर्थिक वर्ष २०१९-२०२० साठी तात्पुरते अचूक समायोजन :

परंतु असे की, मानीव वितरण परवानाधारक, ज्यांचा वीज दर ३१ मार्च २०१६ पर्यंत आयोगाने निश्चित करावयाचा आहे त्यांच्याबाबतीत, अशा वितरण परवानाधारकाने विशिष्ठ सूट मागितली असेल तर बहु-वर्षीय वीज दर याचिका, मध्यावधी आढावा याचिका आणि अचूक समायोजन याचिका सादर करण्याची कालमर्यादा आयोग शिथिल करू शकेल :

परंतु आणखी असे की, अशा मानीव वितरण परवानाधारकाला प्रथम त्याच्या पुरवठा क्षेत्रातील कमाल मर्यादा किंवा अन्य तात्पुरत्या वीज दराच्या मान्यतेसाठीची याचिका दाखल करण्याची परवानगी देण्यात येईल, त्यापाठोपाठ वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेच्या मान्यतेसाठीची याचिका आणि त्यानंतर बहु-वर्षीय वीज दराची याचिका दाखल करता येईल :

परंतु असेही की, नियंत्रण न करता येण्यासारख्या घटकांमधील तफावतीचे पर्यवसान वीज दरामध्ये अचानक, मोठी आणि टिकून राहणारी वाढ होण्यात होणार असेल तर, नियंत्रण कालावधी दरम्यान कोणत्याही वेळी याचिका दाखल करता येईल.

५.२ याचिकाकर्ता, या विनियमांतर्गत वीज दर किंवा शुल्क व आकारांचे निश्चितीकरण आणि अचूक समायोजन यासाठीच्या याचिकेसोबत वेगवेगळे लेखापरीक्षित लेखा विवरणपत्र सादर करील :

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर्स व्यवसाय आणि विजेच्या किरकोळ पुरवठ्याच्या व्यवसायाचे लेखे संपूर्णपणे अलग करण्यात आलेले नसतील तर, वितरण परवानाधारकाची एकूण महसुली गरज ही वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय या दोघांमध्ये या विनियमांच्या **भाग जी** मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वाटप सुत्रानुसार विभागण्यात येईल ;

५.३ आयोगाने बहुविध वितरण परवाने निर्गमित केलेले आहेत त्या क्षेत्रांच्या बाबतीत पदस्थ वितरण परवानाधारकाला या विनियमांखाली वेगवेगळ्या याचिका दाखल करण्याचा पर्याय खुला असेल :

परंतु असे की, ज्या क्षेत्रासाठी याचिका दाखल करण्यात आली असेल अशा प्रत्येक वेगळ्या क्षेत्रासाठी एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित करणे आयोगाला शक्य व्हावे यासाठी अशा प्रत्येक वेगळ्या याचिकेमध्ये खर्च, महसूल, मत्ता, दायित्वे, भांडवलीकरण आणि वर्गवारी-निहाय वीज दर यांचा तपशील समाविष्ट असेल :

परंतु आणखी असे की, अशा प्रत्येक क्षेत्रासाठी विचारात घेतलेला असा खर्च, महसूल, मत्ता, दायित्वे आणि भांडवलीकरण उर्वरित पुरवठा क्षेत्रासाठी याचिका सादर करताना वगळण्यात येईल :

परंतु असेही की, वितरण परवानाधारक, संपूर्ण कंपनी आणि ज्या पुरवठा क्षेत्रासाठी वेगळी याचिका वितरण परवानाधारकाने दाखल केली असेल अशा प्रत्येक क्षेत्रातमध्ये खर्च, महसूल, मत्ता, दायित्वे आणि भांडवलीकरण यांचे ताळमेळ पत्रक सादर करील.

## ६. बहु-वर्षीय वीज दर याचिका——

६.१ बहु-वर्षीय वीज दर याचिकेमध्ये, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पद्धतीनुसार, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी एकूण महसुली गरज आणि वीज दरापासून अपेक्षित महसुलाचा अंदाज यांचा समावेश असेल आणि अशा याचिकेस लागू असलेले शुल्क असेल.

६.२ एकूण महसुली गरजेचे अंदाज, नियंत्रण कालावधीदरम्यान प्रत्येक घटकाशी संबंधित गृहितकांसह आयोगाकडून विहित करण्यात येतील अशा मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व नमुन्यांनुसार वर्गवारी-निहाय विक्री आणि मागणीचे अंदाज, वीज खरेदीची योजना, भांडवल गुंतवूणक योजना, निधी उभारणी योजना आणि भौतिक लक्ष्यांक, यांच्या आधारावर असतील.

६.३ भांडवल गुंतवणूक योजनेमध्ये, सध्या चालू असलेले प्रकल्प, जे मागील नियंत्रण कालावधीमध्ये चालू झाले असतील, आणि नवीन प्रकल्प (समर्थनासह) ज्यांचा प्रारंभ नियंत्रण कालावधीमध्ये होणार असेल परंतु जे नियंत्रण कालावधीमध्ये किंवा त्यानंतर पूर्ण होणार असतील ते, वेगवेगळे दाखविण्यात येतील आणि त्यांच्यासाठी संबंधित तांत्रिक आणि वाणिज्यिक तपशील देण्यात येईल.

६.४ वितरण परवानाधारक, कमी खर्चाची वीज प्रथम खरेदी करणे (मेरीट ऑर्डर डिस्पॅच तत्त्व) या तत्त्वावर आयोगाने संबंधित विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेले नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन आणि ऊर्जा कार्यक्षमता (ईई) व वीज मागणी व्यवस्थापनाच्या (डीएसएम) योजनांसाठी दिलेले लक्ष्यांक, असल्यास, याबाबींच्या आधारे विचारात घेतलेल्या सर्व निर्मिती केंद्रांकडून करावयाच्या वीज खरेदीच्या गरजेचे वास्तववादी अंदाज तयार करील ;

परंतु असे की, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनांची पूर्तता करण्यासाठी नूतनशील ऊर्जा प्रकल्पांकडून करावयाच्या विजेच्या खरेदीला मेरीट ऑर्डर डिस्पॅचचे तत्त्व लागू राहणार नाही.

६.५ वीज दर आणि आकारांपासूनच्या अपेक्षित महसुलाचा अंदाज खालील बाबींच्या आधारे राहील :—

(ए) निर्मिती कंपनीच्या बाबतीत, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी प्रत्येक संच/केंद्राने निर्माण करावयाच्या विजेच्या परिमाणाचे अंदाज ;

(बी) पारेषण परवानाधारकाच्या बाबतीत, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी एकूण महसुली गरजेचे अंदाज किंवा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना वाटलेल्या पारेषण क्षमतेचे उचित अंदाज ;

(सी) वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी ग्राहकांना पुरविण्यात यावयाच्या आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या वतीने वहन करावयाच्या विजेच्या परिमाणाचे अंदाज ;

परंतु असे की, वितरण परवानाधारक इनपुट ऊर्जा आणि इनपुट दरासह, प्रत्येक वितरण फ्रॅन्चायसी क्षेत्रासाठी वर्गवारी-निहाय विक्रीचा संबंधित तपशील वेगवेगळा सादर करील ;

(डी) याचिका दाखल करण्याच्या दिनांका रोजी प्रचलित असलेला वीज दर.

६.६ एकूण महसुली गरज आणि वीज दर व आकारांपासूनचा अपेक्षित महसूल यांच्या अंदाजांच्या आधारावर निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारक किंवा एमएसएलडीसी नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी प्रस्तावित वीज दर किंवा शुल्क व आकार, लागू असल्यास वर्गवारीनिहाय सादर करील, जो एकूण महसुली गरजेमधील तूट, असल्यास, भरून काढू शकेल तसेच त्यामध्ये प्रस्तावित वसूल करावयाच्या मर्यादेपर्यंतच्या मागील वर्षातील वसूल न करण्यात आलेल्या महसुली तुटीचा समावेश असेल.

६.७ आयोगाला अंदाजाच्या वाजवीपणाचे मूल्यांकन करणे शक्य व्हावे यासाठी, मागील कामगिरी, कार्यक्षमता किंवा उत्पादकतेतील लाभ साध्य करण्यासाठी प्रस्तावित पुढाकार, तांत्रिक अभ्यास, कंत्राटांतर्गत व्यवस्था आणि दुय्यम संशोधन यांच्यासह, परंतु त्या पुरतेच मर्यादित न राहता, अंदाजांच्या समर्थनासाठी संपूर्ण तपशील सादर करण्यात येईल.

६.८ याचिका प्राप्त झाल्यानंतर, आयोग :—

(ए) नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसुली गरज आणि वीज दरामध्ये योग्य ते फेरबदल करून आणि शर्ती घालून, आदेश निर्गमित करील ; किंवा

याचिकाकर्त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी कारणे नोंदवून, याचिका नाकारु शकेल ;

## ७. काही अस्थिर घटकांसाठी विशिष्ट मार्गदर्शिका—

आयोग, बहु-वर्षीय वीज दर याचिकेला मान्यता देताना, काही अस्थिर घटकांसाठी म्हणजेच पारेषण हानि, वितरण हानि, वसुलीतील कार्यक्षमता आणि प्रदानातील कार्यक्षमता या बाबींसह, परंतु त्यांच्यापुरतेच मर्यादित न राहता, मार्गदर्शिका ठरवून देईल.

## ८. मध्यावधी आढावा—

८.१ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी मध्यावधी आढाव्यासाठी सन २०१५-२०१६ आणि सन २०१६-२०१७ साठीच्या एकूण महसुली गरजेचे आणि महसुलाचे अचूक समायोजन करण्यासाठी आणि सन २०१७-२०१८ साठी तात्पुरत्या अचूक समायोजनाकरिता ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत याचिका दाखल करील :

परंतु असे की, याचिकेमध्ये आयोगाने ठरवून दिलेल्या नमुन्यातील माहितीसह, एकूण महसुली गरज आणि वीज दर व आकारांपासून अपेक्षित महसुलाच्या मान्यता दिलेल्या अंदाजापासून कामकाजविषयक आणि वित्तीय कामगिरीमध्ये झालेल्या कोणत्याही फरकाची कारणमीमांसा व व्याप्ती अजमावण्यासाठी लेखा विवरणपत्रे, लेखा पुस्तकांमधील उतारे आणि परिव्यय लेख्यांचे अहवाल व त्यांच्या उताऱ्यांसह आयोग मागेल अशी अन्य माहिती, यांचा समावेश असेल.

८.२ कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या व्याप्तीमध्ये नियंत्रण कालावधीच्या पहिल्या दोन वर्षासाठी मान्यता दिलेल्या अंदाजांशी प्रत्यक्ष कामकाजविषयक आणि वित्तीय कामगिरीची तुलना आणि नियंत्रण कालावधीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षासाठी एकूण महसुली गरज, विद्यमान वीज दरापासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसुली तूट यांचे सुधारित अंदाज आणि प्रस्तावित वर्गवारीनिहाय वीज दर यांचा समावेश असेल.

८.३ विनियम ८.२ मधील आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोग, खालील विनियम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अस्थिर घटकांच्या कामगिरीतील तफावत किंवा अपेक्षित तफावतींचा संबंध याचिकाकर्त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या (नियंत्रण करण्यासारख्या) घटकांशी किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील (नियंत्रण न करण्यासारख्या) घटकांशी जोडेल :

परंतु असे की, विनियम ९.१ अंतर्गत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अस्थिर घटकांशिवाय अन्य अस्थिर घटकांसाठी जर कोणत्याही तफावती किंवा अपेक्षित तफावती आढळल्या तर, नियंत्रण कालावधीत आयोगाकडून त्यांचा सामान्यपणे आढावा घेतला जाणार नाही आणि या तफावतींचा संबंध पूर्णतः नियंत्रण करण्यासारख्या घटकांशी जोडण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर याचिकाकर्त्याची अशी खात्री झाली असेल की, विनियम ९.१ मध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या अस्थिर घटकाच्या कामगिरीत कोणत्याही वर्षात तफावत किंवा अपेक्षित तफावत नियंत्रण न करण्यासारख्या घटकांमुळे झाली असेल तर, असा याचिकाकर्ता अशा अस्थिर घटकाचा समावेश करण्यासाठी आयोगाकडे अर्ज करू शकेल.

८.४ कामगिरीचा मध्यावधी आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोग खालील बाबींकरिता आदेश पारित करील :—

(ए) निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीला सन २०१५-२०१६ आणि २०१६-२०१७ साठी नियंत्रण करण्यासारख्या घटकांमुळे झालेला मान्यताप्राप्त एकूण नफा किंवा तोटा आणि सन २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि अशा नफा किंवा तोट्याची विनियम ११ नुसार विभागून घेता येईल अशी रक्कम ;

(बी) निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीला सन २०१५-२०१६ आणि २०१६-२०१७ साठी नियंत्रण न करण्यासारख्या घटकांमुळे झालेला मान्यताप्राप्त एकूण नफा किंवा तोटा आणि सन २०१७-२०१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि अशा नफा किंवा अशा तोट्यांची रक्कम, जी संबंधित वर्षादरम्यान वसूल करण्यात आलेली नव्हती आणि जी विनियम १० नुसार विभागून घेता येईल ;

(सी) नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीकरिता एकूण महसुली गरज आणि वीज दर किंवा शुल्क व आकार यासाठी मान्यता देण्यात आलेले फेरबदल.

## ९. नियंत्रण करण्यासारखे आणि नियंत्रण न करण्यासाखे घटक—

९.१ " नियंत्रण न करण्यासारख्या " घटकांमध्ये आयोगाने निश्चित केलेल्या खालील घटकांचा समावेश असेल, जे अर्जदारांच्या नियंत्रणा बाहेरील असतील आणि जे अर्जदार सुसह्य करू शकणार नाही असे असतील. अशा घटकांची सूची खालीलप्रमाणे आहे :—

(ए) दैवी आपत्तीच्या घटना ;

(बी) कायद्यांतील बदल ;

(सी) प्राथमिक आणि/किंवा दुय्यम इंधनाच्या किंमतीमधील तफावतीमुळे इंधन खर्चातील बदल ;

(डी) विक्रीतील तफावत ;

(इ) वीज खरेदीच्या करारात किंवा व्यवस्थेमधील आयोगाने मान्यता दिलेल्या खंडांच्या (clauses) अधीन राहून, मान्यताप्राप्त स्त्रोतांकडून वीज खरेदीच्या दरातील तफावतीमुळे वीज खरेदीच्या खर्चातील तफावत ;

(एफ) दीर्घ-कालिन कर्जासाठी बाजारपेठेतील व्याजाच्या दरातील तफावत ; आणि

(जी) माल-वाहतूक दरातील तफावत.

९.२ याचिकाकर्त्याच्या कामगिरीतील तफावती किंवा अपेक्षित तफावती ज्याचा संबंध नियंत्रण करण्यासारख्या घटकांशी आयोगाकडून जोडला जाऊ शकेल अशा खालील घटकांचा, परंतु ते त्याच्यापुरतेच मर्यादित न राहता, अंतर्भाव असेल :—

(ए) भांडवली खर्चाची योजना कार्यान्वित करण्यासाठी लागलेला जादा वेळ किंवा झालेला जादा खर्च किंवा अकार्यक्षमता यामुळे भांडवलीकरणामध्ये झालेल्या तफावती ज्यांचा संबंध योजनेच्या व्याप्तीमधील मान्यता दिलेल्या बदलाशी, वैधानिक लेव्हीमधील बदलाशी किंवा दैवी आपत्तीच्या घटनांशी लावता येणार नाही ;

(बी) व्याज आणि वित्तीय आकार, भाग भांडवलावरील परतावा, आणि वरील खंड (ए) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार भांडवलीकरणामधील तफावतीमुळे आलेला घसारा, यामधील तफावत ;

(सी) तांत्रिक आणि वाणिज्यिक हानीमधील तफावत ;

(डी) कामगिरीच्या मापदंडामधील तफावत ;

(इ) खेळत्या भांडवलावरील व्याजाच्या रकमेतील तफावत ;

(एफ) संचालन व देखभाल खर्चातील तफावत ;

(जी) कोळशाच्या वाहतुकीतील हानिमधील तफावत.

## १०. नियंत्रण न करण्यासारख्या घटकांमुळे झालेला नफा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याची पद्धत—

१०.१ वीज दराच्या आदेशात विचारात घेतलेल्या स्त्रोतांकडून खरेदी केलेल्या इंधनाच्या खर्चातील तफावतीमुळे, वेगवेगळ्या स्त्रोतांकडून खरेदी केलेल्या कोळशाच्या मिश्रणाच्या गुणोत्तरासह, निर्मिती कंपनीला झालेला एकूण नफा किंवा तोटा विनियम ४८.६ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार, मासिक तत्त्वावर निर्मिती कंपनीच्या ऊर्जा आकारांमध्ये समायोजन करून ग्राहकांना लागू करण्यात येईल.

१०.२ वितरण परवानाधारकाला इंधन खर्च आणि वीज खरेदीच्या खर्चातील तफावतीमुळे होणारा, विनियम ९.१ मध्ये समाविष्ट असलेला, एकूण नफा किंवा तोटा, ग्राहकांना झेड-घटक आकाराच्या ($Z_{FAC}$) इंधन समायोजन आकार या भागाखाली लागू करण्यात येईल ;

त्यासाठी या आकाराचे मासिक तत्त्वावर त्याच्या वीज दरात समायोजन, या विनियमांखाली विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे आणि या विनियमांखाली आयोगाने पारित केलेल्या आदेशात निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे आणि त्यास आयोगाच्या तिमाही तत्त्वावर कार्योत्तर पूर्व-मंजुरीच्या अधीन राहून, करण्यात येईल :

परंतु असे की, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षातील पहिल्या महिन्याकरिता झेड-घटक आकाराला ($Z_{FAC}$) आयोगाची, काळजीपूर्वक तपासणीवर आधारित, पूर्व-मंजुरी घ्यावी लागेल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक झेड-घटक आकाराच्या पूर्व-मंजुरीसाठी, केलेला खर्च व आयोगाने मान्यता दिलेला खर्च यामधील तफावतीचा तपशील आणि नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या पडताळणीसाठी आयोगाला आवश्यक असलेली तपशीलवार परिगणना व पुष्ट्यर्थ दस्तावेज, आयोगाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये सादर करील :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या महिन्यासाठी, स्वतःच्या निर्मिती केंद्रातून निर्माण केलेल्या विजेवरील इंधन खर्च आणि खरेदी केलेल्या विजेचा खर्च यामधील तफावतीचा तपशील, पहिला महिना पूर्ण झाल्यानंतर, सादर करील.

१०.३ $Z_{FAC}$ वितरण परवानाधारकाच्या संपूर्ण विक्रीवर, कोणत्याही ग्राहकाला कोणतीही सूट न देता, लागू राहील.

१०.४ या विनियमांनुसार कोणत्याही महिन्यात खरेदी केलेल्या विजेच्या संबंधात असा खर्च केल्यानंतर, इंधन खर्च आणि वीज खरेदी खर्च यामधील प्रत्यक्ष तफावतीच्या आधारावर $Z_{FAC}$ भागाची परिगणना व आकारणी करण्यात येईल आणि इंधन खर्चाचे अंदाज किंवा अपेक्षित तफावत यांच्या आधारे, ही परिगणना करण्यात येणार नाही.

१०.५ नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षातील पहिल्या महिन्यासाठी $Z_{FAC}$ ला आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर, वितरण परवानाधारक, आयोगाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये, केलेला खर्च आणि मान्यता दिलेल्या रकमा यांच्यामधील तफावतीचा तपशील आणि नियंत्रण कालावधीच्या त्यानंतरच्या महिन्यांसाठी, $Z_{FAC}$ ला कार्योत्तर मान्यतेकरिता, आयोगास पडताळणीसाठी आवश्यक असलेली परिगणना आणि पुष्ट्यर्थ दस्तावेजाचा तपशील, सादर करील :

परंतु असे की, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षातील पहिल्या तिमाहीमध्ये नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षातील पहिला महिना समाविष्ट असेल, ज्यासाठी $Z_{FAC}$ ला पूर्व-मंजुरी आवश्यक राहील :

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक, नियंत्रण कालावधीच्या पुढील महिन्यांसाठी त्याच्या स्वतःच्या निर्मिती केंद्रामधून निर्माण केलेल्या विजेवरील इंधन खर्च आणि खरेदी केलेल्या विजेवरील खर्च यामधील तफावतीचा तपशील, प्रत्येक तिमाहीनंतर साठ (६०) दिवसांच्या आत तिमाही तत्त्वावर, कार्योत्तर मंजुरीसाठी, सादर करील :

परंतु असेही की, वितरण परवानाधारक, वसुलीयोग्य $Z_{FAC}$ च्या तुलनेत मागील तिमाहीकरिता सर्व ग्राहकांना लागू करण्यात आलेला $Z_{FAC}$ व त्यासोबत आयोगाला पडताळणीसाठी आवश्यक असलेला परिगणनेचा तपशील आणि पुष्टी देणारी कागदपत्रे सादर करील :

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक, $Z_{FAC}$ लागू करण्यासाठी आयोगाने दिलेल्या मंजुरीचा तपशील, त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर, प्रदर्शित करील.

१०.६ झेड-घटक आकाराच्या इंधन समायोजन आकार (एफएसी) भागाच्या परिगणनेसाठी वापरावयाचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे :—

$$Z_{FAC}\text{ (Rs crore)} = F + C + B$$

जेथे,

$Z_{FAC}$ = इंधन समायोजन आकारांकरिता(एफएसी) भाग - झेड-घटक आकार ;

F = विनियम ९.१ मध्ये समाविष्ट असलेला स्वतःच्या वीज निर्मितीसाठीच्या इंधन खर्चात आणि वीज खरेदीच्या खर्चातील बदल ;

**C** = कोणत्याही कमी वसुली/ज्यादा वसुलीवर महिन्याच्या सुरुवातीला प्रचलित असलेल्या आधारभूत (बेस) दरात १५० बेसिस अंशाने वाढ करून येणाऱ्या दराने द्यावयाचे व्याज ;

B = जादा वसुली/कमी वसुलीकरिता समायोजन घटक ;

१०.७ “एन” महिन्यासाठी आकारावयाच्या इंधन समायोजन आकारासाठी परिगणना पुढीलप्रमाणे :—

$Z_{FAC\ n}$ (Rs crore) = $F_{n-2} + C_{n-2} + B_{n-2,}$

जेथे,

$F_{n-2}$ = “एन-२” महिन्यासाठी स्वतः निर्माण केलेल्या विजेच्या इंधनाचा खर्च आणि खरेदी केलेल्या विजेचा खर्च यामधील बदल आणि त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :—

F (Rs. Crore) = $A_{FC,Gen} + A_{FC,PP,}$

जेथे,

$A_{FC,Gen}$ = स्व-निर्मितीच्या इंधन खर्चातील बदल. या बदलाची परिगणना, उष्मांक दर, सहाय्यकारी वापर, इ.साठी आयोगाने मान्यता दिलेले निकष आणि निर्देश यांच्या आधारे करण्यात येईल ;

$A_{FC,PP}$ = अन्य स्रोतांकडून खरेदी केलेल्या विजेच्या अस्थिर आणि/किंवा स्थिर खर्चामधील बदल. हा बदल, यां विनियमांत विहित केलेल्या आणि विद्यमान वीज दराच्या आदेशातील निकषांची पूर्तता करण्याच्या मर्यादेपर्यंत आणि लागू असणाऱ्या निकषांच्या अधीन राहून, अनुज्ञेय राहील ;

$C_{n-2}$ = “n-2” महिन्यासाठी कोणत्याही जादा वसुली/कमी वसुलीसाठी आनुषंगिक खर्च

$B_{n-2}$ (Rs. Crore) = $Z_{FAC\ n-4} - R_{n-2}$

जेथे,

$B_{n-2}$ = “n -2” महिन्यासाठी जादा वसुली/कमी वसुलीकरिता समायोजन घटक ;

$Z_{FACn-4}$ = “n-4” महिन्यासाठी $Z_{FAC}$ ;

$R_{n-2}$ = “n-2” महिन्यामध्ये “n-4” महिन्यासाठी प्रत्यक्ष वसूल केलेला $Z_{FAC;}$

१०.८ वर विनिर्दिष्ट केलेल्या सूत्रानुसार, एकूण वसुली-योग्य $Z_{FAC}$ ची वसुली प्रत्यक्ष विक्रीमधून ‘रुपये प्रति युनिट’ याप्रमाणे करण्यात येईल :

परंतु असे की, मीटर न बसविलेल्या ग्राहकांच्या बाबतीत, आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीस अनुसरून केलेल्या परिगणनेनुसार अशा ग्राहकांना केलेल्या अंदाजित विक्रीच्या आधारे काढलेला $Z_{FAC}$ वसुली-योग्य राहील :

परंतु असे की, आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपेक्षा वितरण परवानाधारकाची प्रत्यक्ष वितरण हानी जेव्हा जास्त होते तेव्हा, अशी जादा वितरण हानीशी (युनिटमधील) सममूल्य रक्कम एकूण वसुली-योग्य $Z_{FAC}$ तून कमी करण्यात येईल.

१०.९ वीज दरातील विशिष्ट ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापराचा टप्पा याकरिता प्रति युनिट $Z_{FAC}$ ची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :—

$Z_{FAC\ Cat}$ (Rs/kWh) = [$Z_{FAC}$ / (Metered sales + Unmetered consumption estimates + Excess distribution losses)] * k * 10,

जेथे

$Z_{FAC\ Cat}$ = विशिष्ट वीज दर ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापराच्या टप्प्याकरिता $Z_{FAC}$ भाग की जो “रुपये प्रति युनिट” मध्ये दर्शविला जाईल.

k = सरासरी आकारणी दर/ सरासरी वीज पुरवठ्याचा खर्च.

Average Billing Rate = म्हणजे विचाराधीन असलेल्या विशिष्ट वीज दर ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापराचा टप्पा याकरिता आयोगाने वीज दराच्या आदेशात मान्यता दिलेला “रुपये प्रति युनिट” मधील “सरासरी आकारणीचा दर” :

परंतु असे की, मीटर नसलेल्या ग्राहकांकरिता सरासरी आकारणीचा दर हा आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार परिगणना केल्याप्रमाणे अशा ग्राहकांना केलेल्या अंदाजित विक्रीवर आधारित असेल ;

ACOS = म्हणजे आयोगाने वीज दराच्या आदेशात वसुलीसाठी मान्यता दिलेला “रुपये प्रति युनिट” मधील “सरासरी वीज पुरवठ्याचा खर्च” :

परंतु असे की, मासिक $Z_{FAC}$ हा वीज दरातील अस्थिर भागाच्या २० टक्क्यांपेक्षा, किंवा आयोग ठरवून देईल अशा अन्य मर्यादेपेक्षा, जास्त नसेल :

परंतु असे की, अशा मर्यादेमुळे $Z_{FAC}$ मधील कोणतीही कमी वसुली ही पुढे ओढण्यात येईल आणि ती वितरण परवानाधारकास आयोग निर्देश देईल तितक्या भावी कालावधीत वसूल करता येईल.

१०.१० निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकांवर उच्च न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणांनी दिलेला निकाल किंवा आयोगाने पारित केलेला पुनर्विलोकन आदेश यामुळे होणारा आनुषंगिक परिणाम, $Z_{FAC}$ आकाराच्या अन्य नियंत्रण न करण्यासारख्या खर्चाच्या भागाच्या ($Z_{OUC}$) माध्यमातून नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या व चौथ्या वर्षासाठी वार्षिक तत्त्वावर वीज दरामध्ये समायोजन करून, या विनियमांतर्गत पारित करण्यात आलेल्या आयोगाच्या आदेशामध्ये निश्चित करण्यात आल्यानुसार, ग्राहकांकडून वसूल करण्यात येईल.

१०.११ वितरण परवानाधारकाने नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या व चौथ्या वर्षासाठी द्यावयाच्या आंतर-राज्य आणि राज्यांतर्गत पारेषण आकारामधील बदलाचा परिणाम $Z_{OUC}$ च्या माध्यमातून वार्षिक तत्त्वावर वितरण परवानाधारकाच्या वीज दरामध्ये समायोजन करून, या विनियमांतर्गत आयोगाने पारित केलेल्या आदेशामध्ये निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, ग्राहकांकडून वसूल करण्यात येईल.

१०.१२ संबंधित निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने दाखल केलेल्या याचिकेच्या आधारे $Z_{OUC}$ निश्चित करण्यात येईल.

१०.१३ नियंत्रण कालावधीच्या पहिल्या व तिसऱ्या वर्षात, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकांवर उच्च न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणांनी दिलेला निकाल किंवा आयोगाने पारित केलेला पुनर्विलोकन आदेश यामुळे होणारा आनुषंगिक परिणाम आणि वितरण परवानाधारकाने देय असलेल्या आंतर-राज्य आणि राज्यांतर्गत पारेषण आकारातील बदलाचा परिणाम यांना अनुक्रमे बहु-वर्षीय वीज दर आदेश आणि मध्यावधी आढावा आदेशामध्ये हाताळण्यात येईल.

**११. नियंत्रण करण्यासारख्या घटकांमुळे झालेला नफा किंवा तोटा विभागून घेण्याची पद्धत.—**

११.१ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीला नियंत्रण करण्यासारख्या घटकांमुळे होणाऱ्या एकूण मान्यताप्राप्त नफ्याची हाताळणी पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(ए) विनियम ८.४ अंतर्गत आयोगाच्या आदेशात ठरवून देण्यात येईल अशा कालावधीकरिता वीज दरात सूट (रिबेट) देण्यासाठी, अशा नफ्याच्या रकमेपैकी दोन-तृतियांश रक्कम वापरण्यात येईल ;

(बी) अशा नफ्याची उर्वरित रक्कम, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी ठेवून घेईल.

११.२ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला नियंत्रण करण्यासारख्या असलेल्या घटकांमुळे होणाऱ्या एकूण मान्यताप्राप्त तोट्याची हाताळणी पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(ए) विनियम, ८.४ अंतर्गत आयोगाच्या आदेशात ठरवून देण्यात येईल अशा कालावधीकरिता अशा तोट्याच्या एक-तृतियांश रकमेइतका अतिरिक्त आकार वीज दरात लावण्यात येईल ;

(बी) अशा तोट्याची उर्वरित रक्कम निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीला सहन करावी लागेल.

## भाग - बी : वीज दराच्या निश्चितीकरणाची कार्यपद्धत

**१२. वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज दाखल करणे.—**

१२.१ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यात आणि पद्धतीनुसार आणि त्यासाठी लागू असलेले शुल्कासोबत याचिका दाखल करण्यात येईल.

१२.२ वीज दराच्या निश्चितीकरणासाठीचे कामकाज आयोगाच्या कामकाज प्रचालनाचे नियम करणाऱ्या विनियमांनुसार चालेल.

१२.३ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी, आयोगाला, स्वतः पुढाकार घेऊन किंवा निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भात, त्यांचा वीज दर किंवा शुल्क व आकार, त्यांच्या अटी व शर्तीसह मंजूर करावयाचे प्राधिकार असतील.

**१३. वीज निर्मितीच्या दराचे निश्चितीकरण—**

१३.१ विद्यमान निर्मिती केंद्र

१३.१.१ आयोगाने दिनांक १ एप्रिल २०१६ पूर्वी कधीही, निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यामधील वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस मान्यता दिलेली असेल किंवा विद्यमान निर्मिती संच/केंद्राने पुरवठा करावयाच्या, अशा करारातील किंवा व्यवस्थेतील विजेचा दर स्वीकारला असेल, तर, अशा निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकाला पुरवठा करावयाचा विजेचा दर हा अशा वीज खरेदी करारात किंवा व्यवस्थेत नमूद केलेल्या वीज दरानुसार राहील व तो आयोगाने मान्यता दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या कालावधीकरिता राहील.

१३.१.२ दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी विद्यमान निर्मिती संचाने/केंद्राने विजेचा पुरवठा करण्यासाठी निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेस किंवा त्यामधील वीज दरास जर आयोगाने मान्यता दिलेली नसेल किंवा जर, कोणताही वीज खरेदी करार किंवा व्यवस्था करण्यात आलेली नसेल तर, अशा निर्मिती कंपनीने अशा वितरण परवानाधारकाला १ एप्रिल २०१६ नंतर करावयाचा वीज पुरवठा हा आयोगाने या विनियमांच्या **भाग-सी** नुसार मान्यता दिलेल्या वीज खरेदी करारानुसार राहील :

परंतु असे की, अशा वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस मान्यता देण्यासाठी वितरण परवानाधारक हे विनियम अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आयोगाकडे याचिका दाखल करील :

परंतु आणखी असे की, सध्या प्रचलित असलेल्या करार किंवा व्यवस्थे अंतर्गत, अशा वीज खरेदी करारास आयोग मान्यता देईपर्यंत वीज पुरवठा चालू राहू देण्यास, परवानगी देण्यात येईल आणि जर आयोगाने मान्यता दिली नाही तर, त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करून, असा वीज पुरवठा लगेच खंडीत करण्यात येईल.

१३.२ नवीन निर्मिती केंद्रे

१३.२.१ निर्मिती कंपनीने नवीन निर्मिती संच/ केंद्रातून वितरण परवानाधारकाला पुरवठा करावयाच्या विजेचा दर हा या विनियमांच्या **भाग-ई** नुसार निश्चित केलेल्या वीज दरानुसार राहील.

१३.३ स्वतःची निर्मिती केंद्रे

१३.३.१ जर वितरण परवानाधारक वीज निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असेल तर, त्याच्या निर्मिती व्यवसायाकडून ज्या हस्तांतरण किमतीने त्याच्या किरकोळ पुरवठा व्यवसायाकरिता वीज देण्यात येत असेल ती हस्तांतरण किंमत आयोगाद्वारे निश्चित करण्यात येईल :

परंतु असे की, विजेच्या अशा पुरवठ्यासाठी हस्तांतरण किंमत निश्चित करताना आयोग या विनियमांतील **भाग-ई** मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्ती विचारात घेईल.

१३.३.२ वितरण परवानाधारक त्याच्या निर्मिती व्यवसायाकरिता वेगळे अभिलेखे आणि एक वाटप विवरणपत्र ठेवेल ज्यामुळे अशा व्यवसायाशी संबंधित प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च आणि त्याला उपार्जित होणारा भागभांडवलावरील परतावा, निश्चित करणे आयोगाला सुलभ होईल.

१३.४ वितरण परवानाधारक, निर्मिती व्यवसायाशी संबंधित या विनियमांतील **भाग-ई** नुसार आवश्यक माहितीसह, विजेच्या किरकोळ पुरवठ्यासाठी वीज दर निश्चित करण्याकरिता वेगळी याचिका सादर करील.

**१४. पारेषण, वितरण वायर व्यवसाय आणि किरकोळ पुरवठा व्यवसाय आणि एमएसएलडीसी करिता वीज दर आणि शुल्क व आकारांचे निश्चितीकरण—**

१४.१ आयोग, या विनियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या कार्यपद्धतीनुसार परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, जसे असेल तसे, यांनी दाखल केलेली याचिका विचारात घेऊन पारेषण परवानाधारक, वितरण वायर्स व्यवसाय, किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांच्याकरिता एकूण महसुली गरज आणि वीज दर आणि एमएसएलडीसी करिता शुल्क व आकार निश्चित करील.

१४.२ आयोग, परवानाधारकासाठी वीज दर आणि एमएसएलडीसीकरिता शुल्क व आकार, खालील प्रयोजनांसाठी, निश्चित करील :—

(ए) विजेच्या पारेषणासाठी, या विनियमांतील **भाग-एफ** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीनुसार ;

(बी) वितरण वायर्स व्यवसायासाठी, या विनियमांतील **भाग-जी** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीनुसार ;

(सी) किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी, या विनियमांतील **भाग-एच** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीनुसार ; आणि

(डी) एमएसएलडीसीकरिता, या विनियमांतील **भाग-आय** मध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीनुसार.

१४.३ याचिकाकर्ता, त्याने आयोगाला करावयाच्या त्याच्या याचिकेचा एक भाग म्हणून, एकूण महसुली गरजेच्या आणि वीज दर व आकारांपासून मिळणाऱ्या महसुलाच्या परिगणनेचा तपशील, आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यात, आयोगास पाठवेल आणि त्यानंतर, आयोग, आयोगाचा सचिव किंवा या प्रयोजनासाठी आयोगाने निर्देशित केलेला कोणताही अधिकारी अशा परिगणनेची पडताळणी करण्यासाठी वाजवीरित्या मागवील अशी आवश्यक ती आणखी माहिती किंवा तपशील किंवा दस्तऐवज, सादर करील :

परंतु असे की, याचिकेसोबत, सुसंबद्ध असल्यास, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरीता, सुधारीत वीज दराचा सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात येईल, ज्यात वर्गवारी-निहाय वीज दर आणि एकूण महसुली गरजेतील तूट, असल्यास, कशा रीतीने सुधारित वीज दरामुळे भरुन निघू शकेल ते दाखविण्यात आलेले असेल :

परंतु आणखी असे की, आयोग, एकूण महसुली गरजेची पडताळणी आणि वीज दर निश्चित करण्यासाठी, त्यास वाजवीरित्या आवश्यक वाटेल असा तपशील याचिकाकर्त्याने वेळोवेळी सादर करण्याकरिता, वेगळेवेगळे नमुने ठरवून देऊ शकेल :

परंतु असेही की, आयोग याचिका दाखल करून घेण्यापूर्वी तांत्रिक वैधता बैठक आयोजित करू शकेल.

१४.४ आयोग विनियम १४.५ अंतर्गत जेव्हा कळवील तेव्हा, याचिकाकर्ता, आयोगाने ठरवून दिलेल्या नमुन्यानुसार आयोगाच्या मान्यतेसाठी यथोचित परिपूर्ण भरलेल्या जाहीर नोटीशीचे प्रारुप सादर करील.

१४.५ या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व आवश्यकतांची पूर्तता करणारी सर्व आवश्यक माहिती, तपशील व दस्तऐवजांसह परिपूर्ण याचिका प्राप्त झाल्यानंतर, याचिका दाखल करून घेण्यात येईल आणि आयोग, किंवा आयोगाचा सचिव, किंवा पदनिर्देशित अधिकारी, याचिका प्रसिद्धीस देण्यासाठी तयार असल्याचे याचिकाकर्त्याला कळवील.

१४.६ वरील विनियम १४.४ प्रमाणे कळविण्यात आल्यानंतर तीन दिवसांच्या आत याचिकाकर्ता, याचिकेशी संबंधित असलेल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खप असणाऱ्या कमीत कमी दोन इंग्रजी व दोन मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रांमध्ये एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करील ज्यामध्ये प्रस्तावित वीज दर आणि आयोगाकडून ठरवून देण्यात येतील अशा अन्य बाबी नमूद करून जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात येतील :

परंतु असे की, आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा ठिकाणी व अशा दराने, कोणत्याही व्यक्ती/संस्थेला संपूर्ण याचिकेची एक छापील प्रत याचिकाकर्ता उपलब्ध करून देईल :

परंतु आणखी असे की, याचिकाकर्ता, आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार, मजकूर शोधण्याच्या नमुन्यात (टेक्स्ट सर्चेबल फॉरमॅट) किंवा उतरवून घेण्याच्या (डाऊनलोडेबल) स्प्रेडशीट नमुन्यात, आयोगाला सादर केलेली याचिका व त्यासोबतची सर्व नियामक कागदपत्रे, माहिती, तपशील व दस्तावेजासह परिगणनेचा तपशील, त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर प्रदर्शित करील :

परंतु असेही की, या विनियमांच्या दुसऱ्या परंतुकात उल्लेख केलेल्या माहितीकरिता देण्यात आलेली वेब-लिंक ही सहजपणे उपलब्ध होण्यासारखी आणि माहिती उतरवून घेण्याच्या सुविधेने युक्त असेल तसेच ती याचिकाकर्त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर ठळकपणे प्रदर्शित करण्यात येईल :

परंतु असेही की, याचिकाकर्त्याला, गोपनीय स्वरूपाची असणारी कोणतीही माहिती, तपशील किंवा दस्तावेज देण्यापासून, आयोगाकडून सूट देण्यात येईल.

**स्पष्टीकरण :—** या विनियमाच्या प्रयोजनार्थ, "उतरवून घेण्याच्या स्प्रेडशीट नमुन्यात" म्हणजे एक (किंवा बहुविध, लिंक दिलेली) स्प्रेडशीट सॉफ्टवेअर धारिका ज्यांच्यामध्ये याचिकेचा आधार असलेली सर्व गृहितके, सूत्रे, परिगणना, सॉफ्टवेअर मॅक्रोज व आऊटपुट्स यांचा समावेश असेल.

१४.७ याचिकाकर्ता, वीज दर निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पुस्तके आणि अभिलेखे (किंवा त्यांच्या प्रमाणित सत्य प्रती) यासह लेखा विवरणपत्रे, कामकाज आणि खर्चाची माहिती, आयोगाला सादर करील.

१४.८ आयोग, जर त्यास आवश्यक वाटेल तर, कोणत्याही व्यक्तीला, आयोगाला याचिकाकर्त्याकडून सादर करण्यात आलेली माहिती, पुस्तके आणि अभिलेख्यांचे उताऱ्यांसह (किंवा त्यांच्या प्रमाणित सत्य प्रती), आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या विनियमांमधील अटी व शर्तीवर, उपलब्ध करेल किंवा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करील.

१४.९ आयोग, या विनियमांतर्गत दाखल करावयाच्या याचिकांसोबत, आयोगाने ठरवून दिल्यानुसार कामगिरीशी संबंधीत अशी माहिती सादर करण्याचे निर्देश निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला देऊ शकेल.

१४.१० या विनियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या याचिकेशी संबंधित कार्यपद्धती, खाली नमूद केलेल्या बाबींच्या संदर्भात प्रत्येक प्रकरणातील परिस्थिती विचारात घेऊन, आयोगास आवश्यक वाटेल त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतील :—

(ए) अधिनियमाच्या कलम ३६ अंतर्गत, पारेषण परवानाधारकाने दाखल केलेली याचिका ;

(बी) अधिनियमाच्या कलम ६४ अंतर्गत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने दाखल केलेली याचिका ;

(सी) अधिनियमाच्या कलम ३२ अंतर्गत, एमएसएलडीसीने दाखल केलेली याचिका.

## १५. वीज दराचा आदेश—

१५.१ आयोग, परिपूर्ण याचिका प्राप्त झाल्यापासून एकशे वीस (१२०) दिवसांच्या आत आणि जनतेकडून आलेल्या सर्व सूचना आणि हरकती विचारात घेऊन :—

(ए) याचिकेचा स्वीकार करून आदेशात ठरवून देण्यात येईल अशा फेरबदलांसह किंवा शर्तीवर, वीज दराचा आदेश पारित करील ;

(बी) अधिनियम आणि त्या खाली करण्यात आलेल्या नियम आणि विनियमांतील तरतुदींनुसार किंवा अन्य कोणत्याही तरतुदींना अनुसरून जर अशी याचिका नसेल तर, याचिकाकर्त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन, याचिका नाकारील.

१५.२ याचिकाकर्ता, त्याच्या परवाना क्षेत्रात मोठा खप असणाऱ्या कमीत कमी दोन (२) इंग्रजी आणि दोन (२) मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रांमध्ये, आयोगाने मान्यता दिलेला वीज दर, प्रसिद्ध करील आणि मान्यताप्राप्त वीज दर/वीज दराची अनुसूची त्याच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर प्रदर्शित करील व असा वीज दर असणारी पुस्तिका, छायाप्रतीचा वाजवी खर्च घेऊन, कोणत्याही व्यक्तीला उपलब्ध करून देईल :

परंतु असे की, याचिकाकर्ता जर निर्मिती कंपनी असेल तर, वीज दराच्या आदेशाच्या संदर्भात ज्या वितरण परवानाधारकाला विजेचा पुरवठा करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले असेल त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात मोठा खप असणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये असा वीज दर प्रसिद्ध करण्यात येईल आणि असा वीज दर त्या वितरण परवानाधारकाच्या इंटरनेटवरील संकेत-स्थळावर देखील प्रदर्शित करण्यात येईल.

१५.३ असा प्रसिद्ध करण्यात आलेला वीज दर, आदेशात ठरवून दिलेल्या दिनांकापासून अंमलात येईल आणि, त्यात सुधारणा केली किंवा बदल करण्यात येत नाही तोपर्यंत, तो आदेशात ठरवून दिलेल्या कालावधीकरिता अंमलात राहील.

## १६. वीज दराच्या आदेशाचे पालन—

१६.१ विनियम १० मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या झेड-घटक आकारांखाली निःसंदिग्धपणे अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही बदलांव्यतिरिक्त, एका वर्षात एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही वीज दरामध्ये किंवा वीज दराच्या भागात सर्वसाधारणपणे सुधारणा करता येणार नाही.

१६.२ अधिनियमाच्या कलम ६२ अंतर्गत आणि या विनियमांना अनुसरून निश्चित करण्यात आलेल्या वीज दरापेक्षा, जास्त किंमत किंवा आकार कोणत्याही निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने वसूल केला तर, अशा निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाकडून, त्याच्या अन्य कोणत्याही दायित्वांना बाधा न येऊ देता, ज्या व्यक्तीने अशी किंमत किंवा आकार अदा केला असेल त्याची होणारी जादा रक्कम, संबंधित कालावधी दरम्यान प्रचलित असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बँक दराच्या सममूल्य व्याजासह सदर व्यक्तीला देय राहील :

परंतु असे की, कोणत्याही पक्षकाराला देय असलेले असे व्याज हे निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या एकूण महसुली गरजेतून वसूल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक त्याने अदा केलेल्या किंवा अदा करावयाच्या अशा व्याजाचा, वेगळा तपशील ठेवेल आणि त्याच्या याचिकेसोबत आयोगाला तो सादर करील.

१६.३ आयोगाला त्याच्या आदेशाच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण करणे शक्य व्हावे यासाठी कामकाज आणि खर्चाची माहिती असणारे नियत कालांतराने विवरणपत्रे निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक आयोगास पाहिजे असेल तेव्हा सादर करील.

## भाग - सीः वीज खरेदी

**१७. व्याप्ती—**

१७. या भागात अंतर्भूत असलेले विनियम, वितरण परवानाधारकाने राज्यात विजेचे वितरण आणि पुरवठा करण्यासाठी करार किंवा व्यवस्था करून निर्मिती कंपनी किंवा वीज व्यापार परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा अन्य कोणत्याही स्त्रोताकडून करावयाच्या वीज खरेदीला लागू राहतील.

**१८. वीज खरेदीसाठी मार्गदर्शक सूचना—**

१८.१ वितरण परवानाधारक, नियंत्रण कालावधीकरिता वीज खरेदी करण्याच्या योजनेनुसार वर्षभरादरम्यान वीज खरेदी करील. या योजनेत, आयोगाने या विनियमांना अनुसरून मान्यता दिलेल्या दीर्घ-कालिन, मध्यम-कालिन किंवा अल्प-कालिन वीज खरेदीचा समावेश असू शकेल.

१८.२ वितरण परवानाधारक, खालील बाबींच्या संदर्भात, या भागात अंतर्भूत असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करील :—

(ए) सात वर्षापेक्षा जास्त परंतु पंचवीस वर्षापेक्षा (म्हणजेच दीर्घ- कालिन वीज खरेदी) जास्त नसलेल्या मुदत किंवा कालावधीच्या करार किंवा व्यवस्थेअंतर्गत वीज खरेदी;

(बी) एक वर्षापेक्षा जास्त परंतु सात वर्षापेक्षा (म्हणजेच मध्यम-कालिन वीज खरेदी) जास्त नसलेल्या मुदत किंवा कालावधीच्या करार किंवा व्यवस्थेअंतर्गत वीज खरेदी; आणि

(सी) एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असणाऱ्या मुदत किंवा कालावधीच्या (म्हणजेच अल्प-कालीन वीज खरेदी) करार किंवा व्यवस्थेअंतर्गत वीज खरेदी.

**१९. वीज खरेदीची योजना—**

१९.१ वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी वीज खरेदीची एक योजना तयार करील आणि ही योजना आयोगास मंजुरीसाठी सादर करील :

परंतु असे की, अशी १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणारी वीज खरेदीची योजना या विनियमांतील **भाग ए** नुसार, १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०२० पर्यंतच्या नियंत्रण कालावधीकरिता वीज दर निश्चित करण्यासाठीच्या याचिकेसोबत सादर करण्यात येईल :

परंतु आणखी असेही की, अशा वीज खरेदीच्या योजनेमध्ये, या विनियमांनुसार, वीज खरेदीसाठीच्या दीर्घ-कालिन, मध्यम-कालिन आणि अल्प-कालिन विद्युत स्त्रोतांचा समावेश असेल.

१९.२ वितरण परवानाधारकाच्या वीज खरेदीच्या योजनेमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :—

(ए) त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील विजेसाठी अनिर्बंधित आधारभूत भार आणि सर्वोच्च भाराचा संख्यात्मक अंदाज ;

(बी) स्व-निर्मितीसह, निश्चित केलेल्या वीज खरेदीच्या स्त्रोतांकडून होऊ शकणाऱ्या वीज पुरवठ्याच्या परिमाणांचा अंदाज ;

(सी) आधारभूत भार आणि सर्वोच्च भारामधील विजेची मागणी पुरी करण्यासाठी विजेच्या उपलब्धतेचा अंदाज :

परंतु असे की, अशा वीज मागणी व पुरवठ्याचा अंदाज मासिक-निहाय तत्त्वावर मेगावॅटमध्ये त्याचप्रमाणे दशलक्ष युनिट (एमयु) मध्ये व्यक्त करण्यात येईल ;

(डी) आयोगाच्या संबंधित विनियमांनुसार, विजेची गुणवत्ता आणि खात्रीशीर पुरवठ्यासंबंधी पाळावयाची मानके ;

(इ) ऊर्जेची बचत, ऊर्जा कार्यक्षमता आणि वीज मागणी व्यवस्थापनासाठी प्रस्तावित केलेल्या उपाययोजना ;

(एफ) वरील (ए) ते (इ)च्या आधारे, वीज खरेदीसाठी नवीन स्त्रोतांची गरज की ज्यामध्ये स्व-निर्मिती क्षमतेत वाढ, असल्यास, आणि वीज पुरवठ्यासाठी निश्चित केलेले नवीन स्त्रोत यांचा समावेश असेल ;

(जी) अशा वीज खरेदीसाठी विजेचे स्त्रोत, परिमाण आणि अंदाजित खर्च :

परंतु असे की, दीर्घ-कालिन वीज खरेदीच्या योजनेतील पूर्व-अनुमान किंवा अंदाज हे सर्वोच्च मागणी असलेल्या आणि सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीसाठी, खरेदी करावयाच्या विजेचे परिमाण (एमयुमध्ये) आणि सर्वोच्च मागणी (मेगावॅटमध्ये), वेगवेगळे नमूद करण्यात येतील :

परंतु आणखी असे की, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या नियंत्रण कालावधीसाठीचे पूर्व-अनुमान किंवा अंदाज हे नियंत्रण कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी तयार करण्यात येतील :

परंतु असेही की, दीर्घ मुदतीची वीज खरेदीची योजना ही वीज पुरवठ्याच्या विविध स्त्रोतांच्या खर्चासंबंधी उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित मित-व्ययी योजना असेल.

**स्पष्टीकरण**.—या विनियमांच्या प्रयोजनासाठी, "सर्वोच्च मागणीचा कालावधी" म्हणजे चोवीस तासांच्या कालावधीतील सलग तीन किंवा अधिक तासांच्या कालावधीचा एक गट ज्यामध्ये वितरण परवानाधारकाची विजेची सर्वोच्च मागणी समाविष्ट असेल.

१९.३ पूर्व-अनुमान किंवा अंदाज हे मागील कालावधीतील आकडेवारी व भावी काळाबद्दलच्या वाजवी गृहितकांवर आधारीत पूर्व-अनुमान काढण्याच्या पद्धतीचा उपयोग करून, तयार करण्यात येतील :

परंतु असे की, पूर्व-अनुमान किंवा अंदाज तयार करताना एकूण आर्थिक वाढ, विजेवर आधारीत क्षेत्रातील विजेच्या वापरातील वाढ, वीज उद्योगात स्पर्धेची सुरुवात, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीमधील कल, हानि कमी करण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांचा परिणाम, विद्युत निर्मिती केंद्रातील संयत्र भार घटक (पीएलएफ)मध्ये आणि अन्य संबंधित घटकांमध्ये सुधारणा, या घटकांचा विचार करण्यात येईल.

१९.४ वितरण परवानाधारकाच्या विजेच्या एकूण वापरापैकी सह-निर्मितीच्या किंवा नूतनशील ऊर्जा स्त्रोतांकडून वीज खरेदी करण्याची टक्केवारी जर आयोगाने विनिर्दिष्ट केली असली तर, वीज खरेदीच्या योजनेत विनिर्दिष्ट केलेल्या पातळीपर्यंत अशा स्त्रोतांकडून वीज खरेदी करण्याची योजना समाविष्ट असेल.

१९.५ पारेषणमुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या संबंधित विनियमांनुसार तयार करण्यात आलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठीच्या पारेषण यंत्रणा आराखड्याशी, वीज खरेदीची योजना सुसंगत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी वितरण परवानाधारक राज्य पारेषण कंपनीकडे वीज खरेदीच्या योजनेची प्रत पाठवील :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, त्याची वीज खरेदीची योजना तयार करताना अशी योजना पारेषण यंत्रणा आराखड्याशी सुसंगत राखण्यासाठी राज्य पारेषण कंपनीचा सल्ला घेईल.

१९.६ आयोग, बहु-वर्षीय वीज दर याचिकेवरील आदेशाचा एक भाग म्हणून नियंत्रण कालावधीसाठीच्या वीज खरेदीच्या योजनेला मान्यता देईल.

१९.७ वितरण परवानाधारक, त्याची वीज खरेदीची योजना विनियम १९.१ नुसार सादर करण्याच्या वेळी अतिरिक्त माहिती ज्ञात नसल्यामुळे किंवा ती उपलब्ध नसल्यामुळे, अशी माहिती मिळाल्यानंतर, विनियम ८ खाली कामगिरीच्या मध्यावधी आढाव्यासाठीच्या त्याच्या याचिकेचा एक भाग म्हणून, त्याच्या वीज खरेदीच्या योजनेत, नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, फेरबदल करण्यासाठी आयोगाकडे याचिका सादर करू शकेल.

१९.८ आयोगाला, विनियम १९.६ नुसार वीज खरेदीच्या योजनेस परवानगी देण्याच्या वेळी अतिरिक्त माहिती नसल्यामुळे किंवा उपलब्ध नसल्यामुळे, अशी माहिती मिळाल्यानंतर, आयोग, त्यास उचित वाटल्यास, स्वतःहून किंवा वितरण परवानाधारकाकडून याचिका दाखल करण्यात आल्यावर, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याचा एक भाग म्हणून, नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, वितरण परवानाधारकाच्या वीज खरेदीच्या योजनेत फेरबदल करू शकेल.

१९.९ वितरण परवानाधारक, या विनियमांच्या **भाग ए** नुसार १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०२० पर्यंतच्या नियंत्रण कालावधीसाठी वीज दर निश्चित करण्यासाठीच्या त्याच्या याचिकेसह, १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या दहा (१०) वर्षांच्या कालावधीसाठी सूचक तत्त्वावर मागणी-पुरवठा स्थिती आणि ढोबळ वीज खरेदीची योजना देखील सादर करील, यामध्ये वीज खरेदीचे वेगवेगळे स्त्रोत आणि दीर्घ/मध्यम/अल्प कालिन मिश्र वीज खरेदी आणि अशा कालावधी दरम्यान वीज खरेदी खर्च इष्टतम करण्यासाठीच्या प्रस्तावित उपाययोजना नमूद करण्यात येतील.

## २०. दीर्घ-कालिन/मध्यम-कालिन वीज खरेदी करारास/व्यवस्थेस मान्यता—

२०.१ वितरण परवानाधारकाने निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा अन्य पुरवठ्याच्या स्त्रोतांकडून वीज खरेदीसाठी, राखीव तत्त्वावर (स्टॅण्डबाय) करावयाच्या खरेदीसह, केलेला प्रत्येक दीर्घ-कालिन/मध्यम-कालिन करार किंवा व्यवस्था आणि विद्यमान करार किंवा व्यवस्थेत करावयाचा कोणताही बदल, फक्त आयोगाच्या पूर्व-मान्यतेनेच अंमलात येईल :

परंतु असे की, नूतनशील ऊर्जा खरेदीच्या (आरपीओ) बंधनाची पूर्तता करण्यासाठी नूतनशील ऊर्जेच्या स्त्रोतांकडून सामान्य दराने किंवा अधिक पसंतीच्या दराने विजेच्या केलेल्या खरेदीस, या विनियमांनुसार आयोगाची पूर्व-मान्यता लागणार नाही.

२०.२ वीज खरेदी करार/व्यवस्थेच्या मंजुरीसाठीच्या याचिकेमध्ये त्याच्या कालावधीसाठीच्या वीज खरेदी योजनेचा समावेश असेल.

२०.३ आयोग विनियम २०.४ अंतर्गत जेव्हा कळवील तेव्हा, याचिकाकर्ता, आयोगाने ठरवून दिलेल्या नमुन्यानुसार आयोगाच्या मान्यतेसाठी यथोचित परिपूर्ण भरलेल्या जाहीर नोटीशीचे प्रारुप सादर करील.

२०.४ या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व आवश्यकतांची पूर्तता करणारी सर्व आवश्यक माहिती, तपशील व दस्तावेजांसह परिपूर्ण याचिका प्राप्त झाल्यानंतर, याचिका दाखल करून घेण्यात येईल आणि आयोग, किंवा आयोगाचा सचिव, किंवा पदनिर्देशित अधिकारी याचिका प्रसिद्धीस देण्यासाठी तयार असल्याचे याचिकाकर्त्याला कळवील.

२०.५ वरील विनियम २०.४ प्रमाणे कळविण्यात आल्यानंतर तीन दिवसांच्या आत याचिकाकर्ता, याचिकेशी संबंधित असलेल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खप असणाऱ्या कमीत कमी दोन इंग्रजी व दोन मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रांमध्ये एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करील, ज्यामध्ये वीज खरेदीसाठीचा प्रस्तावित करार किंवा व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये आणि वीज खरेदीचा खर्च व वीज दरावर होणारा परिणाम, आणि आयोगाकडून ठरवून देण्यात येतील अशा अन्य बाबीं स्पष्ट करून जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात येतील :

परंतु असे की, आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा ठिकाणी व अशा दराने, कोणत्याही व्यक्ती/संस्थेला संपूर्ण याचिकेची एक छापील प्रत याचिकाकर्ता उपलब्ध करून देईल :

परंतु आणखी असे की, याचिकाकर्ता, आयोगाने ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार, त्याच्या इंटरनेटवरील संकेतस्थळावर, आयोगाला सादर केलेली याचिका त्यासोबतची सर्व नियामक माहिती, तपशील व दस्तावेजासह प्रदर्शित करील :

परंतु असेही की, या विनियमांच्या दुसऱ्या परंतुकात उल्लेख केलेल्या माहितीकरिता देण्यात आलेली वेब-लिंक ही सहजपणे उपलब्ध होण्यासारखी आणि माहिती उतरवून घेण्याच्या सुविधेने युक्त असेल तसेच ती याचिकाकर्त्याच्या इंटरनेटवरील संकेतस्थळावर ठळकपणे प्रदर्शित करण्यात येईल :

परंतु असेही की, याचिकाकर्त्याला, गोपनीय स्वरूपाची असणारी कोणतीही माहिती, तपशील किंवा दस्तावेज देण्यापासून, आयोगाकडून सूट देता येईल.

२०.६ आयोग, वीज खरेदी करार किंवा व्यवस्था याकरिता मंजुरी मागण्यासाठी आलेल्या याचिका विचारात घेताना वितरण परवानाधारकाची मान्यता दिलेली वीज खरेदी योजना आणि खालील घटकांचा विचार करील :—

(ए) मान्यता दिलेल्या वीज खरेदी योजने अंतर्गत वीज खरेदी करण्याची आवश्यकता ;

(बी) अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे किंवा इतर पारदर्शक बोली प्रक्रियेचे पालन ;

(सी) या विनियमाच्या भाग 'ई' मध्ये वीज दर निश्चितीकरणासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे पालन ;

(डी) वीज बाजारपेठेत प्रचलित असलेला वीज दर आणि/किंवा अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत किंवा अन्य कलमांतर्गत स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून मिळालेला वीज दर यांच्या तुलनेत वीज दराची स्पर्धात्मकता :

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ६३ व्यतिरिक्त अन्य कलमांतर्गत स्पर्धात्मक बोली प्रक्रिया प्रस्तावित करावयाची झाल्यास वितरण परवानाधारक बोली दस्तावेजांना पूर्वमान्यता घेऊ शकेल :

परंतु आणखी असे की, आयोग अशा बोली प्रक्रियेसाठी मार्गदर्शक सूचना विहित करू शकेल ;

(इ) करार किंवा व्यवस्थेंतर्गत खरेदी केलेल्या विजेचे निष्कासन आणि पुरवठा करण्यासाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये क्षमतेची उपलब्धता (किंवा अपेक्षित उपलब्धता) ;

(एफ) सह-निर्मितीस आणि नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून आधारित विजेच्या निर्मितीस चालना देण्याची गरज.

२०.७ वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेबाबत आयोगाकडून विचार पूर्ण झाल्यानंतर, आयोग :—

(ए) वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेत योग्य ते फेरबदल करून आणि शर्ती घालून मान्यता देण्याचा आदेश निर्गमित करील ;

(बी) याचिकाकर्त्यास त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन, त्या संबंधीची कारणे लेखी नमूद करून, याचिका नाकारील.

**२१ अतिरिक्त वीज खरेदी.—**

२१.१ वितरण परवानाधारक, या विनियमांस अनुसरून, आयोगाने नियंत्रण कालावधीकरिता मान्यता दिलेल्या वीज खरेदी व्यतिरिक्त, अतिरिक्त वीज खरेदी संबंधित वर्षभरात करू शकेल.

२१.२ जर विजेच्या मागणीमध्ये अनपेक्षित वाढ झाल्यास किंवा मान्यता दिलेल्या पुरवठ्याच्या स्त्रोताकडून त्या वर्षात विजेचा कमी पुरवठा करण्यात आल्यास किंवा त्यात अपयश आल्यास, वितरण परवानाधारक वीज खरेदी करण्यासाठी अतिरिक्त करार किंवा व्यवस्था करू शकेल.

२१.३ आयोगाने पूर्वी मान्यता दिलेल्या स्त्रोतांसह अन्य स्त्रोतांकडून केलेल्या एका वर्षातील सहा महिन्यांच्या पहिल्या किंवा दुसऱ्या गटासाठी, वीज खरेदीवरील खर्चात किंवा परिमाणांत, आयोगाने मान्यता दिलेल्या वीज खरेदी खर्चापेक्षा पाच (५) टक्क्यांहून जास्त तफावत होण्याची शक्यता असेल, तर आयोगाची पूर्वमान्यता घ्यावी लागेल :

परंतु असे की, खरेदी केलेल्या विजेच्या खर्चातील तफावत जर स्ववापरासाठीच्या इंधन किमतीतील किंवा वीज खरेदीच्या स्थिर किंवा अस्थिर खर्चातील बदलामुळे झाला असेल तर पाच टक्क्यांची मर्यादा लागू असणार नाही, त्याची वसुली विनियम १० नुसार करण्यास परवानगी असते.

२१.४ वितरण परवानाधारकाने जर अल्पकालिन विजेच्या पुरवठ्यासाठी नवीन स्त्रोत शोधला असेल, ज्याच्याकडून करावयाच्या वीज खरेदीच्या दरामुळे जर परवानाधारकाच्या मान्यता दिलेल्या एकूण वीज खरेदीचा खर्च कमी होणार असेल तर, तो आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय अल्पकालिन वीज खरेदीसाठी अशा पुरवठादाराबरोबर करार किंवा व्यवस्था करू शकेल.

२१.५ जर वितरण यंत्रणेच्या स्थैर्याला धोका निर्माण करणारी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली असेल किंवा ग्रिड बंद पडू नये यासाठी तसे करण्यास एमएसएलडीसीने निर्देश दिले असतील तर, आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय वितरण परवानाधारक अल्पकालिन वीज खरेदीसाठी व्यवस्था किंवा करार करू शकेल.

२१.६ आयोगाच्या पूर्वमान्यतेची गरज नसेल अशा अल्पकालिन वीज खरेदीसाठी केलेल्या करार किंवा व्यवस्थेच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, वितरण परवानाधारक, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींची पूर्तता झाली आहे किंवा नाही याची पडताळणी करणे आयोगास शक्य व्हावे यासाठी, त्याचा तपशील म्हणजेच परिमाण, वीज दराची परिगणना, कालावधी, पुरवठादाराचा तपशील, पुरवठादाराच्या निवडीची पद्धत आणि आयोगाला हवा असेल असा अन्य तपशील, आयोगाला सादर करील.

२१.७ वितरण परवानाधारकाने करार किंवा व्यवस्था करताना वरील विनियम २१.२ ते २१.५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता करीत नसल्याबाबत आयोगाची पुरेशी खात्री झाली तर, आयोग, वीज खरेदीसाठी मान्यता दिलेल्या एकूण खर्चापेक्षा झालेला जादा खर्च किंवा वितरण परवानाधारकाला परिणामी झालेला कोणताही तोटा, ग्राहकांकडून वसूल करण्यास परवानगी देणार नाही.

## भाग-डी : वित्तीय तत्त्वे

**२२ वित्तीय काळजीपूर्वक तपासणी—**

२२.१ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी त्यांची निधी उभारणी इष्टतम आणि काळजीपूर्वक पद्धतीने करतील.

२२.२ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांची एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित करताना, आयोग, खालील घटकांच्या संबंधात घेतलेल्या वित्तीय काळजीची पडताळणी करील :—

(ए) महसूल ;

(बी) महसुली खर्च ;

(सी) भांडवली खर्च :

परंतु असे की, वरील बाबतीत घेतलेली काळजी अपुरी असल्याचे आढळून आले तर, आयोग, कार्यक्षमता वाढावी म्हणून, एकूण महसुली गरजेपैकी काही भाग मान्य करणार नाही.

२२.३ महसुलाच्या संबंधात घेतलेल्या वित्तीय काळजीची पडताळणी खालील मापदंडांच्या संदर्भात करण्यात येईल :—

(ए) वर्गवारीनिहाय विक्रीचा अंदाज वास्तव अंदाजावर आधारित आहे किंवा नाही, आणि अंदाजित केलेल्या विक्रीमधील कोणत्याही असंबद्ध वाढीसाठी वितरण परवानाधारकाकडून पुरेसे समर्थन देण्यात आले आहे किंवा नाही ;

(बी) पारेषण किंवा वितरण यंत्रणेमध्ये, जसे असेल तसे, अंतःक्षेपित केलेल्या एकूण युनिट्सशी निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने पाठविलेल्या देयकातील युनिट्सच्या टक्केवारीनुसार देयक आकारणीतील कार्यक्षमता मोजण्यात येईल ;

(सी) देयकांपोटी येणे असलेल्या एकूण रकमेशी निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने वसूल केलेल्या रकमेच्या टक्केवारीनुसार वसुलीतील कार्यक्षमता मोजण्यात येईल ;

(डी) लाभधारक/ग्राहकांकडून येणे असलेल्या थकबाकीत झालेली घट ;

(इ) वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, एकूण ग्राहक आणि वीज वापरापैकी अनुक्रमे मीटर असलेले ग्राहक आणि मीटरवर नोंदलेला वीज वापर यांची टक्केवारी ;

(एफ) वितरण परवानाधारकाने पाठविलेल्या एकूण देयकांपैकी अंदाजित वीज वापराच्या आधारे पाठविलेल्या देयकांची टक्केवारी ;

(जी) याचिकेमध्ये अंदाजित केलेल्या आणि आयोगाने दिलेल्या मान्यतेला अनुसरून महसूल वसूल झाला आहे किंवा नाही.

२२.४ महसुली खर्चाच्या संबंधात घेतलेल्या वित्तीय काळजीची पडताळणी खालील मापदंडांच्या संदर्भात करण्यात येईल :—

(ए) निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकांचे सर्व खर्च आणि अन्य कंपन्यांना देय असलेली प्रदाने वेळेवर करण्यात येतात किंवा नाही हे पाहण्यासाठी प्राप्त केलेल्या महसुलातून केलेल्या महसुली खर्चाचे संनियंत्रण करणे ;

(बी) दीर्घकालिन कर्ज आणि खेळत्या भांडवलासाठीचे व्याज प्रदान करण्याच्या वेळापत्रकासह, महसुली खर्च मान्यता दिलेल्या महसुली खर्चाच्या मर्यादेत होत आहे किंवा नाही याचे संनियंत्रण करण्यासाठी पद्धती अंमलात आणणे ;

(सी) विनियम १८, १९, २० आणि २१ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्यानुसार, वीज खरेदीचा खर्च इष्टतम रीतीने करण्याच्या उद्दिष्टासह वीज खरेदीची पारदर्शक पद्धती ;

(डी) इष्टतम विजेची खरेदी पुढील घटक विचारात घेऊन जसे की, विजेची आवश्यकता, मेरिट ऑर्डर डिस्पॅच, विविध स्त्रोतांकडून वीज खरेदीचा दर व शिल्लक विजेच्या विक्रीचा विद्युत बाजारपेठेतील दर, असल्यास, यांच्यामधील फरकाच्या आधारे अतिरिक्त नक्त महसूल मिळण्याची शक्यता :

परंतु असे की, महसुली खर्च हा प्राप्त महसुलाच्या रकमेपेक्षा ५ टक्क्यांहून जास्त झाला तर, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक त्याच्या अचूक समायोजनासाठीच्या याचिकेत तफावतीबाबतचे तपशीलवार समर्थन सादर करील, त्यात महत्त्वाच्या शीर्षकाखाली याचिकेत प्रस्तावित केलेला, आयोगाने मान्यता दिलेला व प्रत्यक्ष झालेला महसुली खर्च आणि महसूल यांची तुलना सादर करील :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक संबंधित व्यवसायासाठी सविस्तर रोकड आवक विवरणपत्र सादर करील; त्यामध्ये महसुलाचे विविध स्त्रोत, विजेच्या विक्रीसाठी वेगवेगळ्या ग्राहक वर्गवारींना पाठविलेल्या देयकाच्या रकमेपोटी प्रत्यक्ष वसूल केलेली रक्कम, अंदाजित व मान्यताप्राप्त महसुली खर्च व भांडवली खर्चाशी प्रत्यक्ष महसुली खर्च आणि भांडवली खर्च यांची तुलना समाविष्ट असेल :

परंतु असेही की, अन्य व्यक्ति/संस्था यांना त्यांनी करावयाची प्रदाने नियमितपणे केली नसल्यास, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक त्याबाबतचे समर्थन रोकड आवक विवरणपत्राच्या संदर्भात देईल.

२२.५ खालील मापदंडाच्या संदर्भात भांडवली खर्चाच्या संबंधात घेण्यात आलेल्या वित्तीय काळजीची पडताळणी करण्यात येईल :—

(ए) प्रकल्पाच्या मूळ वेळापत्रकाच्या संबंधात प्रकल्पाच्या भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक योग्य पद्धत अवलंबतील ;

(बी) भांडवली खर्चाच्या योजनेच्या भौतिक प्रगतीनुसार इष्टतम कर्ज घेणे आणि अशा कर्जाचा कार्यक्षम वापर करणे ;

(सी) जर प्रत्यक्ष भांडवली खर्च किंवा भांडवलीकरण मान्यताप्राप्त भांडवली खर्चाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त झाले तर, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक या तफावतीचे सविस्तर समर्थन, अचूक समायोजनासाठीच्या त्यांच्या याचिकेबरोबर सादर करील ;

(डी) आयोगाने मान्यता दिलेली असताना देखील जर कोणतीही योजना त्या वर्षभरात सुरू करण्यात आली नाही तर, अचूक समायोजनाच्या याचिकेबरोबर सविस्तर समर्थन सादर करण्यात येईल.

## २३. भांडवली खर्च आणि भांडवल रचना—

२३.१ भांडवली गुंतवणूक प्रकल्पाच्या भांडवली खर्चात खालील बाबींचा समावेश असेल :—

(ए) बांधकामाच्या कालावधीतील व्याज आणि भांडवल उभारणीसाठीच्या खर्चासह, प्रत्यक्षात केलेला किंवा प्रस्तावित केलेला खर्च, ज्यास आयोगाने, काळजीपूर्वक छाननीनंतर मान्यता दिलेली असेल ;

(बी) या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कमाल मर्यादा दरांच्या अधीन राहून भांडवलीकृत करण्यात आलेले सुरुवातीचे सुटे भाग ;

(सी) वहिवाटीचा हक्क प्राप्त करण्यासाठी परवानाधारकाने केलेला खर्च, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून आयोगाने मान्यता दिल्यानुसार ;

(डी) विनियम २४ खाली निश्चित करण्यात आलेले अतिरिक्त भांडवलीकरण ;

(इ) वाणिज्यिक कामकाजाच्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या कर्जाच्या रकमेशी संबंधित परकीय चलनातील विनिमय दरातील बदलामुळे होणारा कोणताही नफा किंवा तोटा, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून आयोगाने मान्यता दिल्यानुसार :

परंतु असे की, वाणिज्यिक कामकाज सुरू होण्याच्या दिनांकापर्यंत प्राप्त केलेल्या कर्जाच्या रकमेशी संबंधात परकीय विनिमय दरातील बदलामुळे होणारा कोणताही नफा किंवा तोटा केवळ भांडवली खर्चाच्या फक्त कर्जाच्या भागात समायोजित करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, प्रकल्पाचा भाग असलेल्या मत्ता, ज्या वापरात आणलेल्या नाहीत किंवा वापरात नसतील, त्यांच्यावरील खर्च भांडवली खर्चातून वगळण्यात येईल :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक वापरात असल्याच्या त्याच्या मत्तेच्या दाव्याच्या समर्थनार्थ आवश्यक कागदोपत्री पुरावा सादर करील :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या विशिष्ट गरजेवर आधारे करण्यात आलेल्या कोणत्याही भांडवली खर्चासाठी अशा विनंतीचा आवश्यक कागदोपत्री पुरावा आणि प्राप्त झालेले हमीपत्र देण्यात येईल.

२३.२ आयोगाकडून काळजीपूर्वक छाननीनंतर मान्यता देण्यात आलेला भांडवली खर्च हा वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आधार राहील :

परंतु असे की, काळजीपूर्वक छाननी करताना, भांडवली खर्चाचा वाजवीपणा, भांडवलाची उभारणी ज्यामध्ये निधी उभारण्याचे पर्याय व पद्धती, बांधकामाच्या कालावधीतील व्याज, कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर, विलंबामुळे झालेला जादा खर्च आणि लागलेला जादा वेळ, आणि आयोगाला वीज दराच्या निश्चितीकरणासाठी उचित वाटतील अशा अन्य बाबी विचारात घेण्यात येतील.

२३.३ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी मान्यता देण्यात आलेला भांडवली खर्च विचारात घेण्यात येईल आणि भांडवली खर्चातील कोणतीही वाढ ज्यासाठी पुरेसे समर्थन देण्यात आल्यास असा खर्च, आयोगाकडून, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून आणि विनियम ३८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्ती आणि पद्धतीनुसार, विचारात घेण्यात येईल :

परंतु असे की, जर मान्यता दिलेल्या भांडवली खर्चापेक्षा प्रत्यक्ष भांडवली खर्च कमी झाला असेल तर वीज निर्मिती कंपनीच्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी प्रत्यक्ष झालेला भांडवली खर्च, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, आणि विनियम ३८ मध्ये नवीन निर्मिती संच/केंद्राच्या भांडवली खर्चासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्ती आणि पद्धतीस अनुसरून, विचारात घेण्यात येईल.

२३.४ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी किंवा प्रकल्प, जसे असेल तसे, यांच्या मूळ कामाच्या व्याप्तीसाठी भांडवली खर्चाच्या योजनेच्या वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याच्या दिनांकापर्यंतच्या लेखापरीक्षित लेख्यांवर आधारित प्रत्यक्ष भांडवली खर्च आयोगाकडून काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून विचारात घेण्यात येईल.

२३.५ आयोग, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता, त्या वर्षासाठी मान्यता दिलेल्या एकूण भांडवली खर्चाच्या २०% इतकी अतिरिक्त सममूल्य रक्कम, आयोगाने अद्याप मान्यता द्यावयाच्या नियोजन केलेल्या किंवा नियोजन न केलेल्या भांडवली खर्चाकरिता, मंजूर करू शकेल.

२३.६ कोणत्याही वर्षासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल नसलेल्या योजनांकरिता भांडवलीकरणाची रक्कम त्या वर्षाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल असलेल्या योजनांकरिता भांडवलीकरणासाठी आयोगाने मंजूर केलेल्या रकमेच्या २० टक्क्यांपेक्षा किंवा आयोगाकडून आदेशाच्या माध्यमातून ठरवून देण्यात आलेल्या अशा अन्य मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही :

परंतु असे की, आयोग, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने विनंती केल्यास, कोणत्याही वर्षासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल नसलेल्या योजनांकरिता २० टक्क्यांपेक्षा किंवा आयोगाने आदेशाच्या माध्यमातून ठरवून दिलेल्या अन्य मर्यादेपेक्षा जास्त भांडवलीकरणाला मान्यता देऊ शकेल.

२३.७ जर वीज खरेदी करार किंवा ठोक वीज पारेषण करारामध्ये भांडवली खर्चावरील मर्यादेसाठी तरतूद करण्यात आलेली असेल तर विचारात घ्यावयाचा भांडवली खर्च अशा मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही.

२३.८ विनियम ४२ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याच्या दिनांकापूर्वी इंधन खर्चापेक्षा जास्त केलेल्या अनिश्चित विजेच्या विक्रीतून मिळालेला महसूल भांडवली खर्चात समायोजित करण्यात येईल.

२३.९ खालील कमाल मर्यादा निकषांच्या अधीन राहून, अंतिम मुदतीच्या दिनांकापर्यंतच्या संयत्र व मशिनरीच्या खर्चाच्या टक्केवारीत भांडवलीकृत करण्यात आलेल्या सुरुवातीच्या सुट्या भागांचा भांडवली खर्चात समावेश असू शकेल :—

| | | |
|---|---|---|
| (ए) कोळशावर आधारित/लिग्नाईटवर प्रज्वलित निर्मिती केंद्रे | : | ४.०% |
| (बी) वायु टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्र | : | ४.०% |
| (सी) पम्प्ड स्टोअरेज जल विद्युत निर्मिती केंद्रांसहित जल विद्युत निर्मिती केंद्रे | : | ४.०% |
| (डी) पारेषण यंत्रणा आणि वितरण यंत्रणा :— | | |
| (एक) पारेषण वाहिनी आणि वितरण वाहिनी | : | १.०% |
| (दोन) पारेषण उप-केंद्र आणि वितरण उप-केंद्र (हरीत क्षेत्र) | : | ४.०% |
| (तीन) पारेषण उप-केंद्र (ब्राऊन फिल्ड) | : | ६.०% |
| (चार) सिरीज नुकसानभरपाई उपकरणे आणि एचव्हीडीसी उप-केंद्र | : | ४.०% |
| (पाच) गॅस इन्सुलेटेड उप-केंद्र | : | ५.०% |
| (सहा) संपर्क यंत्रणा | : | ३.५% |

२३.१० निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या वीज दरामध्ये वाढ होत नसेल तर मत्तेच्या पुनर्मुल्यांकनाच्या परिणामास परवानगी देण्यात येईल :

परंतु असे की, अशा पुनर्मुल्यांकनापासूनचा कोणताही लाभ, निर्मिती कंपनीच्या बाबतीत क्षमता आकारांत वाटणीतील सहभागी व्यक्तींकरिता, पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या दीर्घ-कालिन राज्यांतर्गत मुक्त प्रवेश ग्राहकांना, किंवा किरकोळ वीज पुरवठा ग्राहकांना, जसे असेल तसे, बहु-वर्षीय वीज दराच्या निश्चितीकरणाच्या वेळी किंवा मध्यावधी आढाव्याच्या वेळी किंवा नियंत्रण कालावधीसाठी अंतिम अचूक समायोजनाच्या वेळी, देण्यात येईल.

२३.११ जुन्या स्थिर मत्तांच्या बदली दुसरी मत्ता घेण्यावर, त्यांच्या नुतनीकरण आणि आधुनिकीकरण किंवा त्यांचे आर्युमान वाढविण्यावर झालेला कोणताही खर्च, जो निर्मिती कंपन्या किंवा परवानाधारकांना लागू असेल तो, अशा बदली केलेल्या मत्तेचे निव्वळ मूल्य निर्लेखित केल्यानंतर, विचारात घेण्यात येईल आणि त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :—

$$\text{Net Value of Replaced Assets} = \text{OCRA} - \text{AD}$$

जेथे—

OCRA : बदली केलेल्या मत्तांवरील मूळ भांडवली खर्च ;

AD : बदली केलेल्या मत्तांशी संबंधित संचित घसारा :

परंतु असे की, बदली केलेल्या मत्तेच्या मूळ भांडवली खर्च कोणत्याही कारणामुळे उपलब्ध नसल्यास, तो आयोगाकडून प्रकरण-निहाय तत्त्वावर विचारात घेण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही मत्तेच्या नुकसानीमुळे अशी मत्ता बदली करण्याच्या आवश्यकतेतून विम्याची रक्कम प्राप्त झाली तर, असल्यास, अशी रक्कम प्रथम प्रत्यक्ष शिल्लक किंवा प्रमाणकानुसार कर्जात समायोजित करण्यात येईल, आणि शिल्लक रक्कम, असल्यास, अशा बदली केलेल्या मत्तेचा भांडवली खर्च कमी करण्यासाठी वापरण्यात येईल, आणि आणखी कोणतीही शिल्लक रक्कम, राहिली असल्यास, ती वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न म्हणून विचारात घेण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या विनियमांच्या प्रयोजनासाठी, "नूतनीकरण आणि आधुनिकीकरण" या शब्दांचा अर्थ आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम ८० आय ए मधील अर्थानुसार राहील.

**२४ अतिरिक्त भांडवलीकरण—**

२४.१ वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजास सुरुवात झाल्यानंतर आणि अंतिम मुदतीच्या दिनांकापर्यंत, कामाच्या मूळ व्याप्ती अंतर्गत खालील कारणांसाठी प्रत्यक्षात केलेला किंवा प्रस्तावित करण्यात आलेला भांडवली खर्च, आयोगाकडून, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मान्य करण्यात येईल :—

(एक) भविष्यात देय असलेली पार न पाडलेली दायित्वे ;

(दोन) अंमलबजावणी स्थगित करण्यात आलेली कामे ;

(तीन) विनियम २३ मधील तरतुदींनुसार, कामाच्या मूळ व्याप्तीमधील सुरुवातीच्या भांडवली सुट्या भागांची खरेदी ;

(चार) लवादाच्या निवाड्याचे दायित्व पूर्ण करणे किंवा न्यायालयाचा आदेश किंवा डीक्री यांची पूर्तता करणे ; आणि

(पाच) कायद्यातील बदल किंवा कोणत्याही विद्यमान कायद्याची पूर्तता :

परंतु असे की, निर्मिती संयत्र/केंद्र किंवा पारेषण यंत्रणेच्या वाणिज्यिक तत्त्वावरील कामकाजाच्या दिनांकानंतर अंतिम वीज दराच्या निश्चितीकरणासाठी पाठवावयाच्या याचिकेसोबत कामाच्या मूळ व्याप्तीमध्ये समाविष्ट असलेल्या कामांच्या तपशीलासह खर्चाचे अंदाज, भविष्यात अदा करावयाची दायित्वे आणि अंमलबजावणी स्थगित करण्यात आलेली कामे यांची माहिती देण्यात येईल.

२४.२ नवीन प्रकल्पाच्या बाबतीत, अंतिम मुदतीच्या दिनांकानंतर, कामाच्या मूळ व्याप्तीअंतर्गत खालील कारणांसाठी प्रत्यक्षात केलेला किंवा प्रस्तावित करण्यात आलेला भांडवली खर्च, आयोगाकडून, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मान्य करण्यात येईल :—

(एक) लवादाच्या निवाड्याचे दायित्व पूर्ण करणे किंवा न्यायालयाचा आदेश किंवा डीक्री यांची पूर्तता करणे ;

(दोन) कायद्यातील बदल किंवा कोणत्याही विद्यमान कायद्याची पूर्तता ;

(तीन) कामाच्या मूळ व्याप्तीमधील राखेचे तळे किंवा राख हाताळणीच्या यंत्रणेशी संबंधित स्थगित कामे ;

(चार) अंतिम मुदतीच्या दिनांकापूर्वी करण्यात आलेल्या कामांसाठीचे पार न पाडलेले दायित्व, अशा पार न पडलेल्या दायित्वाच्या तपशीलाच्या म्हणजे पॅकेजचा एकूण अंदाजित खर्च, अशी प्रदाने रोखून धरण्याची कारणे आणि अशी प्रदाने अदा करणे इ.च्या काळजीपूर्वक छाननीनंतर.

२४.३ संपर्क यंत्रणेसह विद्यमान निर्मिती केंद्र किंवा पारेषण यंत्रणेच्या बाबतीत, अंतिम मुदतीच्या दिनांकानंतर, खालील कारणांसाठी केलेला किंवा प्रस्तावित करण्यात आलेला भांडवली खर्च, आयोगाकडून, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मान्य करण्यात येईल :—

(एक) लवादाच्या निवाड्याचे दायित्व पूर्ण करणे किंवा न्यायालयाचा आदेश किंवा डीक्री यांची पूर्तता करणे ;

(दोन) कायद्यातील बदल किंवा कोणत्याही विद्यमान कायद्याची पूर्तता ;

(तीन) संबंधित शासकीय एजन्सीने दिलेल्या सल्ला किंवा निर्देशांनुसार संयंत्राची उच्च सुरक्षितता आणि सुरक्षा राखण्याच्या गरजेपोटी करावयाचा कोणताही खर्च ;

(चार) कामाच्या मूळ व्याप्तीमधील राखेचे तळे किंवा राख हाताळणीच्या यंत्रणेशी संबंधित स्थगित कामे ;

(पाच) अंतिम मुदतीच्या दिनांकापूर्वी करण्यात आलेल्या कामांसाठीचे पार न पाडलेले दायित्व, अशा पार न पडलेल्या दायित्वाच्या तपशीलाच्या म्हणजे पॅकेजचा एकूण अंदाजित खर्च, अशी प्रदाने रोखून धरण्याची कारणे आणि अशी प्रदाने अदा करणे इ.च्या काळजीपूर्वक छाननीनंतर ;

(सहा) अंतिम मुदतीच्या दिनांकानंतर प्रत्यक्ष प्रदाने अदा करून अशी दायित्वे पार पाडण्याच्या मर्यादेपर्यंत, आयोगाने मान्यता दिलेल्या कामासाठीचे कोणतेही दायित्व ;

(सात) कार्यक्षम संचालनासाठी आवश्यक झालेला कोणताही अतिरिक्त भांडवली खर्च :

परंतु असे की, मत्तांचा ऱ्हास, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान, तंत्रज्ञान जुने होणे, दोष पातळीत वाढ होणे यासारख्या तांत्रिक कारणासाठी क्षमतेची श्रेणीवाढ करणे, अशा प्रकरणातील दावा, स्वतंत्र एजन्सीने केलेल्या चाचणीतून निघालेल्या निष्कर्षाच्या कागदोपत्री पुराव्यामुळे यथोचितपणे पुष्टी मिळणाऱ्या तांत्रिक समर्थनाने, भक्कम करण्यात येईल ;

(आठ) जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, कोणताही खर्च, जो नैसर्गिक आपत्तीने झालेल्या नुकसानीमुळे (निर्मिती कंपनीच्या निष्काळजीपणाशी संबंध जोडता येईल अशा पॉवर हाऊसमध्ये आलेल्या पुरामुळे झालेले नुकसान नव्हे) आणि भूशास्त्रीय कारणामुळे, कोणत्याही विमा योजनेतून मिळणारी रक्कम समायोजित केल्यानंतर, आवश्यक झाला असेल आणि संयंत्राच्या यशस्वी व कार्यक्षम संचालनासाठी आवश्यक झालेल्या कोणत्याही अतिरिक्त कामांवर केलेला खर्च ;

(नऊ) पारेषण यंत्रणेच्या बाबतीत, रिलेज्, कंट्रोल आणि इन्स्ट्रुमेंटेशन, संगणक प्रणाली, पॉवर लाईन कॅरीयर कम्युनिकेशन, बॅटरीज्, मनोऱ्याचे मजबुतीकरण, संपर्क उपकरण, परिस्थिती पूर्ववत करण्यासाठीची आणीबाणितील यंत्रणा, पायाभूत सुविधांची सफाई करणारे इन्सुलेटर्स, आणि पारेषण यंत्रणेच्या यशस्वी आणि कार्यक्षम संचालनासाठी आवश्यक असलेले अन्य खर्च, या बाबींवर झालेला कोणताही अतिरिक्त खर्च ;

(दहा) निर्मिती केंद्राच्या नियंत्रणात नसलेल्या परिस्थितीमुळे औष्णिक निर्मिती केंद्राच्या संदर्भात पूर्ण कोळसा लिंकेजशी अनुरूप कोळशाचा पुरवठा न झाल्यामुळे इंधन रिसिव्हींग यंत्रणेमध्ये आवश्यक असलेल्या किंवा करण्यात आलेल्या सुधारणांमुळे करावा लागलेला, काळजीपूर्वक छाननीनंतर समर्थनीय ठरलेला, कोणताही भांडवली खर्च :

परंतु असे की, संचालन व देखभाल खर्चांतर्गत नूतनीकरण व आधुनिकीकरणांतर्गत किंवा दुरुस्ती व देखभालींतर्गत मागणी करण्यात आलेला कोणताही खर्च, या विनियमांतर्गत मागण्यांत येणार नाही.

२४.४ वीज दरावरील अतिरिक्त भांडवलीकरणाचा परिणाम, असल्यास, पुढील नियंत्रण कालावधीसाठी मध्यावधी आढावा किंवा वीज दराच्या निश्चितीकरणाच्या वेळी, जसे असेल तसे, विचारात घेण्यात येईल.

**२५. ग्राहक वर्गणी, अनामतीवर आधारित कामे, मदत आणि भांडवली अनुदान—**

२५.१ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांच्याकडून करण्यात येत असलेल्या खालील वर्गवारीतील कामांचा खर्च विनियम २५.२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे हाताळण्यात येईल :—

(ए) उपयोगकर्त्याकडून अंशतः किंवा पूर्णतः देण्यात आलेल्या निधीतून करण्यात आलेली अनामती कामे किंवा ग्राहक वर्गणीची कामे ;

(बी) राज्य आणि केंद्र शासनांकडून प्राप्त झालेली मदत किंवा भांडवली अनुदानातून हाती घेतलेली भांडवली कामे ;

(सी) ज्या रकमा परत करण्याचे कोणतेही बंधन नसते किंवा ज्यांच्यावर कोणतेही व्याज लावण्यात येत नाही अशा निधीतून हाती घेतलेली अन्य कामे.

२५.२ अशा भांडवली कामांवरील खर्च खालीलप्रमाणे हाताळण्यात येतील :—

(ए) या विनियमांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, प्रमाणकानुसार संचालन व देखभाल खर्च, मंजूर करण्यात येतील ;

(बी) प्राप्त झालेल्या अशा आर्थिक सहाय्याची रक्कम वजा केल्यानंतर, विनियम २६ नुसार कर्ज-भागभांडवल गुणोत्तर विचारात घेण्यात येईल ;

(सी) प्राप्त झालेल्या अशा आर्थिक सहाय्याच्या मर्यादेपर्यंत, विनियम २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या घसाऱ्याशी संबंधित तरतुदी लागू राहणार नाहीत ;

(डी) प्राप्त झालेल्या अशा आर्थिक सहाय्याच्या मर्यादेपर्यंत, विनियम २८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भागभांडवलावरील परताव्यासंबंधीच्या तरतुदी लागू राहणार नाहीत ;

(इ) प्राप्त झालेल्या अशा आर्थिक सहाय्याच्या मर्यादेपर्यंत, विनियम २९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कर्ज भांडवलावरील व्याजाशी संबंधित तरतुदी लागू राहणार नाहीत.

**२६. कर्ज -भागभांडवल गुणोत्तर—**

२६.१ दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी किंवा त्यानंतर वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज घोषित केलेल्या भांडवली गुंतवणुकीच्या योजनेकरिता, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याच्या दिनांकारोजीचे कर्ज-भागभांडवली गुणोत्तर आयोगाने, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी काळजीपूर्वक छाननी करून, विनियम २३ अंतर्गत मंजूर केलेल्या भांडवली खर्चाच्या रकमेच्या ७०:३० इतके राहील :

परंतु असे की, प्रत्यक्ष गुंतविलेले भागभांडवल हे भांडवली खर्चाच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर ३० टक्क्यांपेक्षा जास्त असलेले भाग भांडवल हे निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीच्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी प्रमाणकानुसार कर्ज म्हणून समजण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी प्रत्यक्षात गुंतविलेल्या भागभांडवलासाठी कागदोपत्री पुरावा सादर करील आणि भागभांडवलासाठीच्या निधीचा स्त्रोत स्पष्ट करील :

परंतु असे की, जर गुंतविलेले भागभांडवल हे भांडवलीकृत केलेल्या मत्तेच्या भांडवली खर्चाच्या ३० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर, प्रत्यक्ष गुंतविलेले भागभांडवल हे वीज दराच्या निश्चितीकरणासाठी विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, परकीय चलनात गुंतविलेले भागभांडवल हे प्रत्येक गुंतवणुकीच्या दिनांकाच्या दिवशी भारतीय रुपयामध्ये दाखविण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.—निर्मिती कंपनी, किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, यांनी प्रकल्पाच्या निधी उभारणीकरिता भागभांडवल उभारताना आणि त्यांच्या राखीव निधीतून केलेल्या अंतर्गत स्रोतांची गुंतवणूक करताना त्यांनी जर काही अधिमूल्य (प्रिमिअम) आकारले तर, भागभांडवलावरील परताव्याची परिगणना करण्यासाठी ते भरणा केलेले भांडवल म्हणून समजण्यात येईल; परंतु असे की, अशी अधिमूल्याची रक्कम आणि अंतर्गत स्रोत यांचा प्रत्यक्षात वापर निर्मिती केंद्र, पारेषण यंत्रणा किंवा वितरण यंत्रणेचा भांडवली खर्च भागविण्यासाठी करणे आणि आयोगाने मान्यता दिलेल्या भांडवली खर्चाच्या ३०% च्या मर्यादेच्या आत असणे, आवश्यक आहे.

२६.२ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या बाबतीत जर १ एप्रिल २०१६ पूर्वी भांडवली खर्चाच्या योजनेमुळे जर कोणत्याही स्थिर मत्तेचे भांडवलीकरण करण्यात आले तर, ३१ मार्च २०१६ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाने परवानगी दिलेले कर्ज - भागभांडवल गुणोत्तर विचारात घेण्यात येईल :

परंतु असे की, वापरातून बाद केलेल्या किंवा बदली केलेल्या किंवा नि-भांडवलीकरण केलेल्या मत्तेच्या बाबतीत वर उल्लेखलेले मान्यता दिलेले भागभांडवल, अशा मत्तांवरील मूळ खर्चाच्या ३० टक्क्यापर्यंत (किंवा ३० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास, कागदोपत्री पुराव्याच्या आधारे प्रत्यक्ष भाग भांडवलाच्या भागाइतके), कमी करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, वापरातून बाद केलेल्या किंवा बदली केलेल्या किंवा नि-भांडवलीकरण केलेल्या मत्तेच्या बाबतीत, वर उल्लेखलेले मान्यता दिलेले कर्ज भांडवल, कागदोपत्री पुराव्याच्या आधारे अशा मत्तेच्या मूळ खर्चाच्या शिल्लक कर्जाच्या भागाच्या मर्यादेपर्यंत किंवा प्रमाणकानुसार कर्जाच्या भागाच्या मर्यादेपर्यंत, जसे असेल तसे, कमी करण्यात येईल.

२६.३ १ एप्रिल २०१६ रोजी किंवा त्यानंतर केलेला किंवा प्रस्तावित केलेला कोणताही खर्च, ज्यास आयोगाने वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आणि आयुर्मान वाढविण्यासाठी नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाकरिता अतिरिक्त भांडवली खर्च म्हणून मान्यता दिली असेल असा खर्च, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे हाताळण्यात येईल.

**२७. घसारा—**

२७.१ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांना, खाली नमूद केलेल्या पद्धतीस अनुसरून परिगणना केलेल्या, त्यांच्या संबंधित व्यवसायात वापरलेल्या स्थिर मत्तेच्या मूल्यावर घसारा वसूल करण्यास परवानगी देण्यात येईल :—

(ए) स्थिर मत्तेचा मान्यता दिलेला मूळ खर्च हा घसाऱ्याच्या परिगणनेसाठी आधार-मूल्य राहील ;

परंतु असे की, वापरातून बाद केलेल्या किंवा बदली केलेल्या किंवा नि-भांडवलीकरण केलेल्या मत्तेचा मान्यता दिलेला मूळ खर्च कमी केल्यानंतर, नवीन मत्तेच्या भांडवलीकृत केलेल्या संपूर्ण रकमेवर घसारा अनुज्ञेय राहील.

(बी) या विनियमांच्या **जोडपत्र - १** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने सरळ-रेषा पद्धतीने वार्षिक तत्त्वावर घसाऱ्याची परिगणना करण्यात येईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, प्रत्येक मत्तेवर सत्तर टक्के घसारा एकदा काढण्यात आल्यानंतर, त्या वर्षाच्या अखेरीस ३१ मार्च रोजी घसारा आकारण्यायोग्य उर्वरित रक्कम ही, या विनियमांतील तरतुदीप्रमाणे त्या मत्तेच्या उर्वरित उपयुक्त आर्युमानाच्या कालावधीत विभागलेली असेल, याची खात्री करील :

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक वरीलप्रमाणे केलेल्या कृतीला पुष्टी देण्यासाठी आवश्यक असेल असा तपशील किंवा कागदोपत्री पुरावा आयोगाला सादर करील.

(सी) मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या जास्तीत जास्त ९० टक्क्यांपर्यंत घसारा आकारण्यास परवानगी देण्यात येईल आणि अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या १० टक्के रक्कम ही या मत्तेचे भंगार मूल्य म्हणून विचारात घेण्यात येईल.

२७.२ भाडे-पट्ट्यावर घेतलेल्या जमिनीशिवाय असलेली अन्य जमीन आणि विद्युत जल-निर्मिती केंद्राच्या बाबतीत रिझर्वायरसाठी असलेली जमीन, ही घसारा आकारण्या-योग्य मत्ता नसेल आणि अशा जमिनीवरील खर्च, मत्तेचे घसारा आकारणी-योग्य मूल्य काढताना, भांडवली खर्चातून वगळण्यात येईल.

२७.३ विद्यमान मत्तांच्या बाबतीत, मत्तांच्या घसारा आकारण्यायोग्य एकूण मूल्यातून, ३१ मार्च २०१६ पर्यंत आयोगाने मान्यता दिलेली संचयी तत्त्वावर काढलेली घसाऱ्याची रक्कम वजा करून, दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी असलेले शिल्लक घसारा आकारणीयोग्य मूल्य काढण्यात येईल :

परंतु असे की, घसारा हा वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्याच्या पहिल्या वर्षापासून आकारणीयोग्य राहील.

२७.४ वर्षाच्या काही भागासाठी मत्तांचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज करण्याचे योजिले असल्यास, वर्षाच्या सुरुवातीस आणि अखेरीस असलेल्या मत्तांच्या मूल्याच्या सरासरीच्या आधारे घसाऱ्याची परिगणना करण्यात येईल.

२७.५ कामगिरीच्या मध्यावधी आढाव्यासह अचूक समायोजनाच्या वेळी किंवा नियंत्रण कालावधीच्या शेवटी, भांडवलीकृत केलेल्या मत्तेच्या घसाऱ्याची फेर-परिगणना करण्यात येईल. घसाऱ्याला भांडवलीकरणाच्या दिनांकापासून यथाप्रमाणात मान्यता देण्यात आली आहे, याबाबत आयोगाने करावयाच्या काळजीपूर्वक छाननीस अधीन राहून, ही फेर-परिगणना, याचिकाकर्त्याने भांडवलीकृत केलेल्या मत्तांच्या कागदोपत्री पुराव्यावर, आधारित असेल.

**२८. भागभांडवलावरील परतावा—**

२८.१ वापरात असलेल्या मत्तांकरिता विनियम २६ नुसार निश्चित केलेल्या भागभांडवलावर दरवर्षी १५.५ टक्के दराने, भारतीय रुपयामध्ये, निर्मिती कंपनीसाठी भागभांडवलावरील परताव्यास मान्यता देण्यात येईल.

२८.२ वापरात असलेल्या मत्तांकरिता विनियम २६ नुसार निश्चित केलेल्या भागभांडवलावर दरवर्षी १५.५ टक्के दराने, भारतीय रुपयामध्ये, पारेषण परवानाधारक, वितरण परवानाधारकाचा वायर्स व्यवसाय आणि एमएसएलडीसीकरिता भागभांडवलावरील परताव्यास मान्यता देण्यात येईल. आणि वितरण परवानाधारकाच्या किरकोळ विजेच्या पुरवठ्यासाठी विनियम २६ नुसार निश्चित करण्यात आलेल्या भाग भांडवलाच्या रकमेवर दरवर्षी १७.५ टक्के दराने, भारतीय रुपयामध्ये, मान्यता देण्यात येईल.

२८.३ भागभांडवलावरील परताव्याची परिगणना खालील पद्धतीने करण्यात येईल :—

(ए) वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या भागभांडवलाच्या रकमेवर लागू केलेल्या या विनियमांतील अनुज्ञेय दराने परतावा, अधिक

(बी) निर्मिती व्यवसाय किंवा पारेषण व्यवसाय किंवा वितरण व्यवसाय किंवा एमएसएलडीसीच्या वापरात असलेल्या गुंतवणुकांवर, अशा वर्षासाठी, अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या भागभांडवलाच्या भागाच्या ५० टक्क्यांवर लागू केलेल्या, या विनियमांतील अनुज्ञेय दराने परतावा.

**२९. कर्जावरील व्याज—**

२९.१ वापरात असलेल्या मत्तांवर विनियम २६ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीप्रमाणे काढलेले कर्ज, हे कर्जावरील व्याजाची परिगणना करण्यासाठी एकूण प्रमाणकानुसार कर्ज म्हणून विचारात घेण्यात येईल :

परंतु असे की, मत्ता वापरातून बाद केल्यास किंवा बदली केल्यास किंवा नि-भांडवलीकरण केल्यास वर उल्लेखलेले मान्यता दिलेले कर्ज भांडवल, कागदोपत्री पुराव्याच्या आधारे, अशा मत्तेच्या मूळ खर्चाच्या शिल्लक कर्जाच्या भागाच्या मर्यादेपर्यंत कमी करण्यात येईल.

२९.२ आयोगाने ३१ मार्च २०१६ पर्यंत मान्यता दिलेली संचयी परतफेड एकूण प्रमाणकानुसार कर्जातून वजा करून दि. १ एप्रिल २०१६ रोजी प्रमाणकानुसार शिल्लक कर्जाची रक्कम काढण्यात येईल.

२९.३ आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० पर्यंतच्या नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी परतफेड ही त्या संबंधीत वर्षातील अनुज्ञेय घसाऱ्याच्या रकमेइतकी असेल, असे मानण्यात येईल.

२९.४ कर्जाची परतफेड करण्यासाठी कोणताही विलंबावधी मिळाला असला तरी कर्जाची परतफेड ही योजना वाणिज्यिकरित्या कामकाज सुरू झाल्याच्या पहिल्या वर्षापासून विचारात घेण्यात येईल आणि ती अनुज्ञेय वार्षिक घसाऱ्याच्या रकमेइतकी असेल.

२९.५ व्याजाचा दर हा प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या प्रत्यक्ष कर्जाच्या भागावर परिगणना केलेला भारांकित सरासरी व्याजाचा दर असेल :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या वेळी संबंधित वर्षादरम्यान लागू असलेल्या प्रत्यक्ष कर्जाच्या आधारे परिगणना केलेला भारांकित सरासरी व्याज दर हा व्याजाचा दर म्हणून विचारात घेण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर एखाद्या विशिष्ट वर्षासाठी प्रत्यक्ष कर्ज नसेल पण प्रमाणकानुसार कर्ज अजुनही शिल्लक असेल तर, प्रत्यक्ष कर्जासाठी उपलब्ध असलेला शेवटचा भारांकित सरासरी व्याजाचा दर विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, जसे असेल तसे, यांच्याकडे जर मागील काळात देखील प्रत्यक्षात कर्ज नसेल तर आयोगाकडून नियमन करण्यात येत असलेल्या त्यांच्या अन्य व्यवसायाचा भारांकित सरासरी व्याज दर विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, जसे असेल तसे, यांच्याकडे प्रत्यक्ष कर्ज नसेल तर, आणि आयोगाकडून नियमन करण्यात येत असलेल्या त्यांच्या अन्य व्यवसायाकडे देखील मागील काळात प्रत्यक्ष कर्ज नसेल तर, संपूर्ण कंपनीचा भारांकित सरासरी व्याजाचा दर विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, संपूर्ण कंपनीवर प्रत्यक्ष कर्ज नसेल तर प्रमाणकानुसार कर्जावरील व्याजास मान्यता देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित वर्षाच्या सुरुवातीचा आधारभूत दर हा, व्याजाचा दर म्हणून विचारात घेण्यात येईल.

२९.६. कर्जावरील व्याजाची परिगणना ही त्या वर्षाच्या प्रमाणकानुसार सरासरी कर्जावर भारांकित सरासरी व्याज दर लावून करण्यात येईल :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या वेळी, आयोगाने त्या वर्षासाठी मान्यता दिलेल्या प्रत्यक्ष मत्तेच्या भांडवलीकरणाच्या आधारे संबंधित वर्षाचे प्रमाणकानुसार सरासरी कर्ज विचारात घेण्यात येईल.

२९.७ वरील व्याजाच्या परिगणनेतून ग्राहक वर्गणीची कामे, अनामती कामे, अनुदान किंवा भांडवली सबसिडी याद्वारे उभारलेल्या भांडवली खर्चाच्या मर्यादेपर्यंत, प्रमाणकानुसार किंवा अन्यथा असलेल्या कर्जाच्या रकमेवरील व्याज, वगळण्यात येईल.

२९.८ कोणत्याही वर्षासाठी वित्तीय संस्थेकडून घ्यावयाच्या कर्जासाठी केलेल्या खर्चास आयोगाकडून अचूक समायोजनाच्या वेळी, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मान्यता देण्यात येईल.

२९.९ मान्यता दिलेले प्रकल्प पूर्ण होण्याचे वेळापत्रक आणि भांडवली खर्चाच्या तुलनेत वेळ आणि/किंवा ज्यादा खर्च झाल्यामुळे किंवा योजना पूर्ण होण्याच्या स्थितीच्या आधारावर कर्ज निधीच्या प्रत्यक्ष गरजेच्या प्रमाणाबाहेर ज्यादा कर्ज निधी घेतल्यामुळे, बांधकामादरम्यान झालेल्या खर्चाचे ज्यादा व्याज, आयोगाने काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, प्रकरण-निहाय तत्त्वावर अंशतः किंवा पूर्णतः मान्यता देण्यात येईल किंवा नाकारण्यात येईल :

परंतु असे की, जेव्हा बांधकामा दरम्यानचे ज्यादा व्याज हे निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक यांनी नियुक्त केलेल्या कोणत्याही एजन्सी किंवा ठेकेदार किंवा पुरवठादार यांनी केलेल्या विलंबामुळे झाले असेल तर, अशी एजन्सी किंवा ठेकेदार किंवा पुरवठादार यांच्याकडून वसूल केलेली कोणतीही परिसमापित नुकसानभरपाई (लिक्विडेटेड डॅमेजेस) भांडवली खर्चाच्या परिगणनेसाठी विचारात घेण्यात येईल :

परंतु आणखी असे की, विचारात घ्यावयाच्या परिसमापित नुकसानभरपाईची मर्यादा आयोगाकडून परवानगी देण्यात आलेल्या बांधकामा दरम्यानच्या ज्यादा व्याजाच्या रकमेवर अवलंबून राहील.

२९.१० निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, जसे असेल तसे, व्याजापोटीच्या रकमेत नक्त बचत होत असल्यामुळे कर्जाला फेर-वित्तपुरवठा (रि-फायनान्सिंग) करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करील आणि अशा प्रसंगी, अशा रि-फायनान्सिंगशी संबंधित खर्च लाभधारकाला सोसावा लागेल आणि सदर नक्त बचत लाभधारक आणि त्यांच्यामध्ये, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, २ : १ या प्रमाणांत विभागून घेण्यात येईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, जसे असेल तसे, अशा रि-फायनान्सिंगशी संबंधित खर्चाचा कागदोपत्री पुरावा सादर करील :

परंतु आणखी असे की, व्याजातील नक्त बचतीची परिगणना कर्जाच्या कालावधीसाठी वर्षासन (ॲन्युइटी) म्हणून करण्यात येईल आणि वार्षिक नक्त बचत ही विद्युत कंपनी आणि लाभधारक यांच्यामध्ये विनिर्दिष्टीत गुणोत्तरामध्ये विभागण्यात येईल.

२९.११ पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता, वितरण यंत्रणा उपयोगकर्ता आणि किरकोळ ग्राहक यांच्याकडून सुरक्षा अनामतीपोटी घेतलेल्या रोख रकमेवरील व्याज, ज्या वर्षासाठी व्याज देय असेल त्या वर्षाच्या १ एप्रिल रोजी असणाऱ्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दरानुसार मान्यता देण्यात येईल :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या वेळी, आयोगाकडून, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, सुरक्षा अनामत रकमेवर व्याज संबंधित वर्षादरम्यान परवानाधारकाने प्रत्यक्ष अदा केलेल्या व्याजाच्या आधारावर, विचारात घेण्यात येईल.

**३०. परकीय चलनाच्या दरातील तफावत—**

३०.१ निर्मिती केंद्र किंवा पारेषण यंत्रणा किंवा वितरण यंत्रणेसाठी, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या, जसे असेल तसे, प्राप्त केलेल्या परकीय चलनातील कर्जावरील व्याजाच्या आणि परकीय चलनातील कर्जाच्या परतफेडीच्या संबंधात, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक परकीय चलनाच्या दरातील तफावतीची जोखीम, स्वेच्छानिर्णयानुसार अंशतः किंवा पूर्णतः, संरक्षित करण्याच्या उपाययोजना म्हणजेच हेज (hedge) करू शकेल.

३०.२ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, परकीय कर्जाशी अनुरूप परकीय चलनाच्या दरातील तफावतीसाठी हेंजिंगचा (hedging) खर्च, संबंधित वर्षातील खर्च म्हणून वसूल करण्यास, आयोगाकडून काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, परवानगी देण्यात येईल आणि अशा तफावतीशी अनुरूप ज्यादा रुपयातील दायित्वाला हेज केलेल्या परकीय कर्जाच्या संबंधात परवानगी देण्यात येणार नाही.

३०.३ परकीय चलनाच्या दरातील तफावत हेज न केल्यास, संबंधित वर्षातील परकीय चलनातील कर्जाशी अनुरूप व्याज अदा करण्यासाठी आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी ज्यादा रुपयांतील दायित्व, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, आयोगाकडून अनुज्ञेय राहील, परंतु असे की, ते निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा त्यांचे पुरवठादार किंवा ठेकेदार यांच्यामुळे नसेल.

**३१. खेळत्या भांडवलावरील व्याज—**

३१.१ निर्मिती :—

(ए) कोळश्यावर आधारित/लिग्नाईटद्वारे प्रज्वलित निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप निर्मितीसाठी, खाणीजवळ असलेल्या निर्मिती केंद्रांकरिता पंधरा दिवसांसाठी आणि खाणीजवळ नसलेल्या निर्मिती केंद्रांच्या बाबतीत तीस दिवसांकरिता कोळसा किंवा लिग्नाईट आणि चुनखडीच्या साठ्याचा खर्च, लागू असेल तर, किंवा कोळसा/लिग्नाईटच्या कमाल साठ्याची क्षमता, यापैकी जे कमी असेल ते ;

(दोन) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप निर्मितीसाठी कोळसा किंवा लिग्नाईट आणि चुनखडीवरील तीस दिवसांचा खर्च,

(तीन) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप निर्मितीसाठी दुय्यम इंधन तेलावरील दोन महिन्याचा खर्च ;

(चार) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(पाच) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च – त्या वर्षाच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(सहा) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकारांच्या बेरजेच्या सममूल्य पंचेचाळीस दिवसांतील वीज विक्रीद्वारे मिळू शकणाऱ्या रकमा ;

**वजा**

(सात) देय दायित्वाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप परिगणना केलेल्या तीस दिवसांचा इंधन (तेल आणि दुय्यम इंधन तेलासह) खर्च :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, निर्मिती केंद्राची प्रत्यक्ष निर्मिती किंवा उपलब्धता लक्ष्यांक, यापैकी जे कमी असेल त्यावर आधारीत खेळत्या भांडवलाची परिगणना करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल.

(बी) तेलावर प्रज्वलित निर्मिती केंद्राकरिता खेळत्या भांडवलामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :–

(एक) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप निर्मितीसाठी, तीस दिवसांकरिता तेलाच्या साठ्याचा खर्च, लागू असेल तर, किंवा तेलाच्या कमाल साठ्याची क्षमता, यापैकी जे कमी असेल ते ;

(दोन) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप निर्मितीसाठी तेलावरील तीस दिवसांचा खर्च,

(तीन) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(चार) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - त्या वर्षीच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(पाच) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकारांच्या बेरजेच्या सममूल्य पंचेचाळीस दिवसातील वीज विक्रीद्वारे मिळू शकणाऱ्या रकमा ;

**वजा**

(सहा) देय दायित्वाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप परिगणना केलेल्या तीस दिवसांचा इंधन खर्च :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, निर्मिती केंद्राची प्रत्यक्ष निर्मिती किंवा उपलब्धता लक्ष्य, यापैकी जे कमी असेल त्यावर आधारीत खेळत्या भांडवलाची परिगणना करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल.

(सी) ओपन सायकल गॅस टर्बाइनवर/कम्बाइन्ड सायकलवर चालणाऱ्या निर्मिती केंद्रांकरिता, खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) वायु इंधन/किंवा द्रव इंधनावर चालणाऱ्या निर्मिती केंद्राच्या कामकाजाचा प्रकार विचारात घेऊन, केंद्राच्या उपलब्धता लक्ष्यास अनुरूप तीस दिवसांसाठी इंधन खर्च ;

(दोन) केंद्राच्या उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप, पंधरा दिवसांसाठी द्रव इंधनाचा साठा ;

(तीन) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ; आणि

(चार) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - त्या वर्षीच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(पाच) उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि ऊर्जा आकारांच्या बेरजेच्या पंचेचाळीस दिवसांतील सममूल्य वीज विक्रीद्वारे मिळू शकणाऱ्या रकमा ;

**वजा**

(सहा) देय्य दायित्वाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, उपलब्धता लक्ष्यांकास अनुरूप परिगणना केलेल्या तीस दिवसांच्या इंधन (द्रव इंधन साठ्यासह) खर्च :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, निर्मिती केंद्राची प्रत्यक्ष निर्मिती किंवा उपलब्धता लक्ष्यांक, यापैकी जे कमी असेल त्यावर आधारित खेळत्या भांडवलाची परिगणना करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल.

(डी) पम्प्ड स्टोअरेज जल-विद्युत निर्मिती केंद्रासह जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(दोन) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - त्या वर्षीच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(तीन) प्रमाण क्षमता निर्देशांकानुसार परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या पंचेचाळीस दिवसांतील सममूल्य वीज विक्रीद्वारे मिळू शकणाऱ्या रकमा :

परंतु असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल.

(इ) स्वतःच्या निर्मिती केंद्राच्या बाबतीत, या विनियमांनुसार खेळत्या भांडवलाची परिगणना करण्यासाठी, निर्मिती व्यवसायाकडून किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाला करावयाच्या विजेच्या पुरवठ्याच्या प्रमाणात, प्राप्त होऊ शकणाऱ्या (रिसिव्हेबल्स) रकमेपोटी, कोणतीही रक्कम अनुज्ञेय नसेल ;

(एफ) खेळत्या भांडवलावरील व्याजाचा दर हा प्रमाणकाच्या तत्त्वावर आधारीत असेल आणि तो ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यात आली असेल त्या दिवशी असणाऱ्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराइतका असेल :

परंतु असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, खेळत्या भांडवलावरील व्याज, त्या संबंधित वर्षात प्रचलित असणाऱ्या भारांकित सरासरी आधारभूत दराच्या सममूल्य दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने देण्यास परवानगी देण्यात येईल.

३१.२ **पारेषण––**

(ए) पारेषण परवानाधारकाच्या, खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(दोन) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - त्या वर्षीच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(तीन) प्रचलित वीज दराने पारेषण आकारांपासून दीड महिन्यात मिळणारा अपेक्षित महसूल ;

**वजा**

(चार) पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेली रोख रक्कम, असल्यास :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल ;

(बी) खेळत्या भांडवलावरील व्याजाचा दर हा प्रमाणकाच्या तत्त्वावर आधारित असेल आणि तो ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यात आली असेल त्या दिवशी असणाऱ्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराइतका असेल :

परंतु असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, खेळत्या भांडवलावरील व्याज, त्या संबंधित वर्षात प्रचलित असणाऱ्या भारांकित सरासरी आधारभूत दराच्या सममूल्य दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने देण्यास परवानगी देण्यात येईल.

३१.३ वितरण वायर्स व्यवसाय :—

(ए) वितरण वायर्स व्यवसायाच्या, खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(दोन) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - त्या वर्षीच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(तीन) वितरण वायर्सचा वापर करण्यासाठीच्या आकारामधून प्रचलित वीज दराने मिळणारा दीड महिन्यात मिळणारा अपेक्षित महसूल ;

**वजा**

(चार) वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेली रोख रक्कम, असल्यास :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल ;

(बी) खेळत्या भांडवलावरील व्याजाचा दर हा प्रमाणकाच्या तत्त्वावर आधारित असेल आणि तो ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यात आली असेल त्या दिवशी असणाऱ्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराइतका असेल :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, खेळत्या भांडवलावरील व्याज संबंधित वर्षात प्रचलित असणारा भारांकित सरासरी आधारभूत दराच्या सममूल्य दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने देण्यास परवानगी देण्यात येईल.

३१.४ किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय :–

(ए) किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाच्या खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(दोन) देखभालीसाठी सुट्या भागांवरील खर्च - त्या वर्षीच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मत्तांच्या एक टक्का ; आणि

(तीन) विजेच्या विक्रीमधून प्रचलित वीज दराने दीड महिन्यात मिळणारा अंदाजित महसूल आणि त्यामध्ये क्रॉस सबसिडी अधिभार व अतिरिक्त अधिभारापासून मिळणारा महसूल, असल्यास, समाविष्ट :

**वजा**

(चार) किरकोळ पुरवठा ग्राहकांकडून अनामत म्हणून घेतलेली रोख रक्कम ;

(पाच) वार्षिक वीज खरेदी योजनेच्या आधारे वीज खरेदीचा एक महिन्याचा खर्च आणि त्यामध्ये पारेषण आकार व एसएलडीसी आकार समाविष्ट :

परंतु असे की, किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाने स्वतःच्या निर्मिती केंद्राकडून वीज घेतल्यास, या विनियमांनुसार खेळत्या भांडवलाची परिगणना करण्यासाठी, निर्मिती व्यवसायाकडून किरकोळ पुरवठा व्यवसायाला करावयाच्या विजेच्या पुरवठ्याच्या प्रमाणात, कोणतीही देय रक्कम खेळत्या भांडवलाच्या गरजेमधून कमी करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागाच्या मूल्याच्या आधारे करण्यात येईल ;

(बी) खेळत्या भांडवलावरील व्याजाचा दर हा प्रमाणकाच्या तत्त्वावर आधारित असेल आणि तो ज्या दिवशी वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यात आली असेल त्या दिवशी असणाऱ्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराइतका असेल :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, खेळत्या भांडवलावरील व्याज, संबंधित वर्षात प्रचलित असणारा भारांकित सरासरी आधारभूत दराच्या सममूल्य दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने देण्यास परवानगी देण्यात येईल.

३१.५ एमएसएलडीसी :—

(ए) एमएसएलडीसीच्या खेळत्या भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल :—

(एक) संचालन व देखभालीवरील एक महिन्याचा खर्च ;

(दोन) वार्षिक स्थिर आकाराच्या वसुलीमधून प्रचलित वीज दराने दीड महिन्यात मिळणारा अपेक्षित महसूल ;

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी अचूक समायोजनाच्या प्रयोजनाकरिता, खेळत्या भांडवलाच्या गरजेची फेर-परिगणना, नफा आणि तोट्याची विभागणी करण्यापूर्वी, आयोगाने अचूक समायोजनामध्ये मान्यता दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या भागांच्या मूल्यांच्या आधारे करण्यात येईल ;

(बी) खेळत्या भांडवलावरील व्याजाचा दर हा प्रमाणकाच्या तत्त्वावर आधारित असेल आणि तो ज्या दिवशी शुल्क व आकारांच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यात आली असेल त्या दिवशी असणाऱ्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराइतका असेल :

परंतु असे की, अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, खेळत्या भांडवलावरील व्याज, संबंधित वर्षात प्रचलित असणारा भारांकित सरासरी आधारभूत दराच्या सममूल्य दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने देण्यास परवानगी देण्यात येईल ;

३१.६ प्रत्येक वर्षीच्या अचूक समायोजनाच्या प्रयोजनासाठी, अचूक समायोजनाच्या वेळी परिगणना केलेल्या खेळत्या भांडवलावरील प्रमाणकानुसार व्याज आणि निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने दिलेले खेळत्या भांडवलावरील प्रत्यक्ष व्याज या दोघांमध्ये नियंत्रणाधीन घटकांमुळे झालेली, कागदोपत्री पुराव्याने पुष्टी दिलेली, तफावत कार्यक्षमतेतील वाढ किंवा कार्यक्षमतेतील घट म्हणून, जसे असेल तसे, विचारात घेण्यात येईल आणि विनियम ११ नुसार, त्याची विभागणी निर्मिती कंपनी, परवानाधारक किंवा एमएसएलडीसी आणि संबंधित लाभधारक किंवा ग्राहक, जसे असेल तसे, यांच्यामध्ये करण्यात येईल :

परंतु असे की, कार्यक्षमतेतील वाढ किंवा कार्यक्षमतेतील घट, जसे असेल तसे, विभागून घेण्यापूर्वी, खेळत्या भांडवलाच्या व्याजावर देयकाची रक्कम मिळण्यास झालेल्या विलंबामुळे होणारा परिणाम वजा करण्यात येईल.

**३२. येणे असलेले व्याज (कॅरिंग कॉस्ट) किंवा देणे असलेले व्याज (होल्डींग कॉस्ट)——**

आयोग, अनुज्ञेय रकमेवर, संबंधित वर्षा दरम्यान प्रचलित असलेल्या भारांकित सरासरी आधारभूत दराच्या सममूल्य दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने, सरळ व्याजाने, येणे असलेले व्याज किंवा देणे असलेल्या व्याजास, जसे असेल तसे, परवानगी देईल.

**३३. आयकर——**

३३.१. निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी जर आयोगाने विनियमित केलेल्या विद्युत व्यवसायाशी संबंधातील आयोगाने परवानगी दिलेला कोणताही अन्य विनियमित किंवा अविनियमित व्यवसाय किंवा अन्य व्यवसाय करीत नसेल तर, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी यांनी प्रत्यक्ष भरणा केलेल्या आयकराच्या आधारे, आयोग, बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशात, उपलब्ध असलेल्या अगदी अलीकडील लेखापरिक्षित लेख्यांनुसार, काळजीपूर्वक छाननीस अधीन राहून, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी देय असलेल्या आयकरास तात्पुरती मंजुरी देईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलएडीसी जर कोणत्याही अन्य विनियमित किंवा अविनियमित व्यवसाय किंवा अन्य व्यवसाय करीत असेल तर आणि निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने प्रत्यक्ष अदा केलेल्या आयकराची वेगवेगळ्या व्यवसायामध्ये वाटणी करावयाची असेल तर, आयोगाकडून विनियमित होणाऱ्या विद्युत व्यवसायाकरिता ज्याप्रमाणे आयोगाची परवानगी देण्यात आलेली असेल त्याप्रमाणे, काळजीपूर्वक तपासणीच्या अधीन राहून, करा-पूर्वीच्या नियामक नफ्यावर आधारित आयकरास तात्पुरती परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, विलंब भरणा आकार किंवा विलंबित प्रदानांवरील व्याज किंवा अन्य व्यवसायापासूनच्या उत्पन्नाच्या रकमांवर तसेच एकूण महसुली गरजेची परिगणना करताना ज्या स्त्रोतांचा विचार करण्यात आलेला नाही अशा स्त्रोतांपासून मिळालेल्या उत्पन्नाच्या रकमांवर, कोणताही आयकर विचारात घेण्यात येणार नाही :

परंतु असेही की, कार्यक्षमता नफ्याच्या आणि प्रोत्साहन-अधिदानाच्या रकमेची वेगवेगळी देयके तयार केली असली किंवा नसली तरी, आयोगाने मान्यता दिलेल्या कार्यक्षमता नफ्याच्या आणि प्रोत्साहन-अधिदानाच्या रकमेवर कोणताही आयकर विचारात घेतला जाणार नाही :

परंतु असेही की, आयकराची परिगणना, संच-निहाय/केंद्र-निहाय न करता, संपूर्ण निर्मिती कंपनीकरिता करण्यात येईल.

३३.२ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी, जसे असेल तसे, यांच्या आयकराच्या दायित्वाच्या परिगणनेसाठी, आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत आयकर न भरण्याच्या कोणत्याही सुटीचा लाभ आणि आयकराचे कोणतेही अन्य लाभ, सामावून न घेतलेले तोटे किंवा सामावून न घेतलेला घसारा, यासाठी देण्यात आलेले क्रेडीट किंवा मागील वर्षांत भरणा केलेल्या किमान पर्यायी कराची आणि कॉर्पोरेट कराच्या दायित्वापोटी समायोजन करण्यासाठी उपलब्ध असलेली रक्कम, या बाबींचा विचार, अशा आयकराच्या लाभ आणि सुटीसाठी प्रत्यक्षात दावा केला असला किंवा नसला तरी, करण्यात येईल :

परंतु असे की, आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत आयकर न भरण्याच्या कोणत्याही सुटीचा लाभ आणि आयकराचे कोणतेही अन्य लाभ मिळण्यासाठी करण्यात आलेला दावा आयकर विभागाकडून नाकारण्यात आला तर, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी योग्य वेळी आवश्यक दिलासा आयोगाकडे मागू शकतात.

३३.३ प्रत्यक्ष भरणा केलेला आयकर किंवा निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीच्या विनियमित व्यवसायाचा कर-पूर्व नियामक नफा, लागू असल्याप्रमाणे, आणि अचूक समायोजनानंतर संबंधित वर्षासाठी आयोगाकडून मान्यता दिलेला आयकर यांच्यामधील तफावतीस एकूण महसुली गरजेचा भाग म्हणून मध्यावधी आढावा किंवा अचूक समायोजनाच्या वेळी, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, वसूल करण्यास परवानगी देण्यात येईल.

३३.४ आयोगाने विनियमित केलेल्या व्यवसायाखेरीज अन्य कोणत्याही स्त्रोतापासूनच्या उत्पन्नावरील आयकर हा वीज दरातून वसूल करण्यात येणार नाही आणि अशा अन्य उत्पन्नावरील आयकर हा निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीला, जसे असेल तसे, सहन करावा लागेल.

**३४ आकस्मिक राखीव निधीकरिता वर्गणी—**

३४.१ परवानाधारकाने आकस्मिक राखीव निधीसाठी वर्गणी जमा केल्यास, स्थिर मत्तांवरील मूळ खर्चाच्या ०.२५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल आणि ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम, अशा वर्गणीसाठी, एकूण महसुली गरजेची परिगणना करताना दरवर्षी अनुज्ञेय राहील :

परंतु असे की, जेथे अशा स्थिर मत्तांच्या मूळ खर्चाच्या पाच (५) टक्क्यांपेक्षा जास्त आकस्मिक राखीव निधीची रक्कम असेल तर आणखी जास्त वर्गणीस परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, अशी वर्गणीची रक्कम, वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत, भारतीय न्यास अधिनियम, १८८२ अंतर्गत प्राधिकृत करण्यात आलेल्या रोख्यांमध्ये गुंतविण्यात येईल.

३४.२ आयोगाने मान्यता दिलेल्या खालील आकारांवरील खर्च करण्याच्या प्रयोजनाशिवाय, आकस्मिक निधीतून, परवान्याच्या मुदतीत, रक्कम काढण्यात येणार नाही :—

(ए) अपघात, संप किंवा व्यवस्थापनाकडून टाळता आल्या नसत्या अशा परिस्थितीमुळे होणारा खर्च किंवा नफ्यातील नुकसान ;

(बी) सर्वसाधारण देखभाल किंवा नवीकरणासाठी आवश्यक असलेल्या खर्चाशिवाय संयंत्र किंवा कामे बदलण्यासाठी किंवा काढून टाकण्यासाठीचा खर्च ;

(सी) सध्या अस्तित्त्वात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली आणि ज्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही अशा बाबीसाठी देय होणारी भरपाईची रक्कम.

३४.३ वर नमूद केल्याप्रमाणे आकस्मिक राखीव निधीच्या मूल्यात घट झाल्यास, या घटीचे समायोजन, वीज दराचा एक भाग म्हणून, करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**३५. सूट, प्रोत्साहन-अधिदान आणि दंड—**

३५.१ वीज निर्मितीच्या वीज दरानुसारची देयके किंवा पारेषण आकारांची देयके किंवा एमएसएलडीसी चे शुल्क व आकारांची देयके सादर करण्यात आल्यानंतर ७ दिवसांच्या आत देयक पतपत्राद्वारे किंवा अन्यथा किंवा एनइएफटी/आरटीजीएस द्वारे अदा करण्यात आल्यास, कर, सेस, ड्युटीज् इ. वगळून, देयकाच्या रकमेवर १% सूट देण्यात येईल.

३५.२ किरकोळ वीज दराचे देयक निर्गमित झाल्यावर ग्राहकांनी ७ दिवसांच्या आत देयक अदा केल्यास कर, सेस, ड्युटीज् इ. च्या वगळून, देयकाच्या रकमेवर १% सूट देण्यात येईल.

३५.३ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसी ला मिळालेली सर्व सूट किंवा प्रोत्साहन-अधिदाने त्यांचे वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न म्हणून विचारात घेण्यात येईल, तर निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने दिलेली सर्व सूट किंवा प्रोत्साहन-अधिदाने निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा एमएसएलडीसीने खर्च म्हणून दाखविण्यास परवानगी देण्यात येईल.

३५.४ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने अदा केलेल्या दंडास, असल्यास, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने खर्च म्हणून दाखविण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**३६. विलंब प्रदानांवर आकार आणि विलंब प्रदानांवरील व्याज—**

३६.१ वीज निर्मितीच्या दरानुसारचे देयक किंवा पारेषण आकारांचे देयक किंवा एमएसएलडीसीच्या शुल्क व आकाराचे देयक लाभधारकाने देयक दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीनंतर विलंबाने अदा केल्यास, लाभधारकाबरोबर केलेल्या करार किंवा व्यवस्थेमध्ये वरील बाबत काहीही विरुद्ध नमूद असले तरी देखील निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा एमएसएलडीसीकडून, जसे असेल तसे, देयकाच्या रकमेवर प्रति महिना १.२५ % दराने विलंबाच्या कालावधीकरिता विलंब भरणा आकार लावण्यात येईल.

३६.२ देयक दिनांकापासून, उच्च दाब ग्राहकांनी १५ दिवसांच्या कालावधीनंतर आणि लघु दाब ग्राहकांनी २१ दिवसांच्या कालावधीनंतर, विलंबाने किरकोळ वीज दराचे देयक अदा केल्यास, विलंबाच्या पहिल्या महिन्यासाठी देयकाच्या रकमेवर कर, सेस, ड्युटीज् इ. सह, १.२५ टक्के दराने विलंब भरणा आकार वसूल करण्यात येईल ;

परंतु असे की, किरकोळ वीज दराने करण्यात आलेल्या देयकाचा भरणा करण्यास देयकाच्या दिनांकापासून ६० दिवसांपेक्षा जास्त आणि ९० दिवसांपर्यंत विलंब झाल्यास, विलंब भरणा आकार, कर, सेस, डयुटीज् इ. सह देयकातील रकमेच्या विलंब प्रदानावर प्रति वर्षी १२ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल :

परंतु असे की, किरकोळ वीज दराने करण्यात आलेल्या देयकाचा भरणा करण्यास देयकाच्या दिनांकापासून ९० दिवसांपेक्षा जास्त आणि १८० दिवसांपर्यंत विलंब झाल्यास, विलंब भरणा आकार, कर, सेस, डयुटीज् इ. सह देयकातील रकमेच्या विलंब प्रदानावर प्रति वर्षी १५ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल :

परंतु असे की, किरकोळ वीज दराने देयकाचा भरणा करण्यास देयकाच्या दिनांकापासून १८० दिवसांपेक्षा जास्त विलंब झाल्यास, विलंब भरणा आकार, कर, सेस, डयुटीज् इ. सह देयकातील रकमेच्या विलंब प्रदानावर प्रति वर्षी १८ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.

३६.३ निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला अशा विलंब भरणा आकार आणि विलंबाने भरणा करण्यावरील व्याज त्याचे वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न म्हणून विचारात येणार नाही.

३६.४ वितरण परवानाधारकाने निर्मिती कंपनीला किंवा पारेषण परवानाधारकाला अदा केलेला किंवा अदा करावयाचा असा विलंब भरणा आकार अशा वितरण परवानाधारकाला खर्च म्हणून धरण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## भाग- इ : वीज निर्मिती

**३७. व्याप्ती—**

३७.१ या भागामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले विनियम, वितरण परवानाधारकाला वीज निर्मितीच्या पारंपरिक स्त्रोतांकडून आणि २५ मेगावॅट पेक्षा जास्त क्षमतेच्या जल-विद्युत निर्मिती केंद्रांकडून होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यासाठी वीज दर निश्चितीकरणास लागू राहतील :

परंतु असे की, वितरण परवानाधारकाला नूतनशील ऊर्जा स्त्रोताकडून होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यासाठीचे वीज दर हे आयोगाच्या संबंधित विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार निश्चित करण्यात येतील.

३७.२ निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकाला करावयाच्या वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दराचे, खालील प्रकरणी निश्चितीकरण करताना, आयोग या भागात असलेल्या अटी व शर्तीचे मार्गदर्शन घेईल :—

(ए) जेथे या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्या नंतर करण्यात आलेल्या वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेच्या अनुरोधाने वीज दर असेल तर ; किंवा

(बी) जेथे या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्यापूर्वी करण्यात आलेल्या वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेच्या अनुरोधाने वीज दर असेल आणि आयोगाने अशा करार किंवा व्यवस्थेला पूर्वी मान्यता दिलेली असेल आणि करार किंवा व्यवस्थेत अभिप्रेत असेल की त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या वीज दर विनियमांवर वीज दर आधारित असेल; किंवा

(सी) जेथे वितरण परवानाधारक वीज निर्मितीचा व्यवसाय करत असेल तर, वितरण परवानाधारकाच्या निर्मिती व्यवसायाकडून त्याच्या किरकोळ व्यवसायाला करण्यात येत असलेल्या वीज पुरवठ्याची हस्तांतरण किंमत निश्चित करण्यासाठी.

**३८. वीज निर्मिती कंपनीच्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका—**

३८.१ विद्युत निर्मिती कंपनी, वितरण परवानाधारकाला करावयाच्या वीज पुरवठ्याचे दर निश्चित करण्यासाठी, या विनियमांतील भाग बी नुसार याचिका दाखल करील.

३८.२ या विनियमांखाली विद्युत निर्मिती केंद्राचा वीज दर हा टप्पानिहाय, संचनिहाय किंवा संपूर्ण विद्युत निर्मिती केंद्रासाठी निश्चित करता येईल :

परंतु असे की, या भागात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विद्युत निर्मिती केंद्रासाठीच्या वीज दराच्या अटी व शर्ती या विद्युत निर्मिती केंद्राप्रमाणे, टप्प्यांना किंवा संचांना किंवा निर्मिती केंद्राला, जसे असेल तसे, त्याच पद्धतीने लागू राहतील.

३८.३ जेथे विद्युत निर्मिती केंद्राच्या टप्प्यासाठी किंवा संचासाठी वीज दर निश्चित करण्यात येत असेल तेथे, विद्युत निर्मिती कंपनी ही सामायिक सुविधांवरील भांडवली खर्चाचे आणि सर्व टप्पे व संचाच्या, संयुक्त व सामायिक खर्चाचे वाटप करताना, जसे असेल तसे, वाजवी आधार स्वीकारील :

परंतु असे की, अशा खर्चाचे वाटप कोणत्या आधारे केले ते दाखविणारे एक विवरणपत्र विद्युत निर्मिती कंपनी ठेवेल जे वैधानिक लेखापरीक्षकाकडून यथोचितपणे लेखापरीक्षित व प्रमाणित करण्यात येईल आणि असे लेखापरीक्षित आणि प्रमाणित विवरणपत्र आयोगाला वीज दर निश्चितीकरणाची याचिका सादर करताना त्यासोबत पाठविण्यात येईल.

३८.४ विद्यमान निर्मिती केंद्रे/संचाच्या बाबतीत, आयोग निर्मिती कंपनीला १ एप्रिल २०१६ रोजी मान्यताप्राप्त भांडवली खर्चावर आणि त्यानंतरच्या येणाऱ्या वर्षांसाठीच्या अंदाजित अतिरिक्त भांडवली खर्चावर आधारित वीज दरास मान्यता देऊ शकेल :

परंतु असे की, आयोगाने मान्यता दिलेल्या व ३१ मार्च २०१६ रोजी लागू असलेल्या वीज दराने निर्मिती कंपनी लाभधारकांना १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या कालावधीसाठी व त्यानंतर या विनियमांनुसार, वीज दरास मान्यता मिळेपर्यंत, देयके पाठवील.

३८.५ निर्मिती कंपनी, निर्मिती संच किंवा टप्पा किंवा संपूर्ण निर्मिती केंद्राच्या, जसे असेल तसे, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या अपेक्षित दिनांकाच्या किमान सहा महिने पूर्वी, नवीन निर्मिती केंद्रांसाठी तात्पुरत्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करील.

३८.६ निर्मिती कंपनी, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजास सुरूवात झाल्याच्या दिनांकापर्यंत केलेला भांडवली खर्च किंवा करावयाचा अंदाजित भांडवली खर्च आणि केलेला अतिरिक्त भांडवली खर्च, जो वैधानिक लेखापरीक्षकाद्वारे यथोचितपणे प्रमाणित करण्यात आलेला असेल, यांच्या आधारे, नवीन निर्मिती केंद्रासाठी तात्पुरत्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करील :

परंतु असे की, याचिकेमध्ये, अंदाजित भांडवली खर्च आणि अतिरिक्त भांडवली खर्चासाठी, जेथे लागू असेल तेथे, मूळ गृहितकांचा तपशील समाविष्ट असेल.

३८.७ नवीन प्रकल्पांच्या बाबतीत, आयोगाकडून निर्मिती कंपनीला अंदाजित भांडवली खर्चाच्या आधारे, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या अपेक्षित दिनांकापासून तात्पुरत्या वीज दरास, परवानगी देता येईल.

३८.८ वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या दिनांकास, तात्पुरत्या वीज दराच्या मान्यतेचा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक विलंब होण्याची शक्यता असेल तर, निर्मिती कंपनी, प्रकल्पाच्या कामाच्या सद्य:स्थितीचा आणि प्रकल्प पूर्ण होण्यामागील विलंबाच्या कारणांचा तपशील देऊन, तात्पुरता वीज दर लागू राहण्याचा वैधता कालावधी वाढविण्यासाठी याचिका सादर करू शकेल जी आयोगाकडून काळजीपूर्वक छाननी झाल्यानंतर विचारात घेण्यात येईल.

३८.९ निर्मिती कंपनी, लेखापरीक्षित भांडवली खर्च आणि वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजास सुरुवात झाल्याच्या दिनांकारोजीचे भांडवलीकरण यांच्या आधारे निर्मिती संच किंवा टप्पा किंवा संपूर्ण निर्मिती केंद्राच्या, जसे असेल तसे, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजास सुरुवात झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, नवीन निर्मिती केंद्रांसाठी अंतिम वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करील :

परंतु असे की, निर्मिती केंद्रात एकापेक्षा अधिक संच असतील तर, जेव्हा प्रत्येक संच वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू करील तेव्हा, संपूर्ण केंद्राचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याची प्रतिक्षा न करता, अशी याचिका प्रत्येक संचासाठी दाखल करण्यात येईल.

३८.१० लेखापरीक्षित भांडवली खर्च आणि वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या दिनांकारोजीचे भांडवलीकरण यांच्या काळजीपूर्वक छाननीच्या आधारे, आयोगाकडून नवीन निर्मिती केंद्रासाठी अंतिम वीज दराचे निश्चितीकरण करण्यात येईल.

३८.११ आयोगाकडून तात्पुरत्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी, जेव्हा वार्षिक तत्त्वावर केलेला प्रत्यक्ष भांडवली खर्च हा मान्यता देण्यात आलेल्या भांडवली खर्चाहून पाच टक्के किंवा त्यापेक्षा अधिक टक्क्यांनी कमी असेल तेव्हा, निर्मिती कंपनी लाभधारकांना आयोगाने मान्यता दिलेल्या ज्यादा भांडवली खर्चाशी अनुरूप ज्यादा वीज दराचा परतावा, संबंधित वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रचलित असलेल्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दरानुसार व्याजासह करील.

३८.१२ आयोगाकडून तात्पुरत्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी, जेव्हा वार्षिक तत्त्वावर केलेला प्रत्यक्ष भांडवली खर्च हा मान्यता देण्यात आलेल्या भांडवली खर्चाहून पाच टक्के किंवा त्यापेक्षा अधिक टक्क्यांनी जास्त असतो तेव्हा, निर्मिती कंपनीला लाभधारकांकडून, आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून, भांडवली खर्चातील अशा घटीस अनुरूप वीज दरातील तूट, संबंधित आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रचलित असलेल्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दरानुसार व्याजासह वसूल करण्याचा हक्क राहील.

३८.१३ सिंचन, पूर नियंत्रण आणि विद्युत भाग यासह असलेल्या बहु-उद्देशीय जलविद्युत प्रकल्पांच्या संबंधात, प्रकल्पाच्या फक्त विद्युत भागांशी संबंधित असलेला भांडवली खर्च वीज दर निश्चितीकरणाच्या वेळी विचारात घेण्यात येईल.

**३९. वीज दराचे भाग—**

३९.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या विजेच्या विक्रीचा दर हा वार्षिक स्थिर आकार आणि ऊर्जा आकार असा दोन भागांत असेल.

३९.२ जलविद्युत निर्मिती केंद्राच्या विजेच्या विक्रीचा दर हा क्षमता आकार आणि ऊर्जा आकार, असा दोन भागांत असेल.

**४०. वार्षिक स्थिर आकार—**

४०.१ वार्षिक स्थिर आकारांचे घटक खालीलप्रमाणे असतील :—

(ए) संचालन व देखभालीवरील खर्च ;

(बी) घसारा ;

(सी) कर्ज भांडवलातील व्याज ;

(डी) खेळत्या भांडवलावरील व्याज ;

(इ) भाग भांडवलावरील परतावा ;

(एफ) आयकर ;

**वजा :**

(जी) वीज-दराव्यतिरिक्त उत्पन्न ;

परंतु असे की, औष्णिक आणि जलविद्युत निर्मिती केंद्राकरिता घसारा, कर्ज भांडवलावरील व्याज, खेळत्या भांडवलावरील व्याज, भाग भांडवलावरील परतावा, आणि आयकर या बाबींना या विनियमांच्या भाग डी मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तरतुदींनुसार परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, लेखापरीक्षित लेख्यांच्या आधारे अचूक समायोजनाच्या वेळी आयोगाकडून, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मागील कालावधीतील उत्पन्न/खर्चास प्रकरणनिहाय परवानगी देण्यात येईल :

परंतु असेही की, निर्मिती कंपनीकडून कोणत्याही पक्षकाराला, आयोग किंवा न्यायालयाच्या आदेशाच्या परिणामस्वरूप, कोणत्याही निर्देशांची पूर्तता न करण्यासाठी किंवा नुकसानीसाठी देय असलेले सर्व दंड आणि नुकसानभरपाई यांची वसुली एकूण महसुली गरजेतून करण्यास परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु असेही की, निर्मिती कंपनी, अशा अदा करण्यात आलेल्या किंवा देय असलेल्या दंड आणि नुकसानभरपाईचा, असल्यास, वेगळा तपशील ठेवेल आणि तो त्यांच्या याचिकेसह आयोगाला सादर करील.

**४१. नूतनीकरण आणि आधुनिकीकरण—**

४१.१ निर्मिती केंद्राचे किंवा त्याच्या संचाचे आयुर्मान, त्याच्या उपयुक्त आयुर्मानाच्या पलीकडे आणखी वाढविण्याच्या प्रयोजनासाठी हाती घेण्यात आलेल्या नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाच्या मान्यतेसाठी निर्मिती कंपनी एक याचिका दाखल करील. या याचिकेसोबत सविस्तर प्रकल्प अहवाल, ज्यात कामाची पूर्ण व्याप्ती, समर्थन, खर्च-लाभांचे विश्लेषण, संदर्भ दिनांकापासून वाढीव आयुर्मानाचा अंदाज, निधी उभारणी योजना, खर्चाचे नियोजन, काम पूर्ण करण्याचे वेळापत्रक, संदर्भासाठी विचारात घेतलेली किमतीची पातळी, काम पूर्ण करण्याचा अंदजित खर्च, लाभधारकांबरोबर केलेल्या विचार-विनिमयाचे अभिलेखे आणि अन्य कोणतीही संबंधित माहिती, या बाबींचा समावेश असेल.

४१.२ नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाच्या अशा प्रस्तावास, खर्चाच्या अंदाजांचा वाजवीपणा, काम पूर्ण करण्याचे वेळापत्रक, कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर, खर्च-लाभ विश्लेषण, आणि आयोगाला समर्पक वाटतील असे काही घटक यांचा विचार करून, मान्यता देण्यात येईल.

४१.३ वायू/द्रव इंधनावर आधारित ओपन/कम्बाईन्ड सायकल औष्णिक निर्मिती संचाच्या बाबतीत, केंद्राच्या कार्यक्षम संचालनासाठी गॅस टर्बाइन/स्टीम टर्बाइनच्या नूतनीकरणासाठी, सुटे भाग जुने झाल्याने व त्यांच्या अनुपलब्धतेमुळे, आवश्यक झालेल्या कोणत्याही खर्चास मान्यता देण्यात येईल :

परंतु असे की, नूतनीकरण आणि आधुनिकीकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या वापरुन संपणाऱ्या गोष्टी आणि गॅस टर्बाईनचे घटक व सुट्ट्या भागांवर होणारा कोणताही खर्च, जो गॅस टर्बाईनच्या मोठ्या दुरुस्तीदरम्यान सर्वसाधारणपणे संचालन व देखभाल खर्चात समाविष्ट करण्यात येतो, त्यास काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मान्यता द्यावयाच्या नूतनीकरण आणि आधुनिकीकरण खर्चातून, योग्यरीत्या कमी करण्यात येईल.

४१.४ आयोगाने, नूतनीकरण आणि आधुनिकीकरण खर्च आणि उपयुक्त आयुर्मानातील वाढ यांच्या अंदाजांच्या आधारे आणि मूळ प्रकल्प खर्चामधून यापूर्वीच वसूल केलेला संचित घसारा वजा केल्यानंतर, काळजीपूर्वक छाननी करून, मान्यता दिलेला खर्च वीज दराच्या निश्चितीकरणासाठीचा आधार असेल.

**४२. अनिश्चित विजेची विक्री—**

औष्णिक निर्मिती केंद्राने वितरण परवानाधारकाला करावयाचा अनिश्चित वीज विक्रीचा दर हा, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, त्या कालावधीत केलेल्या प्रत्यक्ष इंधन खर्चाशी, ज्यात त्या कालावधीत झालेल्या दुय्यम इंधन खर्चाचा समावेश असेल, सममूल्य असेल :

परंतु असे की, निर्मिती कंपनीला अनिश्चित विजेच्या विक्रीपासून, इंधन खर्चाच्या वसुलीशिवाय मिळालेला अन्य कोणताही महसूल हा भांडवली खर्चात कपात करण्यासाठी वापरण्यात येईल आणि तो महसूल म्हणून समजण्यात येणार नाही.

**४३. वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न—**

४३.१ निर्मिती कंपनीचा वार्षिक स्थिर आकार निश्चित करताना, निर्मिती कंपनीचे आयोगाने मान्यता दिलेले वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न वजा करण्यात येईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी तिच्या वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नाच्या अंदाजांचा संपूर्ण तपशील आयोग ठरवून देईल त्या नमुन्यांमध्ये आयोगाला सादर करील ;

वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :—

(ए) जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न ;

(बी) भंगार विक्रीपासून मिळणारे उत्पन्न ;

(सी) गुंतवणुकींपासून मिळणारे उत्पन्न ;

(डी) राख/नाकारलेल्या कोळशाच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न ;

(इ) पुरवठादार/ठेकेदारांना दिलेल्या अग्रिमावरील व्याजाचे उत्पन्न ;

(एफ) निर्मिती कंपनीने त्यांच्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या गृह वसाहतींना केलेला वीज पुरवठा आणि निर्मिती केंद्राच्या ठिकाणच्या बांधकामासाठी निर्मिती कंपनीने केलेला वीज पुरवठा यापासून मिळालेले नक्त उत्पन्न, असा वीज पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चाचे समायोजन करून ;

(जी) कर्मचारी निवासस्थानांच्या भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(एच) ठेकेदारांकडून भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(आय) ठेकेदार आणि इतरांकडून भाडे तत्त्वावर दिलेल्या वस्तुंपासून मिळणारे उत्पन्न ;

(जे) जाहिरात इ. पासून मिळणारे उत्पन्न ;

(के) निविदा दस्तावेजांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न ;

(एल) वीज दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्न :

परंतु असे की, निर्मिती कंपनीच्या विनियमित व्यवसायाशी संबंधित भागभांडवलावरील परताव्यातून केलेल्या गुंतवणुकीपासून प्राप्त झालेले व्याज वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनीने त्यांच्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या गृह वसाहतींना आणि निर्मिती केंद्राच्या ठिकाणच्या बांधकामासाठी केलेल्या वीज पुरवठ्यासाठी वेगळी मीटर्स बसविण्यात येतील आणि देयक आकारणी करण्यात येईल :

परंतु असेही की, निर्मिती कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या गृह वसाहतींना आणि निर्मिती केंद्राच्या ठिकाणच्या बांधकामासाठी केलेल्या वीज पुरवठ्यासाठी वीज विक्रीचा दर हा त्या पुरवठा क्षेत्रातील वितरण परवानाधारकाला संबंधित ग्राहक वर्गवारीस वीज पुरवठा करण्यासाठी आयोगाकडून मान्यता देण्यात आलेल्या वीज दरा इतका असेल.

**४४. औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या कामकाजाचे निकष—**

४४.१ खालील विनियम ४४.२ मध्ये समाविष्ट असलेल्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांव्यतिरिक्त, अन्य सर्व औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकाराच्या पूर्ण वसुलीसाठी केंद्राचा उपलब्धता लक्ष्यांक ८५ टक्के राहील.

४४.२ महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.च्या (महानिर्मिती कंपनीच्या) खालील निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकारांच्या पूर्ण वसुलीसाठी उपलब्धता लक्ष्यांक खालीलप्रमाणे असेल :—

| औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचे नाव | केंद्राचा उपलब्धता लक्ष्यांक (%) |
|---|---|
| कोराडी टीपीएस | ७२.०० |
| खापरखेडा टीपीएस | ८५.०० |
| चंद्रपूर टीपीएस | ८०.०० |
| नाशिक टीपीएस | ८०.०० |
| भुसावळ टीपीएस - युनिट क्र. ४ आणि ५ वगळून | ८०.०० |
| परळी टीपीएस - युनिट क्र. ६ आणि ७ वगळून | ८०.०० |

परंतु असे की, जर कोणतेही नुतनीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम हाती घेतले असेल तर या निर्मिती केंद्रांच्या उपलब्धता निकषांमध्ये आयोग सुधारणा करू शकेल.

४४.३ औष्णिक निर्मिती केंद्र/संचांसाठी प्रोत्सहन-अधिदानाकरिता संयंत्र भार घटक लक्ष्यांक ८५ टक्के असेल.

४४.४ विनियम ४४.५ आणि ४४.६ मध्ये समाविष्ट असलेल्या केंद्रांव्यतिरिक्त, अन्य कोळशावर आधारित विद्यमान औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण खालीलप्रमाणे असेल :—

| २००/२१०/२५० मेगावॅटचे संच | ३०० मेगावॅटचे संच | ५०० मेगावॅटचे संच (sub-critical boilers) |
|---|---|---|
| २४५० किलो कॅलरी प्रति युनिट | २४०० किलो कॅलरी प्रति युनिट | २३७५ किलो कॅलरी प्रति युनिट |

**टीप-१**

५०० मेगावॅट संचांच्या संबंधात, जर बॉयलरला पाणी पुरवणारे पंप विद्युत चलित असतील तर केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण वर विनिर्दिष्ट केलेल्या केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाणापेक्षा ४० किलो कॅलरी प्रति युनिट कमी असेल.

**टीप-२**

ज्या विद्युत निर्मिती केंद्रांमध्ये २००/२१०/२५० मेगावॅटचे संच व ३०० मेगावॅट आणि ५०० मेगावॅटचे संच एकत्रित असतील, तेथे केंद्रातील प्रमाणकानुसार एकूण उष्मांकाचे प्रमाण हे केंद्रातील भारांकित सरासरीने येणारे उष्मांकाचे प्रमाण असेल.

४४.५ महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.च्या (महानिर्मिती कंपनीची) कोळशावर आधारित विद्यमान औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण खालीलप्रमाणे असेल :—

**(किलो कॅलरी प्रति युनिट)**

| वर्ष | कोराडी | खापरखेडा | चंद्रपूर | नाशिक | भुसावळ युनिट क्र. ४ आणि ५ वगळून | परळी युनिट क्र. ६ आणि ७ वगळून |
|---|---|---|---|---|---|---|
| **आर्थिक वर्ष २०१६-१७** | २८६४ | २६०६ | २६८८ | २७६४ | २७६१ | २८५९ |
| **आर्थिक वर्ष २०१७-१८** | २८७४ | २६१४ | २६९७ | २७७३ | २७७० | २८६८ |
| **आर्थिक वर्ष २०१८-१९** | २८८४ | २६२२ | २७०६ | २७८३ | २७७९ | २८७८ |
| **आर्थिक वर्ष २०१९-२०** | २८९३ | २६३० | २७१५ | २७९२ | २७८७ | २८८७ |

परंतु असे की, जर कोणतेही नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्यात आले असेल तर अशा निर्मिती केंद्रांच्या एकूण उष्मांक प्रमाणाच्या निकषांमध्ये आयोग सुधारणा करू शकेल.

४४.६ टाटा पॉवर कंपनी लि.च्या (टीपीसी-निर्मिती) विद्यमान औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण खालीलप्रमाणे असेल :—

**(किलो कॅलरी प्रति युनिट)**

| वर्ष | युनिट - ५ | युनिट-६ | | |
|---|---|---|---|---|
| | | १००% वायु प्रज्वलनासह | १००% तेल प्रज्वलनासह | तेल व वायू सह ५०:५० या प्रमाणात * |
| **आर्थिक वर्ष २०१६-१७** | २५२५ | २६६६ | २४२१ | २५४४ |
| **आर्थिक वर्ष २०१७-१८** | २५३३ | २६७१ | २४२६ | २५४९ |
| **आर्थिक वर्ष २०१८-१९** | २५४१ | २६७६ | २४३१ | २५५४ |
| **आर्थिक वर्ष २०१९-२०** | २५४९ | २६८१ | २४३६ | २५५९ |

**जर तेल व वायु यांच्या मिश्रणात ५ टक्क्यांपेक्षा कमी किंवा जास्त तफावत असली तर, संच ६ करीता एकूण उष्मांक प्रमाण तेल व वायु यांचे प्रत्यक्ष मिश्रण विचारात घेऊन मंजूर करण्यात येईल.*

४४.७ विद्यमान गॅस टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्र/संचासाठी केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण खालीलप्रमाणे असेल :—

**(किलो कॅलरी प्रति युनिट)**

| वर्ष | महानिर्मिती कंपनीचे उरण जीटीपीएस | टीपीसी-निर्मितीचा संच क्र.- ७ |
|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१६-१७ | २०२३ | २०२३ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ | २०२७ | २०२७ |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ | २०३१ | २०३१ |
| आर्थिक वर्ष २०१९-२० | २०३५ | २०३५ |

४४.८ १ एप्रिल २०१६ नंतर वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेल्या, कोळसा आणि लिग्नाइटवर आधारीत नवीन औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे/संचांसाठी केंद्रातील एकूण उष्मांक प्रमाण डिझाईन उष्मांक प्रमाणाच्या (किलो कॅलरी प्रति युनिट) १.०४५ पट इतके असेल ;

जेथे, संचाचे डिझाइन उष्मांक प्रमाण म्हणजे पुरवठादाराने, १००% एमसीआर, शून्य % मेकअप, डिझाइन कोळसा आणि डिझाइन कुलींग पाण्याचे तापमान/बॅक प्रेशर, अशी स्थिती असताना हमी दिलेले संचाचे उष्मांक प्रमाण होय :

परंतु असे की, युनिटच्या दाब आणि तापमान प्रमाणावर अवलंबून असणाऱ्या खालील कमाल डिझाइन युनिट उष्मांक प्रमाणापेक्षा, डिझाइन उष्मांक प्रमाण जास्त असणार नाही :—

| **दाब प्रमाण (किलोग्रॅम/सेंटीमीटर$^2$)** | **१५०** | **१७०** | **१७०** | **२४७** |
|---|---|---|---|---|
| SHT/RHT ($^0$C) | ५३५/५३५ | ५३७/५३७ | ५३७/५६५ | ५६५/५९३ |
| बॉयलर फीड पम्पाचा प्रकार | विद्युत चलित | टर्बाइन चलित | टर्बाइन चलित | टर्बाइन चलित |
| कमाल टर्बाइन सायकल उष्मांक प्रमाण (किलो कॅलरी/प्रति युनिट) | १९५५ | १९५० | १९३५ | १८५० |
| **बॉयलरची किमान कार्यक्षमता** | | | | |
| सब-बिटुमिनस देशी कोळसा | ०.८६ | ०.८६ | ०.८६ | ०.८६ |
| बिटुमिनस आयात केलेला कोळसा | ०.८९ | ०.८९ | ०.८९ | ०.८९ |
| **कमाल डिझाइन संच उष्मांक प्रमाण (किलो कॅलरी/प्रति युनिट)** | | | | |
| सब-बिटुमिनस देशी कोळसा | २२७३ | २२६७ | २२५० | २१५१ |
| बिटुमिनस आयात केलेला कोळसा | २१९७ | २१९१ | २१७४ | २०७८ |

परंतु आणखी असे की, संचाचे दाब आणि तापमान मापदंड जर वर नमूद केलेल्या प्रमाणापेक्षा वेगळे असतील तर सर्वात जवळच्या वर्गातील कमाल डिझाइन संच उष्मांक प्रमाण धरण्यात येईल :

परंतु असेही की, जेथे संचाच्या उष्मांक प्रमाणाची हमी देण्यात आलेली नसेल परंतु टर्बाइन सायकल उष्मांक प्रमाण आणि बॉयलर कार्यक्षमता यांची वेगवेगळी हमी एकाच पुरवठादाराकडून किंवा वेगवेगळ्या पुरवठादारांकडून देण्यात आली असेल तर दिलेल्या हमीनुसार टर्बाइन सायकल उष्मांक प्रमाण आणि बॉयलर कार्यक्षमता यांचा वापर करून संचाचे डिझाइन उष्मांक प्रमाण काढण्यात येईल :

परंतु असेही की, जेव्हा सब-बिटुमिनस इंडियन कोळशाची बॉयलर कार्यक्षमता ८६% च्या पेक्षा आणि आयात केलेल्या बिटुमिनस कोळशाची बॉयलर कार्यक्षमता ८९% पेक्षा कमी असते, तेव्हा केंद्रातील एकूण उष्मांक दराच्या परिगणनेसाठी सब-बिटुमिनस इंडियन कोळसा आणि बिटुमिनस आयात केलेला कोळसा यासाठी अनुक्रमे ८६% आणि ८९% हीच बॉयलर कार्यक्षमता विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, ड्राय कुलिंग सिस्टिमच्या प्रकाराकरिता कमाल टर्बाइन सायकल उष्मांक प्रमाण समायोजित करण्यात येईल :

परंतु असेही की, जर या विनियमांच्या प्रभावी दिनांकापूर्वी एक किंवा अधिक संचांचे कामकाज वाणिज्यिकरित्या सुरू झाल्याचे घोषित करण्यात आले असेल तर, अशा संचांकरिता तसेच या विनियमांच्या प्रभावी दिनांका रोजी किंवा त्यानंतर वाणिज्यिक कामकाज सुरू झाल्याचे घोषित करण्यात आलेल्या संचांकरीता, अशा संचांकरीता उष्मांक प्रमाणाचे निकष हे, विनियम ४४.४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर नमूद केलेल्या पद्धतीनुसार व निकषांनुसार काढलेल्या उष्मांक प्रमाण निकषांपेक्षा कमी असतील :

परंतु असेही की, लिग्नाइटवर प्रज्वलित निर्मिती केंद्रांच्या बाबतीत (सर्क्युलेटिंग फ्लुइडाइज्ड बेड कंम्बशन (सीएफबीसी) तंत्रज्ञानावर आधारीत केंद्रांसह), पदार्थामधील ओलाव्याच्या अंशासाठी खालील घटकांचा वापर करून कमाल डिझाइन उष्मांक प्रमाण वाढविण्यात येईल :—

(ए) ५० % ओलावा असलेला लिग्नाइट : १.१०

(बी) ४० % ओलावा असलेला लिग्नाइट : १.०७

(सी) ३० % ओलावा असलेला लिग्नाइट : १.०४

पदार्थातील ओलाव्याच्या अंशाच्या इतर मूल्यांसाठी, ३०-४०% आणि ४०-५०% या दरम्यान असलेल्या ओलाव्याच्या अंशासाठी गुणक, वरील उप-खंड (ए) ते (सी ) मधील संबंधित टप्प्यांसाठी दिलेल्या गुणकाच्या प्रमाणित मूल्यांवर अवलंबून, यथाप्रमाण राहील.

**टीप** : जर संचाच्या बॉयलरला पाणी देण्यासाठी वापरण्यात येणारे पंप विद्युत-चलित असतील तर, कमाल डिझाईन संच उष्मांक प्रमाण हे टर्बाइन-चलित पंपाकरिता वर विनिर्दिष्ट केलेल्या कमाल डिझाईन संच उष्मांक प्रमाणापेक्षा ४० किलो कॅलरी प्रति युनिट कमी राहील.

४४.९ १ एप्रिल २०१६ नंतर वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेल्या वायू- आधारित/द्रव-आधारित नवीन औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी केंद्रातील एकूण उष्मांक दर खालीलप्रमाणे असेल :—

= 1.05 x Design Heat Rate of the Unit/Block for Natural Gas and Regassified Liquefied Natural Gas (RLNG) (in kcal/kWh)

= 1.071 x Design Heat Rate of the Unit/Block for Liquid Fuel (kcal/kWh)

जेथे एका संचाचे डिझाईन उष्मांक प्रमाण म्हणजे १००% एमसीआर आणि जागेवर ॲम्बिअंट स्थिती असताना एका संचाकरिता दिलेल्या हमीनुसार उष्मांक प्रमाण; आणि एका ब्लॉकचे डिझाईन उष्मांक प्रमाण म्हणजे १००% एमसीआर, जागेवर ॲम्बिअंट स्थिती, शून्य % मेक-अप, डिझाईन कुलींग पाण्याचे तापमान/ बॅक प्रेशर, स्थिती असताना एका युनिटचे दिलेल्या हमीनुसार उष्मांक प्रमाण होय.

४४.१० जर एमएसएलडीने ग्रिडची सुरक्षितता किंवा लाभधारकांकडून मिळालेल्या कमी शेड्युलमुळे निर्मिती केंद्र किंवा संचाला प्रमाणकापेक्षा कमी भाराने परंतु किमान तांत्रिक शेड्युल इतके किंवा त्यापेक्षा जास्त, संचालनाचे निर्देश दिले तर, आयोगाकडून अचूक समायोजनाच्या वेळी, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, प्रकरण-निहाय तत्त्वावर, एकूण केंद्र उष्मांक दरामध्ये झालेली वाढ विचारात घेण्यात येईल.

४४.११ विनियम ४४.१२ मध्ये समाविष्ट असलेली औष्णिक विद्युत निर्मिती संच/केंद्रे वगळून, इतर सर्व औष्णिक विद्युत निर्मिती संच/केंद्रांकरिता दुय्यम इंधन-तेल वापराचे निकष खालीलप्रमाणे असतील :—

(ए) कोळशावर आधारित निर्मिती केंद्र : ०.५० मिली लिटर प्रति युनिट,

(बी) सीएफबीसी तंत्रज्ञानावर आधारित केंद्रे वगळून लिग्नाईट प्रज्वलित निर्मिती केंद्रे : २.० मिली लिटर प्रति युनिट,

(सी) सीएफबीसी तंत्रज्ञानावर आधारित लिग्नाईटवर प्रज्वलित निर्मिती केंद्रे : १.० मिली लिटर प्रति युनिट.

४४.१२ महानिर्मिती कंपनीच्या केंद्रांकरिता दुय्यम इंधन-तेल वापराचे निकष खालीलप्रमाणे असतील :—

| **औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे** | **दुय्यम इंधन- तेल वापर (मिली लिटर प्रति युनिट)** |
|---|---|
| कोराडी टीपीएस | २.८१ |
| खापरखेडा टीपीएस | २.०० |
| चंद्रपूर टीपीएस | २.०० |
| नाशिक टीपीएस | १.५० |
| भुसावळ टीपीएस युनिट क्र.६ आणि ७ वगळून | २.०० |
| परळी युनिट क्र. ६ आणि ७ वगळून | २.०० |

परंतु असे की, जर कोणतेही नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्यात आले तर या निर्मिती केंद्रांच्या बाबतीत दुय्यम इंधन-तेल वापराच्या निकषांमध्ये आयोग सुधारणा करू शकेल.

४४.१३ कोळशावर आधारित नवीन औष्णिक निर्मिती केंद्रांकरिता दुय्यम वीज वापर खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे राहील :—

| **तपशील** | **नैसर्गिक ड्राफ्ट कुलिंग टॉवर सह किंवा कुलिंग टॉवर शिवाय** |
|---|---|
| **(एक) २००/२५० मेगावॅट श्रेणी** | ८.५० % |
| **(दोन) ३००/३३०/३५०/५०० मेगावॅट आणि त्यावरील** | |
| **बॉयलरला पाणी पुरविणारे वाफेवर चालणारे पंप** | ५.२५ % |
| **बॉयलरला पाणी पुरविणारे विद्युत चलित पंप** | ७.७५ % |

परंतु असे की, इंड्युस्ड ड्राफ्ट कुलिंग टॉवर्स असलेल्या औष्णिक निर्मिती केंद्रांकरिता निकष, वर उल्लेखिलेल्या निकषांच्या तुलनेत ०.५ टक्क्यांनी उच्च असतील :

परंतु आणखी असे की, ड्राय कुलिंग सिस्टम असलेल्या संयत्रांकरिता खालीलप्रमाणे अतिरिक्त सहाय्यक ऊर्जा वापरास मान्यता देता येईल :—

| **ड्राय कुलिंग सिस्टमचा प्रकार** | **(एकूण निर्मितीच्या %)** |
|---|---|
| यांत्रिक ड्राफ्ट पंखे असलेला डायरेक्ट कुलिंग एअर कुल्ड कंडेन्सर्स | १.० % |
| इन्डायरेक्ट कुलिंग सिस्टम एम्प्लॉयिंग जेट कन्डेन्सर्स विथ प्रेशर रिकव्हरी टर्बाइन ॲण्ड नॅचरल ड्राफ्ट टॉवर | ०.५ % |

परंतु असेही की, फ्लु गॅस डी-सल्फ्युरायझर (एफजीडी) असलेल्या औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी, काळजीपूर्वक छाननीनंतर, प्रकरण-निहाय तत्त्वावर अतिरिक्त सहाय्यकारी ऊर्जा वापरास मान्यता देण्यात येईल :

परंतु असेही की, वैधानिक प्राधिकरणाकडून अनिवार्य करण्यात आलेल्या कोणत्याही अतिरिक्त उपकरण असलेल्या औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी, अतिरिक्त सहाय्यकारी ऊर्जा वापरास, काळजीपूर्वक छाननीनंतर प्रकरण-निहाय तत्त्वावर, परवानगी देण्यात येईल.

४४.१४ महानिर्मिती कंपनीच्या कोळशावर आधारित औष्णिक निर्मिती केंद्रांसाठीचा सहाय्यकारी ऊर्जा वापर खाली देण्यात आलेल्या तक्त्याप्रमाणे राहील :—

| केंद्रे | आ.व. २०१६-१७ | आ.व. २०१७-१८ | आ.व. २०१८-१९ | आ.व. २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| कोराडी टीपीएस | १०.८१% | १०.८१% | १०.८१% | १०.८१% |
| खापरखेडा टीपीएस | ९.७०% | ९.७०% | ९.७०% | ९.७०% |
| चंद्रपूर टीपीएस | ८.६७% | ८.६७% | ८.६७% | ८.६७% |
| नाशिक टीपीएस | ११.००% | ११.००% | ११.००% | ११.००% |
| भुसावळ टीपीएस युनिट क्र. ६ आणि ७ | १०.९६% | १०.९६% | १०.९६% | १०.९६% |
| परळी टीपीएस युनिट क्र. ६ आणि ७ वगळून | १२.६५% | १२.६५% | १२.६५% | १२.६५% |

परंतु असे की, जर कोणतेही नूतनीकरण आणि आधुनिकीकरण हाती घेण्यात आले तर अशा निर्मिती केंद्रांच्या बाबतीत सहाय्यकारी ऊर्जा वापराच्या निकषांमध्ये आयोग सुधारणा करू शकेल.

४४.१५ कोळशावर आधारित अन्य विद्यमान औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी सहाय्यकारी ऊर्जा वापर खाली देण्यात तक्त्याप्रमाणे राहील :—

| तपशील | नैसर्गिक ड्राफ्ट कुलिंग टॉवर सह किंवा कुलिंग टॉवर शिवाय |
|---|---|
| (एक) २००/२५० मेगावॅट श्रेणी | ८.५०% |
| (दोन) ३००/३३०मेगावॅट आणि त्यावरील बॉयलरला पाणी पुरविणारे वाफेवर चालणारे पंप | ६.००% |
| बॉयलरला पाणी पुरविणारे विद्युत चलित पंप | ८.५० |

४४.१६ टीपीसी-निर्मितीच्या संच क्र. ६ करीता सहाय्यकारी ऊर्जा वापर ३.५ % इतका राहील.

४४.१७ गॅस टर्बाइन/ कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रे/संचांकरिता सहाय्यकारी ऊर्जा वापर खालीलप्रमाणे राहील :—

(ए) कम्बाइन्ड सायकल : ३.० %

(बी) ओपन सायकल : १.० %

४४.१८ लिग्नाईटवर प्रज्वलित औष्णिक निर्मिती केंद्रे/संचांकरिता सहाय्यकारी ऊर्जा वापर विनियम ४४.१३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोळशावर आधारित निर्मिती केंद्रांच्या सहाय्यकारी ऊर्जा वापराच्या निकषांपेक्षा ०.५ टक्के बिंदुंनी उच्च राहील :

परंतु असे की, सीएफबीसी तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या लिग्नाइट प्रज्वलित केंद्रांसाठी, सहाय्यकारी ऊर्जा वापराचे निकष विनियम ४४.१३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोळशावर आधारित निर्मिती केंद्रांच्या सहाय्यकारी ऊर्जा वापराच्या निकषांपेक्षा १.५ टक्के बिंदुंनी उच्च राहील.

४४.१९ वाहतूक व हाताळणीतील तोटे :—

कोळसा किंवा लिग्नाईटवर आधारित निर्मिती केंद्रांकरिता, प्रमाणकानुसार वाहतूक व हाताळणीतील तोटे, संबंधित महिन्यात कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपनीने पाठविलेल्या कोळसा किंवा लिग्नाईटच्या परिमाणाच्या टक्केवारीत खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील :—

(ए) खाणीजवळ असलेली निर्मिती केंद्रे - ०.२ % ;

(बी) खाणीजवळ नसलेली निर्मिती केंद्रे - ०.८ % :

परंतु असे की, खाणीजवळ असलेल्या निर्मिती केंद्राच्या बाबतीत, जवळच्या खाणी वगळून अन्य स्त्रोतांकडून कोळसा किंवा लिग्नाइट खरेदी केल्यास, ज्याची वाहतूक रेल्वेच्या माध्यमातून करण्यात येते, प्रमाणकानुसार वाहतूक हानि ०.८ टक्के इतकी लागू राहील ;

परंतु आणखी असे की, वरील निकष हे देशांतर्गत कोळसा आणि धुतलेला कोळसा यांना लागू राहतील :

परंतु आणखी असे की, आयात केलेल्या कोळशाच्या बाबतीत, प्रमाणकानुसार वाहतुकीतील हानि आणि हाताळणीतील तोटा ०.२ टक्के इतका राहील :

परंतु असेही की, पोहोचणी करण्याच्या (डिलिव्हरी) तत्त्वावर कोळशाची खरेदी करण्यात आली तर, वाहतूक व हाताळणीतील कोणत्याही तोट्यांना परवानगी देण्यात येणार नाही.

**४५. संचालन व देखभाल खर्च—**

४५.१ २६ ऑगस्ट २००५ पूर्वी वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेले निर्मिती केंद्रे/संच :—

(ए) मविनिआ (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी ज्या निर्मिती केंद्राचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाले आहे त्यांच्या संचालन आणि देखभाल खर्चाची परिगणना या विनियमांनुसार करण्यात येईल ;

(बी) पाणी आकार वगळून आणि विम्यासह संचालन आणि देखभाल खर्च हे, कार्यक्षमता नफा/तोट्याच्या हिश्श्याची भर घालून/वजा करून, दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या मागील तीन वर्षांच्या संचालन व देखभाल खर्चाच्या अचूक समायोजित सरासरीच्या आधारे काढण्यात येतील व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीस अधीन राहून, वगळण्यात येतील ;

(सी) अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०१५ रोजी सुरू होणाऱ्या आधारभूत वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठी, ५.७२ % वृद्धी दराने वाढ करण्यात येईल ;

(डी) पुढील प्रत्येक वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च, आर्थिक वर्ष २०१५-२०१६ करीता वर निश्चित केलेला आधारभूत खर्चास, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर मागील वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) मागील वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने वाढवून व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का कमी करून, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढता येतील :

परंतु असे की, आयोगकडून वेळोवेळी वेगवेगळा कार्यक्षमता घटक ठरवून देता येईल :

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील वेगवेगळया वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्चांचे अचूक समायोजन करताना, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार याच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर संबंधित वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) संबंधित वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मूल्याने कमी करून, विचारात घेण्यात येईल ;

(इ) प्रकल्पाचा प्रकार, कुलिंग वॉटर सिस्टिमचा प्रकार इ. वर अवलंबून असलेल्या पाणी वापराच्या आधारे, काळजीपूर्वक छाननीस अधीन राहून, प्रत्यक्ष पाणी वापरानुसार पाणी आकारांस वेगळी परवानगी देण्यात येईल :

परंतु असे की, बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशात, आयोग, निर्मिती कंपनीसाठी उपलब्ध असलेल्या अगदी अलीकडच्या लेखापरीक्षित लेख्यांनुसार प्रत्यक्ष पाणी आकारांच्या आधारे, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी पाणी आकारांना तात्पुरती परवानगी देईल.

४५.२ २६ ऑगस्ट २००५ रोजी किंवा त्यानंतर वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेली नवीन निर्मिती केंद्रे आणि निर्मिती केंद्रे—

(ए) कोळशावर आधारित निर्मिती केंद्रांकरिता :—

(रुपये लाख/ मेगावॅट)

| तपशील | २००/२१०/२५० मेगावॅटचे संच | ३००/३३०/३५० मेगावॅटचे संच | ५०० मेगावॅटचे संच | ६०० मेगावॅट आणि त्यावरील संच |
|---|---|---|---|---|
| **आर्थिक वर्ष २०१६-१७** | २३.८० | १९.७० | १५.५९ | १४.०३ |
| **आर्थिक वर्ष २०१७-१८** | २४.९९ | २०.६८ | १६.३७ | १४.७३ |
| **आर्थिक वर्ष २०१८-१९** | २६.२४ | २१.७१ | १७.१९ | १५.४७ |
| **आर्थिक वर्ष २०१९-२०** | २७.५५ | २२.८० | १८.०५ | १६.२४ |

परंतु असे की, ज्या निर्मिती केंद्रामध्ये वरील संच एकत्रित (कॉम्बिनेशन) असतील त्यांच्याकरिता संचालन व देखभाल खर्चासाठी भारांकित सरासरी मूल्यास परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, एकाच केंद्रातील दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी किंवा त्यानंतर वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झालेल्या संबंधित संचाच्या आकारमानातील अतिरिक्त संचासाठी संचालन व देखभाल खर्चाचे निकष काढण्याकरिता खालील गुणकाने निकषांना गुणण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| २००/२१०/२५० मेगावॅट | अतिरिक्त ५वा आणि ६वा संच | ०.९० |
| | अतिरिक्त ७वा आणि जास्त संच | ०.८५ |
| ३००/३३०/३५० मेगावॅट | अतिरिक्त ४था आणि ५वा संच | ०.९० |
| | अतिरिक्त ६वा आणि जास्त संच | ०.८५ |
| ५०० मेगावॅट आणि त्यावरील | अतिरिक्त ३रा आणि ४था संच | ०.९० |
| | अतिरिक्त ५वा आणि वरील संच | ०.८५ |

(बी) लिग्नाईटवर आधारित निर्मिती केंद्रांकरिता :—

(रुपये लाख/ मेगावॅट)

| तपशील | लिग्नाईटवर आधारित निर्मिती संच/केंद्रे |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१६-१७ | १७.८४ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ | १८.७३ |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ | १९.६६ |
| आर्थिक वर्ष २०१९-२० | २०.६५ |

(सी) गॅस टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रांकरिता :—

(रुपये लाख/ मेगावॅट)

| तपशील | गॅस टर्बाइन/कम्बाइन्ड सायकल निर्मिती केंद्रे | लहान गॅस टर्बाइन/ निर्मिती केंद्रे (५० मेगावॅट पेक्षा कमी आकारमानाचे संच) | प्रगत वर्ग – एफ यंत्रे |
|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१६-१७ | १४.५६ | १७.६७ | १४.०४ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ | १५.२९ | १८.५६ | १४.७४ |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ | १६.०६ | १९.४८ | १५.४८ |
| आर्थिक वर्ष २०१९-२० | १६.८६ | २०.४६ | १६.२५ |

**४६. जल-विद्युत केंद्राच्या कामकाजाचे निकष—**

४६.१ खालील प्रमाणकानुसार वार्षिक संयंत्र उपलब्धता घटक (एनएपीएएफ) जल-विद्युत निर्मिती केंद्रांना लागू राहतील :—

| अ. क्र. | तपशील | प्रमाणनुसार वार्षिक संयंत्र उपलब्धता घटक |
|---|---|---|
| (ए) | जलसाठ्याचे आणि जलाशय प्रकाराचे संयंत्र ज्याच्या रिझर्वायरच्या पाण्याची पूर्ण पातळी (एफआरएल) आणि पाण्याची उपयुक्त किमान पातळी (एमडीडीएल) यामधील फरक ८% पर्यंत आणि ज्याच्या संयंत्र उपलब्धतेवर गाळाचा परिणाम होत नाही. | ९०% |
| (बी) | जलसाठ्याचे आणि जलाशय प्रकाराचे संयंत्र ज्याच्या रिझर्वायरच्या पाण्याची पूर्ण पातळी (एफआरएल) आणि पाण्याची उपयुक्त किमान पातळी (एमडीडीएल) यामधील फरक ८% पेक्षा जास्त असेल आणि ज्याच्या संयंत्र उपलब्धतेवर गाळाचा परिणाम होत नाही. | सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रकल्प प्राधिकरणाने दिलेली महिना-निहाय सर्वोच्च मागणीच्या काळातील क्षमता, ज्यास संबंधित प्राधिकरणाने परवानगी दिलेली असते, ती पिकिंग क्षमता एनएपीएएफ निश्चित करण्याचा आधार असेल. |
| (सी) | जलाशय प्रकाराचे संयत्र, ज्याच्या संयंत्र उपलब्धततेवर गाळाचा लक्षणीय परिणाम होतो. | ८५ % |
| (डी) | नदीच्या पाण्यावर चालणारे संयत्र | जेथे संबंधित/उपलब्ध असेल तेथे मागील अनुभवांद्वारे संयमित केलेल्या दहा दिवसांच्या डिझाईन उर्जा माहिती-संग्रहाच्या (डेटा) आधारे, संयंत्र-निहाय निश्चित करावयाचा. |

परंतु असे की, आयोगाकडून विशेष परिस्थिती अंतर्गत, जसे की, असाधारण गाळाचा अडथळा किंवा प्रचालनात्मक अन्य स्थिती, आणि प्रकल्पाच्या माहित असलेल्या मर्यादा, अशा स्थितीत एनएपीएएफमध्ये आणखी सूट देता येईल.

४६.२ पम्प्ड स्टोअरेज जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, खालच्या पातळीवरील जलसाठ्यातून उंच पातळीवरील जलसाठ्यात पम्पाने पाणी खेचण्यासाठी लागणाऱ्या विजेची व्यवस्था लाभधारकांकडून, निर्मिती केंद्राच्या बस बारपर्यंतची पारेषण हानि आणि वितरण हानि विचारात घेऊन, करण्यात येईल, आणि त्या बदल्यात, लाभधारकारकांना निर्मिती केंद्राकडून विजेच्या सर्वोच्च मागणी तासांमध्ये खालच्या पातळीवरील जलसाठ्यातून उंच पातळीवरील जलसाठ्यात पम्पाने पाणी खेचण्यासाठी वापरलेल्या ऊर्जेच्या ७५ टक्क्यांच्या सममूल्य ऊर्जा मिळविण्याचा हक्क राहील आणि निर्मिती केंद्रावर विजेच्या सर्वोच्च मागणीच्या तासांमध्ये विजेचा असा पुरवठा करणे बंधनकारक राहील :

परंतु असे की, सर्वोच्च मागणी नसतानाच्या तासांमध्ये इच्छित पातळीच्या ऊर्जेचा पुरवठा लाभधारक करू शकला नाही तर विजेच्या सर्वोच्च मागणी असतानाच्या तासामंध्ये केंद्राकडून ऊर्जा मिळविण्याच्या लाभधारकाच्या हक्कांमध्ये यथाप्रमाणात घट होईल.

४६.३ जल विद्युत निर्मिती केंद्रांसाठी खालील प्रमाणकानुसार सहाय्यकारी उर्जा वापर लागू राहील :—

(ए) जमिनीवरील जल विद्युत निर्मिती केंद्र—

| | |
|---|---|
| (एक) जनरेटर शॅफ्टवर बसविलेल्या रोटेटिंग एक्साईटर्ससह : | ०.७ % |
| (दोन) स्टॅटिक एक्सायटेशन यंत्रणेसह | १.० % |

(बी) जमिनीखालील जल विद्युत निर्मिती केंद्र

| | |
|---|---|
| (एक) जनरेटर शॅफ्टवर बसविलेल्या रोटेटिंग एक्साईटर्ससह : | ०.९ % |
| (दोन) स्टॅटिक एक्सायटेशन यंत्रणेसह | १.२ % |

**४७. जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता संचालन व देखभाल खर्च—**

४७.१ विद्यमान केंद्रांसाठी :—

(ए) दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या तीन (३) वर्षांच्या अचूक समायोजन केलेल्या विम्यासह संचालन व देखभालीवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चामध्ये कार्यक्षमतेतील वाढ/घटीचा हिस्सा, वाढवून/कमी केल्यानंतर येणाऱ्या सरासरीच्या आधारे संचालन व देखभाल खर्च काढण्यात येतील व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, वगळण्यात येतील ;

(बी) अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०१५ रोजी सुरू होणाऱ्या आधारभूत वर्षांकरिता संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठी, ५.७२ % वृद्धी दराने वाढ करण्यात येईल ;

(सी) पुढील प्रत्येक वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता निश्चित केलेला आधारभूत खर्चास, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर मागील वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) मागील वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने वाढवून व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का कमी करून, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढता येतील :

परंतु असे की, आयोगाकडून वेळोवेळी वेगवेगळा कार्यक्षमता घटक ठरवून देता येईल :

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील वेगवेगळया वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्चांचे अचूक समायोजन करताना, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार याच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर संबंधित वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) संबंधित वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मूल्याने कमी करून, विचारात घेण्यात येईल ;

(डी) निर्मिती कंपनीने, त्यांच्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या गृह वसाहती आणि संबंधित खर्चासह वैद्यकीय व अन्य सुविधांवर केलेल्या संचालन आणि देखभाल खर्चाची वेगळी नोंद ठेवण्यात येईल आणि ती उपरोक्त बाबींमधून वगळण्यात येईल, आणि काळजीपूर्वक छाननीनंतर, त्यास वेगळी मान्यता देण्यात येईल.

४७.२ नवीन केंद्रांकरिता :—

(ए) वाणिज्यिक कामकाजाच्या पहिल्या वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च हे मूळ प्रकल्प खर्चाच्या (पुनर्वसन आणि पुनर्वसाहतीच्या कामावरील खर्च वगळून) २ % दराने निश्चित करण्यात येतील ;

(बी) पुढील प्रत्येक वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च, वर निश्चित केलेला आधारभूत खर्चास, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर मागील वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) मागील वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने, विचारात घेऊन व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का कमी करून, वाढविण्यात येऊन, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढता येतील :

परंतु असे की, आयोगाकडून वेळोवेळी वेगवेगळा कार्यक्षमता घटक ठरवून देता येईल :

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील वेगवेगळया वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्चांचे अचूक समायोजन करताना, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार याच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर संबंधित वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) संबंधित वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मूल्याने कमी करून, विचारात घेण्यात येईल.

**४८. औष्णिक निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकार आणि ऊर्जा आकार यांची परिगणना करणे व त्यांचा भरणा करणे–**

ए. वार्षिक स्थिर आकार—

४८.१ या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निकषांच्या आधारे एकूण वार्षिक स्थिर आकारांची परिगणना करण्यात येईल आणि त्यांची वसुली मासिक तत्त्वावर करण्यात येईल :

४८.२ विनियम ४४.१ आणि ४४.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपलब्धता लक्ष्यांकानुसार संपूर्ण वार्षिक स्थिर आकार वसुलीयोग्य राहतील आणि उपलब्धता लक्ष्यांकाच्या पातळीपेक्षा कमी पातळीवरील वार्षिक स्थिर आकारांची वसुली यथाप्रमाण तत्त्वावर करण्यात येईल :

परंतु असे की, उपलब्धता शून्य असल्यास, कोणतेही वार्षिक क्षमता आकार देय असणार नाहीत.

४८.३ वार्षिक स्थिर आकारांची परिगणना आणि देयकात आकारणी, वर्षातील संबंधित महिन्यापर्यंत, करारांतर्गत क्षमतेच्या प्रमाणात आणि उपलब्धता लक्ष्यांकाच्या संबंधात साध्य केलेल्या संचयी उपलब्धतेच्या आधारे, वर्षाच्या अखेरीस करावयाच्या समायोजनेच्या अधीन राहून, मासिक तत्त्वावर करण्यात येईल.

बी. ऊर्जा आकार—

४८.४ ऊर्जा आकारांमध्ये प्राथमिक इंधन व दुय्यम इंधनाच्या निर्मिती केंद्रापर्यंत पोहाचणी करण्याच्या खर्चाचा समावेश असेल व हा खर्च निर्मिती केंद्रातून बाहेर पाठविलेल्या एक्स-बस ऊर्जा तत्त्वावर खालील सूत्रानुसार काढण्यात येईल :—

ऊर्जा आकार (रुपये) = ऊर्जा आकारांचा ‘रुपये प्रति युनिट’ मधील दर x प्रत्यक्ष निर्मितीशी अनुरूप संबंधित महिन्यातील युनिट्समधील बाहेर पाठविलेली एक्स बस ऊर्जा.

४८.५ ‘रुपये प्रति युनिट’ मधील ऊर्जा आकारांच्या दरांची (इसीआर) परिगणना तीन दशांश स्थानांपर्यंत करण्यात येईल आणि हा दर एक्स बस विजेचे एक युनिट पाठविण्यासाठी (डिलिव्हरी) लागणाऱ्या प्रमाणकानुसार प्रमुख व दुय्यम इंधन परिणामावरील खर्चाच्या बेरजेइतका असेल आणि त्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :—

$$ECR = \frac{[P_p \times (Q_p)_n + P_s \times (Q_s)_n]}{[1-(AUX_n)]} \quad (Rs/kWh)$$

जेथे $P_p$ = प्रमुख इंधन म्हणजे कोळसा किंवा लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधन आणि चुनखडी, लागू असल्यास, यांची रुपये/किलोग्रॅम किंवा रुपये/घनमीटर किंवा रुपये/लिटर, जसे असेल तसे, मधील निर्मिती केंद्रापर्यंत पोहाचणी करण्याचा खर्च.

$(Q_p)_n$ = किलोग्रॅम किंवा लिटर किंवा घनमीटर मध्ये, जसे असेल तसे, निर्मिती टर्मिनलमध्ये एक युनिट विजेच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या प्रमुख इंधनाचे परिमाण ज्याची परिगणना प्रमाणकानुसार केंद्रातील अनलोडींग पॉईंटच्या ठिकाणी एकूण उष्मांक दरामधून (वजा कोळसा /लिग्नाइटवर आधारीत निर्मिती केंद्रांसाठी दुय्यम इंधन तेलाने निर्माण केलेली उष्णता) प्रत्यक्ष स्टॉकिंग तोटा किंवा कमाल १५० किलो कॅलरी/किलोग्रॅम, वजा करून प्राप्त झालेल्या कोळसा/लिग्नाइट किंवा वायू आणि द्रव इंधनाचे एकूण कॅलरीफिक मूल्य, यांच्या आधारे काढण्यात येईल.

$P_s$ = दुय्यम इंधन-तेलाचा रुपये/मिली लिटर मधील उतरवणुकीचा खर्च

$(Q_s)_n$ = विनियम ४४.११ आणि ४४.१२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, दुय्यम इंधन-तेलाचे मिली लिटर/युनिट मधील प्रमाणकानुसार परिमाण, आणि

$AUX_n$ = विनियम ४४.१३ ते ४४.१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण निर्मितीच्या टक्केवारीमध्ये प्रमाणकानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापर.

परंतु असे की, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी प्राथमिक इंधन आणि दुय्यम इंधनाची निर्मिती केंद्रापर्यंत पोहाचणी करण्याच्या मागील तीन महिन्यांतील प्राथमिक आणि दुय्यम इंधनाच्या प्रत्यक्ष भारांकित सरासरी खर्चावर आधारीत असेल, आणि मागील तीन महिन्यांचा खर्च नसल्यास, विद्यमान केंद्रासाठी ज्या कालावधीसाठी वीज दर निश्चित करावयाचा आहे त्या कालावधीच्या मागील पहिल्या महिन्यातील आणि नवीन निर्मिती केंद्राच्या बाबतीत लगोलगच्या मागील तीन महिन्यातील, प्राथमिक इंधन आणि दुय्यम इंधनाची अगदी अलीकडील खरेदी किंमत विचारात घेण्यात येईल :

परंतु आणखी असे की, इंधनाच्या निर्मिती केंद्रापर्यंत पोहाचणी करण्याच्या खर्चामध्ये, स्वामित्वधन, लागू असलेले कर व शुल्क, यासहित इंधनाचा दर्जा/गुणवत्ता/कॅलरीफिक मूल्य, रेल्वे/रस्ते/गॅस-पाइप वाहिनी किंवा अन्य कोणत्याही मार्गाने होणाऱ्या वाहतुकीचा खर्च यास अनुरूप असलेल्या इंधन किमतीचा समावेश असेल आणि ऊर्जा आकाराच्या परिगणनेच्या प्रयोजनासाठी, विनियम ४४.१९ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्या महिन्या दरम्यान इंधन पुरवठा कंपनीने पाठविलेल्या इंधन परिमाणाच्या टक्केवारीत, प्रमाणकानुसार वाहतुकीतील व हाताळणीचे तोटे विचारात घेण्यात येतील :

परंतु असेही की, इंधन पुरवठादारांकडून दंडापोटी मिळालेल्या कोणत्याही रकमेसह कोणताही कर व शुल्काचा परतावा, इंधन खर्चामध्ये समायोजित करणे आवश्यक राहील :

परंतु असेही की, देयके तयार करणे/इंधन अधिभार आकारणीच्या प्रयोजनासाठी ऊर्जा आकारांची परिगणना, प्रत्येक संचाच्या प्रत्यक्ष वीज निर्मितीवर आधारित भारांकित सरासरी दराने केंद्र-निहाय/संच-निहाय, करण्यात येईल.

४८.६ **इंधनांच्या किमती किंवा उष्मांक मूल्यात होणाऱ्या बदलांमुळे इ सी आर चे (इंधन अधिभार समायोजन) समायोजन :—**

वीज निर्मिती केंद्रासाठी निर्मिती कंपनीने खरेदी केलेल्या कोळसा/लिग्नाइट/तेल किंवा वायू किंवा द्रव इंधनाच्या साठ्याचे सरासरी एकूण कॅलरीफिक मूल्य (जीसीव्ही) आणि कोळसा/लिग्नाइट/तेल किंवा वायू किंवा द्रव इंधन खरेदी करण्यासाठी निर्मिती कंपनीने केलेला निर्मिती केंद्रापर्यंत पोहाचणी करण्याचा भारांकित सरासरी खर्च, जसे असेल तसे, यांच्या आधारे, मान्यता दिलेल्या मूल्यांच्या तुलनेत, प्रत्यक्ष साठवणुकीतील हानि, १५० किलो कॅलरी/ किलोग्रॅम कमाल हानिच्या मर्यादेत, वजा करून उतरवणुकीच्या ठिकाणी प्राप्त केलेल्या कोळसा/लिग्नाइट/तेल किंवा वायू किंवा द्रव इंधनाची किंमत व एकूण कॅलरीफिक मूल्य यातील तफावतीचे समायोजन मासिक तत्त्वावर करण्यात येईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी त्यांच्या देयकांमध्ये आयोगाने मान्यता दिलेल्या प्राथमिक आणि दुय्यम इंधनाच्या आधारभूत किमतीनुसार ऊर्जा आकारांचा दर आणि इंधन अधिभार वेगवेगळा निर्देशित करील :

परंतु आणखी असे की, निर्मिती कंपनी निर्मिती केंद्राच्या लाभधारकांना एकूण कॅलरीफिक मूल्याचे (जीसीव्ही) मापदंड आणि प्रत्येक प्रकारच्या इंधनाची किंमत, म्हणजेच, देशांतर्गत कोळसा, आयात केलेला कोळसा, ई-ऑक्शन कोळसा, लिग्नाईट, नैसर्गिक वायू, आरएलएनजी, द्रव इंधन इ. चा तपशील, आयोगाने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे देईल :

परंतु असेही की, आयात केलेल्या कोळशाबरोबर देशांतर्गत कोळशाच्या मिश्रणाचे गुणोत्तर, इ-ऑक्शन कोळशाचे प्रमाण आणि प्राप्त झालेल्या इंधनाच्या एकूण कॅलरीफिक मूल्याची भारांकित सरासरी, यांचा वेगळा तपशील, संबंधित महिन्याच्या देयकासोबत देण्यात येईल :

परंतु असेही की, निर्मिती कंपनीच्या संकेत-स्थळावर देखील देयकाच्या प्रती आणि एकूण कॅलरीफिक मूल्यांच्या मापदंडांचा तपशील व इंधनाची किंमत म्हणजेच, देशांतर्गत कोळसा, आयात केलेला कोळसा, इ-ऑक्शन कोळसा, लिग्नाइट, नैसर्गिक वायू, आरएलएनजी, द्रव इंधन इ. ची किंमत, आयात केलेल्या कोळशाबरोबर देशांतर्गत कोळशाच्या मिश्रणाचे गुणोत्तर, इ-ऑक्शन कोळशाचे प्रमाण इ. चा तपशील मासिक तत्त्वावर प्रदर्शित करण्यात येईल, आणि त्यांच्या संकेत-स्थळावर तीन महिन्यांच्या कालावधीसाठी हा तपशील उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

सी. प्रोत्साहन-अधिदान

४८.७ संयंत्र भार घटक लक्ष्यांकास अनुरूप एक्स-बस ऊर्जेच्या निर्मितीपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष ऊर्जा निर्मितीसाठी २५.० पैसे प्रति युनिट या एकच दराने प्रोत्साहन-अधिदान देय राहील.

४८.८ प्रोत्साहन-अधिदानाच्या रकमेची परिगणना आणि देयकात आकारणी, वर्षातील संबंधित महिन्यापर्यंत अखेरीस संयंत्र भार घटक लक्ष्यांकाच्या संबंधात साध्य केलेल्या संचयी तत्त्वावरील संयंत्र भार घटकाच्या आधारे, वर्षाच्या अखेरीस करावयाच्या समायोजनेस अधीन राहून, मासिक तत्त्वावर करण्यात येईल.

**४९. जल-विद्युत निर्मिती केंद्रांसाठी क्षमता आकार, ऊर्जा आकार आणि लिज भाडे यांची परिगणना करणे व त्यांचा भरणा करणे—**

४९.१ जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या वार्षिक स्थिर आकारांची परिगणना, या विनियमांत विनिर्दिष्ट केलेल्या निकषांच्या आधारे, वार्षिक तत्त्वावर करण्यात येईल आणि त्यांची वसुली, क्षमता आकार (प्रोत्साहन-अधिदान समाविष्ट असलेल्या) आणि ऊर्जा आकाराखाली, मासिक तत्त्वावर करण्यात येईल व हे आकार लाभधारकांकडून, निर्मिती केंद्राच्या क्षमतेमधील त्यांच्या संबंधित हिश्श्याच्या प्रमाणात, देय राहतील.

४९.२ क्षमता आकार आणि ऊर्जा आकारांच्या माध्यमातून वसूल करावयाच्या वार्षिक स्थिर आकारांशिवाय, लाभधारकांकडून, निर्मिती केंद्राच्या क्षमतेमधील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात लिजचे भाडे व जल स्वामित्वधन देखील मासिक तत्त्वावर, देय राहतील.

४९.३ जल-विद्युत निर्मिती केंद्राला एका कॅलेंडर महिन्यात देय असलेला क्षमता आकार (प्रोत्साहन अधिदानासह) खालीलप्रमाणे असेल :—

AFC x 0.5 x NDM / NDY x (PAFM / NAPAF) (in Rupees)

जेथे

AFC = संबंधित वर्षाकरिता विनिर्दिष्ट करण्यात आलेला वार्षिक स्थिर खर्च, रुपयांमध्ये

NAPAF = प्रमाणकानुसार वार्षिक संयंत्र उपलब्धता घटक, टक्केवारीमध्ये

NDM = महिन्यातील दिवसांची संख्या

NDY = वर्षातील दिवसांची संख्या

PAFM = संबंधित महिन्यात साध्य केलेला संयंत्र उपलब्धता घटक, टक्केवारीमध्ये

४९.४ PAFM ची परिगणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात येईल :—

$$PAFM = 100 \times \sum_{i=1}^{N} DC_i / \{ N \times IC \times (1 - AUX) \} \%$$

जेथे,

AUX = प्रमाणकानुसार सहाय्यकारी ऊर्जा वापर, टक्केवारीमध्ये

DC = महिन्यातील $i^{th}$ दिवसाकरिता केंद्र कमीतकमी तीन तासांसाठी पुरवू शकेल अशी (एक्स-बस मेगावॅट मधील) घोषित क्षमता, जी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने तो दिवस संपल्यानंतर प्रमाणित केली असेल.

IC = संपूर्ण निर्मिती केंद्राची (मेगावॅट मधील) स्थापित क्षमता.

N = महिन्यातील दिवसांची संख्या.

४९.५ प्रत्येक लाभधारकाकडून, परिगणना करण्यात आलेल्या ऊर्जा आकाराच्या दराने, एका कॅलेंडर महिन्यात लाभधारकाला एक्स-बस तत्त्वावर पुरवठा करण्यात आलेल्या एकूण ऊर्जेसाठी, ऊर्जा आकार देय असतील. एका महिन्यासाठी निर्मिती कंपनीला देय असणारे एकूण ऊर्जा आकार खालीलप्रमाणे असतील :—

(Energy Charge Rate in Rs. / kWh) X {Energy (ex-bus)} for the month in kWh.

४९.६ जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता, एक्स-बस तत्त्वावर ऊर्जा आकारांचा दर (इसीआर) प्रति युनिट रुपयांमध्ये तीन दशांश स्थळांपर्यंत खालील सूत्रानुसार निश्चित करण्यात येईल :—

$$ECR = AFC \times 0.5 / \{ DE \times (1 - AUX) \}$$

जेथे,

DE = जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता युनिटमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली वार्षिक डिझाईन ऊर्जा, जी खालील विनियम ४९.७ च्या अधीन राहून असेल.

४९.७ जल-विद्युत निर्मिती केंद्राकडून एका वर्षात प्रत्यक्ष निर्माण झालेली एकूण ऊर्जा, जर निर्मिती कंपनीच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे, डिझाईन ऊर्जेपेक्षा कमी असेल तर, निर्मिती कंपनीकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर आवर्ती (रोलिंग) तत्त्वावर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :—

(एक) निर्मिती केंद्र वाणिज्यिक तत्त्वावर सुरू झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांच्या आत वीज निर्मितीमध्ये तूट आली तर, ज्या वर्षी वीज निर्मितीत तूट आली असेल त्या वर्षाच्या पुढील वर्षाच्या ऊर्जा आकारांच्या दराची (इसीआर) परिगणना विनियम ४९.६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सूत्राच्या आधारे करण्यात येईल. असे करताना फेरबदल करून त्या वर्षाची डिझाइन ऊर्जा ही तूट आलेल्या वर्षातील प्रत्यक्ष ऊर्जा निर्मिती इतकी, मागील वर्षातील ऊर्जा आकारातील तूट भरुन निघेपर्यंत, विचारात घेण्यात येईल, आणि त्यानंतर नेहमीचा ऊर्जा आकारांचा दर (इसीआर) लागू राहील :

परंतु असे की, जल-विद्युत निर्मिती केंद्राची प्रत्यक्ष वीज निर्मिती डिझाईन ऊर्जेपेक्षा जलविज्ञान घटकामुळे (हायड्रॉलॉजी फॅक्टर) ४ वर्षे सातत्याने कमी होत राहिली असेल तर, निर्मिती कंपनी संबंधित जलविज्ञान माहितीसह केंद्राच्या डिझाईन ऊर्जेत सुधारणा करण्यासाठी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाशी संपर्क साधेल ;

(दोन) निर्मिती केंद्राचे वाणिज्यिकरित्या कामकाज सुरू झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांनंतर वीज निर्मितीमध्ये तूट आली तर, या संबंधात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल ;

**स्पष्टीकरण.—**समजा, केंद्राची विनिर्दिष्ट करण्यात आलेली वार्षिक डिझाईन एनर्जी ही DE MWh, आहे आणि संबंधित पहिल्या आणि त्यानंतरच्या दुसऱ्या वर्षात प्रत्यक्ष निर्माण झालेली ऊर्जा अनुक्रमे A1 and A2 MWh इतकी असून, आणि A1 ही DE पेक्षा कमी आहे, त्यानंतर, तिसऱ्या वर्षाकरिता ऊर्जा आकारांच्या दराची परिगणना करण्यासाठी, या विनियमांच्या विनियम ४९.६ मधील सूत्रात विचारात घ्यावयाची डिझाईन एनर्जी ही (A1 + A2 – DE) MWh इतकी, कमाल DE MWh आणि किमान A1 MWh. च्या अधीन राहून, संयमित करण्यात येईल ;

(तीन) केंद्रातून बाहेर पाठविण्यात आलेल्या मीटरवर नोंदलेल्या नक्त ऊर्जेला 1 / (1 – AUX) ने गुणून, प्रत्यक्ष निर्माण झालेली ऊर्जा (e.g., A1, A2) काढण्यात येईल.

४९.८ वरील विनियम ४९.६ मध्ये परिगणना केलेला, जल-विद्युत निर्मिती केंद्रांचा ऊर्जा आकाराचा दर (इसीआर), प्रति युनिट नव्वद पैशांपेक्षा जास्त असेल, आणि एका वर्षातील प्रत्यक्ष विक्री-योग्य ऊर्जा { DE × ( 1 – AUX ) } kWh, पेक्षा जास्त असेल तर, वरील पेक्षा जास्त असलेल्या ऊर्जेसाठी देयकात फक्त प्रति युनिट नव्वद पैसे ऊर्जा आकार लावण्यात येईल :

परंतु असे की, निर्मिती कंपनीच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे ज्या वर्षात एकूण ऊर्जेची निर्मिती ही डिझाईन ऊर्जेपेक्षा कमी झाली असेल त्याच्या पुढील वर्षात, मागील वर्षाच्या ऊर्जा आकारातील तूट भरून काढल्यानंतर, ऊर्जा आकार दर प्रति युनिट नव्वद (९०) पैसे पर्यंत कमी करण्यात येईल.

४९.९ एमएसएलडीसी लाभधारकांशी विचारविनिमय करून, उपलब्ध म्हणून घोषित करावयाच्या सर्व ऊर्जेच्या इष्टतम वापरासाठी, जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या वेळापत्रकास अंतिम स्वरूप देईल, ज्याची आखणी सर्व लाभधारकांना करण्यात आलेल्या विद्युत केंद्रातील त्यांच्या संबंधित वाटपांच्या प्रमाणात करण्यात येईल.

### ५०. पम्प्ड स्टोअरेज जल-विद्युत निर्मिती केंद्रे—

५०.१ विद्यमान पम्प्ड स्टोअरेज जल-विद्युत केंद्रासाठी देयके तयार करण्याची पद्धती आयोगाने यापूर्वी मान्यता दिलेल्या वीज खरेदी करारानुसार असेल आणि ती या विनियमांनुसार नसेल.

५०.२ १ एप्रिल, २०१६ नंतर वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू करणाऱ्या पम्प्ड स्टोअरेज जल-विद्युत केंद्राच्या स्थिर खर्चाची परिगणना वार्षिक तत्त्वावर या विनियमांतर्गत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निकषांच्या आधारे करण्यात येईल, आणि त्याची क्षमता आकार म्हणून मासिक तत्त्वावर वसुली करण्यात येईल.

५०.३ निर्मिती केंद्राच्या विक्रीयोग्य क्षमतेमधील त्यांच्या संबंधित वाटणीच्या प्रमाणात लाभधारकांकडून क्षमता आकार देय राहतील :

परंतु असे की, निर्मिती केंद्राच्या पहिल्या संचाचा वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याचा दिनांक आणि निर्मिती केंद्राचा वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याचा दिनांक या कालावधी दरम्यानच्या देय क्षमता आकारांच्या निश्चितीकरणाच्या प्रयोजनासाठी, निर्मिती केंद्र पूर्ण करण्यासाठी झालेल्या खर्चाच्या अगदी अलीकडील अंदाजाच्या आधारे वार्षिक स्थिर खर्च काढण्यात येईल.

५०.४ पम्प्ड स्टोअरेज जल-विद्युत निर्मिती केंद्राला एका कॅलेण्डर महिन्यासाठी देय असलेले क्षमता आकार पुढीलप्रमाणे असतील :-

(AFC × NDM / NDY) (रुपयामध्ये), जर एका महिन्यामधील प्रत्यक्ष वीज निर्मिती ही निर्मिती केंद्राने त्या महिन्यामध्ये वापरलेल्या पम्पिंग ऊर्जेपेक्षा जास्त किंवा ७५ टक्क्यांइतकी असेल, आणि

{(AFC × NDM / NDY) × (त्या महिन्यामध्ये सर्वोच्च मागणी तासां दरम्यानची प्रत्यक्ष निर्मिती / त्या महिन्या दरम्यान निर्मिती केंद्राने वापरलेल्या पम्पिंग ऊर्जेच्या ७५ टक्के) (रुपयांमध्ये)}, जर एका महिन्यामधील प्रत्यक्ष वीज निर्मिती ही निर्मिती केंद्राने त्या महिन्यामध्ये वापरलेल्या पम्पिंग ऊर्जेच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी असेल.

जेथे,

AFC = त्या वर्षासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेला वार्षिक स्थिर खर्च, रुपयामध्ये ;

NDM = त्या महिन्यांमधील दिवसांची संख्या ;

NDY = त्या वर्षामधील दिवसांची संख्या :

परंतु असे की, त्या वर्षादरम्यानची प्रत्यक्ष निर्मिती आणि केंद्राने वापरलेली प्रत्यक्ष पम्पिंग ऊर्जा यांच्या आधारे वर्षाच्या अखेरीस समायोजन करण्यात येईल.

५०.५ लाभधारकाने डिझाइन ऊर्जेपेक्षा जास्त पुरवठा करावयाच्या एकूण नियोजित ऊर्जेशिवाय खालच्या पातळीवरील जलाशयातून उंच पातळीवरील जलाशयामध्ये पम्पाने पाणी खेचण्यासाठी वापरलेल्या ऊर्जेच्या ७५ टक्के ऊर्जा यासाठी, प्रत्येक लाभधारकाला एक्स-बस तत्त्वावर प्रति युनिट २० पैसे दराने, या सरासरी ऊर्जा आकारा इतक्या एकाच दराने (फ्लॅट दराने), ऊर्जा आकार अदा करावे लागतील.

५०.६ निर्मिती कंपनीला एका महिन्यासाठी अदा करावयाचे ऊर्जा आकार खालीलप्रमाणे असतील :—

= 0.20 × {Energy generated (ex-bus) for the month in kWh – (Design Energy for the month ($DE_m$) + 75% of the energy utilized in pumping the water from the lower elevation reservoir to the higher elevation reservoir for the month)},

जेथे,

$DE_m$ = जल-विद्युत निर्मिती केंद्राकरिता त्या महिन्यासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेली युनिटमधील डिझाईन ऊर्जा :

परंतु असे की, एका महिन्यामध्ये निर्मिती केलेली ऊर्जा, त्या महिन्यातील डिझाईन ऊर्जेशिवाय खालच्या पातळीवरील जलाशयातून उंच पातळीवरील जलाशयामध्ये पाणी खेचण्यासाठी त्या महिन्यात वापरलेल्या ऊर्जेच्या ७५ टक्के ऊर्जेपेक्षा कमी निर्माण झाल्यास, लाभधारकाने द्यावे लागणारे ऊर्जा आकार शून्य असतील.

५०.७ निर्मिती कंपनी, वरच्या पातळीवरील जलाशयामध्ये सोडलेले नैसर्गिक पाणी आणि उंच पातळीवरील जलाशयाची पाण्याची पातळी आणि खालच्या पातळीवरील जलाशयाची पाण्याची पातळी यांची, तासागणिक तत्त्वावर दैनंदिन नोंद ठेवील.

५०.८ वीज निर्मात्याने पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहासह उपलब्ध असलेल्या पाण्याने सर्वोच मागणी तासात जास्तीतजास्त पुरवठा करण्याची आवश्यकता राहील :

परंतु असे की, निर्मिती कंपनी, कोणत्याही वैध कारणाशिवाय हेतू-पुरस्सर किंवा अन्यथा, सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीदरम्यान खालच्या पातळीवरील जलाशयातील पाणी वरच्या पातळीवरील जलाशयामध्ये पम्पाने खेचत नसल्याचे किंवा त्याच्या क्षमतेइतकी वीज निर्मिती करीत नसल्याचे किंवा पाण्याचा नैसर्गिक प्रवाह वाया घालवत असल्याचे सिद्ध झाले तर, त्या दिवसाचा क्षमता आकार लाभधारकाने देय राहणार नाही :

परंतु आणखी असे की या प्रयोजनासाठी, नियोजित आणि सक्तीच्या दुरुस्तीसाठी/देखभालीसाठी संच/केंद्र एका वर्षात १५ टक्क्यांपर्यंत बंद ठेवण्याचा कालावधी (outages) हा, सर्वोच्च मागणी नसलेल्या कालावधीदरम्यान खालच्या पातळीवरील जलाशयातून वरच्या पातळीवरील जलाशयामध्ये पम्पाने पाणी न खेचण्यासाठीचे किंवा पम्पाने खेचलेल्या पाण्याची किंवा पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाची ऊर्जा वापरून, वीज निर्मिती न करण्यासाठीचे वैध कारण असल्याचे समजण्यात येईल :

परंतु असेही की, एका वर्षात एकूण यांत्रिक बंद (आउटेज) १५ टक्क्यांपेक्षा जास्त झाल्यास खालील पद्धतीने वर्षभरात वसूल केलेले एकूण क्षमता आकार यथाप्रमाण तत्त्वावर समायोजित करण्यात येतील :—

$$(ACC)_{adj} = (ACC)_{R} \times (1- ATO)/85$$

जेथे,

$(ACC)_{adj}$ = समायोजित केलेले वार्षिक क्षमता आकार ;

$(ACC)_{R}$ = वसूल केलेले वार्षिक क्षमता आकार ;

ATO = सक्तीच्या आणि नियोजित आऊटेजसह त्या वर्षातील एकूण आऊटेजीज टक्केवारीमध्ये :

परंतु असे की, निर्मिती कंपनीने, राज्य ग्रिड संहिते अंतर्गत ठरवून दिलेल्या काल व परिमाण मापन (शेडयुलिंग) पद्धतीच्या धर्तीवर दिवसाच्या सर्व कालगटांसाठी डे-अहेड तत्त्वावर त्यांच्या यंत्राची उपलब्धता दररोज घोषित करण्याची आवश्यक राहील.

**५१. घोषित क्षमता सिद्ध करून दाखविणे—**

५१.१ एमएसएलडीसी जेव्हा विचारणा करील तेव्हा विद्युत निर्मिती कंपनीला त्यांच्या निर्मिती केंद्राची घोषित क्षमता सिद्ध करून दाखवावी लागेल.

५१.२ जर निर्मिती कंपनी घोषित क्षमता सिद्ध करू शकली नाही, तर निर्मिती कंपनीला देय असलेले वार्षिक स्थिर आकार, दंड म्हणून कमी करण्यात येतील.

५१.३ दिवसाच्या कोणत्याही कालावधी/गटाकरिता पहिल्या चुकीच्या घोषणेकरिता दंडाची रक्कम दोन दिवसाच्या स्थिर आकारांइतकी राहील.

५१.४ दुसऱ्या चुकीच्या घोषणेसाठी दंड चार दिवसांच्या स्थिर आकारांइतका तर वर्षातील पुढील चुकीच्या घोषणांसाठी दंड हा भौमितिक श्रेणीत वाढत राहील.

५१.५ विद्युत निर्मिती केंद्रांच्या कामाची नोंदवही (लॉगबुक) एमएसएलडीसीला छाननीसाठी उपलब्ध राहील आणि या नोंदवहीमध्ये यंत्राच्या कार्यान्वयनाची व देखभालीची नोंद ठेवण्यात येईल.

**५२. देयक तयार करणे आणि आकारांचा भरणा—**

औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता वार्षिक स्थिर आकार, ऊर्जा आकार, इंधन अधिभार समायोजन आणि प्रोत्साहन-अधिदान यांची देयके आणि जल-विद्युत निर्मिती केंद्रांकरिता क्षमता आकार आणि ऊर्जा आकार यांची देयके व त्यांचा भरणा मासिक तत्त्वावर करण्यात येईल.

## भाग-जी : पारेषण

**५३. व्याप्ती—**

५३.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याबरोबर करण्यात आलेल्या ठोक वीज पारेषण करार किंवा अन्य व्यवस्थेच्या अनुषंगाने, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेशाकरिता आणि वापराकरिता दर निश्चित करण्यासाठी या भागात समाविष्ट असलेले विनियम लागू राहतील :

परंतु आणखी असे की, नवीन पारेषण परवानाधारकाने जर नियंत्रण कालावधी दरम्यान विद्यमान यंत्रणेमध्ये नवीन पारेषण यंत्रणेची भर घातली तर, आयोग, नियंत्रण कालावधीतील उर्वरित वर्षांकरिता दरांची फेर-निश्चिती, अशा पारेषण परवानाधारकाने नियंत्रण कालावधीतील उर्वरित वर्षांसाठी एकूण महसुली गरज निश्चित करण्यासाठी दाखल केलेली याचिका विचारात घेऊन, करील.

५३.२ अधिनियमांच्या कलम ३६(१) च्या परंतुकांतर्गत, मधली (इंटरव्हिनिंग) पारेषण सुविधा वापरण्यासाठी पारेषण परवानाधारकाने दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने, दर, आकार, अटी आणि शर्ती विनिर्दिष्ट करताना या भागात अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीचे आयोग मार्गदर्शन घेईल.

**५४. वीज दराचे भाग—**

५४.१ पारेषण परवानाधारकांच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेशासाठी व यंत्रणेचा वापर करण्यासाठीच्या पारेषण आकारांमध्ये खालीलपैकी कोणत्याही भागांचा किंवा त्यांच्या संयोगाचा (कॉम्बिनेशन) समावेश असेल :—

(ए) पारेषण यंत्रणा प्रवेश आकार ;

(बी) वार्षिक पारेषण आकार ;

(सी) पारेषण केलेल्या ऊर्जेसाठी प्रति युनिट आकार ;

(डी) रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार.

५४.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज करण्याकरिता पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीस पारेषण मुक्त प्रवेशांचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांनुसार असा प्रवेश मिळविण्याचा हक्क राहील आणि या विनियमांत असा प्रवेश मिळविण्यासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आकारांचा भरणा करण्यास तो जबाबदार राहील.

**स्पष्टीकरण.**——या विनियमांच्या प्रयोजनार्थ, ज्या व्यक्तीने पारेषण मुक्त प्रवेशासाठी पात्र असल्यामुळे पारेषण क्षमता हक्कांचे वाटप करण्यासाठी अर्ज केला आहे आणि असा प्रवेश मिळविण्यासाठी कामे करण्याचे मान्य केले आहे, अशा व्यक्तीस येथून पुढे "इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता" म्हणून संबोधण्यात येईल, आणि त्यामध्ये, ज्याने वाटप करण्यात आलेल्या पारेषण क्षमता हक्कांमध्ये वाढ करण्यासाठी अर्ज केला आहे अशा विद्यमान पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांचाही, समावेश असू शकेल.

५४.३ जेव्हा इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील प्रवेशासाठी समर्पित असलेल्या पारेषण वाहिन्या किंवा इतर पारेषण मालमत्ता उभारण्याचे काम करावे लागत असेल तर, पारेषण परवानाधारकास, अशा इच्छुक पारेषण यंत्रणा उपायोगकर्त्यास प्रवेश देण्यासाठी केलेल्या सर्व कामांवर झालेला वाजवी खर्च, पारेषण यंत्रणा प्रवेश आकारातून वसूल करण्याचा हक्क राहील.

५४.४ जेव्हा इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या प्रवेशामुळे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी संबंधित परंतु विनियम ५४.३ खाली न येणारी अशी अन्य कामे करणे आवश्यक असेल तेव्हा पारेषण परवानाधारक अशा कामांवर झालेला खर्च, विनियम ५४.१० नुसार, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षात वार्षिक पारेषण आकारांतून वसूल करील.

५४.५ जर प्रवेश मिळविण्यासाठीची कोणतीही कामे इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने केली असतील तर, पारेषण परवानाधारकास अशी कामे करून घेण्यासाठी लावलेल्या कामगारांवरील खर्चाच्या १५% दराने पर्यवेक्षण आकार वसूल करण्याचा हक्क राहील आणि अशा कामासंबंधात पारेषण परवानाधारकाला अन्य कोणताही खर्च वसूल करण्याचा हक्क असणार नाही :

परंतु असे की, असे पर्यवेक्षण आकार संबंधित पारेषण परवानाधारकाच्या वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नाचा एक भाग राहतील आणि ते इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने केलेला संचालन व देखभाल खर्च म्हणून मानण्यात येतील व संबंधित वर्षातील मालमत्तेच्या भांडवलीकरणात त्यांचे भांडवलीकरण करण्यात येईल.

५४.६ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील प्रवेशासाठी केलेल्या कामांची देखभाल, पारेषण परवानाधारक आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांच्यातील ठोक वीज पारेषण कराराच्या कालावधीत, पारेषण परवानाधारकाकडून करण्यात येईल.

५४.७ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील प्रवेशासाठी केलेल्या कामासाठीच्या खर्चाची रक्कम जर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने अदा केली तर ठोक वीज पारेषण कराराच्या समाप्तीनंतर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा त्याने खर्च केलेल्या अशा कामांच्या घसारा वजा मूल्यावर हक्क राहील :

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश मिळावा म्हणून जर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने कामे केली असतील तर ठोक वीज पारेषण कराराच्या समाप्तीनंतर अशी कामे स्वतःकडे ठेवून घेण्याचा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला हक्क राहील.

५४.८ ठोक वीज पारेषण करारांतील अटीनुसार, पारेषण यंत्रणा प्रवेश आकार खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने वसूल करता येऊ शकेल :—

(ए) प्रवेश मिळविण्याच्या वेळी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने एकाच वेळी रक्कम अदा करून ; किंवा

(बी) ठोक वीज पारेषण कराराच्या कालावधीत अनेक हप्त्यात रक्कम अदा करून ; किंवा

(सी) वरील (ए) आणि (बी) च्या कोणत्याही संयोगाने (कॉम्बिनेशन).

५४.९ पारेषण परवानाधारक आणि इच्छुक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांच्यात इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास प्रवेश देण्यासाठी करावयाच्या कामांसंबंधी किंवा पारेषण यंत्रणा प्रवेश आकाराबाबत जर कोणताही वाद निर्माण झाला तर तो आयोगाकडे किंवा ठरवून देण्यात येईल अशा अन्य मंचाकडे अभिनिर्णयासाठी सादर करण्यात येईल.

५४.१० नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या वार्षिक पारेषण आकारातून नियंत्रण कालावधीतील संबंधित वर्षाकरीता आयोगाने मान्यता दिल्यानुसार पारेषण परवानाधारकाच्या एकूण महसुली गरजेची रक्कम वसूल करण्याची तरतूद असेल आणि त्यामध्ये खालील घटकांचा समावेश असेल :—

(ए) संचालन व देखभाल खर्च ;

(बी) घसारा ;

(सी) कर्ज भांडवलावरील व्याज ;

(डी) खेळत्या भांडवलावरील व्याज आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या अनामत रकमेवरील व्याज ;

(इ) आकस्मिक निधीकरिता वर्गणी ;

(एफ) भागभांडवलावरील परतावा ;

(जी) आयकर

**वजा :**

(एच) मुक्त प्रवेश आकारापासून उत्पन्न ;

(आय) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न ;

(जे) या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न :

परंतु असे की, या विनियमांच्या **भाग डी** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींनुसार, पारेषण परवानाधारकासाठी घसारा, कर्ज भांडवलावरील व्याज, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या खेळत्या भांडवलावरील आणि अनामत रकमेवरील व्याज, आकस्मिक निधीकरिता वर्गणी, भागभांडवलावरील परतावा, आणि आयकर या बाबींना परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण कंपनी) च्या मालकीच्या आणि अन्य राज्यांमध्ये वीज नेणाऱ्या पारेषण वाहिन्यांच्या संबंधात एकूण महसुली गरजेचे घटक, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाचे विनियम आणि आदेशांनुसार पॉईन्ट ऑफ कनेक्शन (PoC) पारेषण आकाराच्या माध्यमातून वसूल करण्यात येत असल्यास, ते या विनियमांतर्गत निश्चित करण्यात आलेल्या वार्षिक पारेषण आकारांमधून वसूल करण्यात येणार नाहीत :

परंतु असेही की, जर अशा कोणत्याही घटकांची वसुली राज्यांतर्गत पारेषण दराच्या माध्यमातून यापूर्वीच करण्यात आली असेल तर, भविष्यातील वर्षासाठी महापारेषण कंपनीच्या एकूण महसुली गरजेमधून अशी जादा वसुली, संलग्न व्याजासह, लागू असेल त्याप्रमाणे, वजा करण्यात येईल :

परंतु असेही की, लेखापरीक्षित लेख्यांच्या आधारे अचूक समायोजनाच्या वेळी आयोगाकडून, प्रकरण-निहाय तत्त्वावर, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मागील कालावधीतील उत्पन्न/खर्चाला परवानगी देण्यात येईल :

परंतु असेही की, परवानाधारकाकडून कोणत्याही पक्षकाराला, आयोग किंवा न्यायालयाच्या आदेशाच्या परिणामस्वरूप, कोणत्याही कृतीच्या मानकांची पूर्तता न करण्यासाठी किंवा नुकसानीसाठी देय असलेले सर्व दंड आणि नुकसानभरपाई यांची वसुली एकूण महसुली गरजेतून करण्यास परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु असेही की, पारेषण परवानाधारक, अशा अदा करण्यात आलेल्या किंवा देय असलेल्या दंड आणि नुकसानभरपाईचा, असल्यास, वेगळा तपशील ठेवेल आणि तो त्याच्या याचिकेसह आयोगाला सादर करील.

५४.११ या विनियमांच्या **भाग-बी** नुसार पारेषण परवानाधारकाने एकूण महसुली गरज निश्चित करण्यासाठी केलेली याचिका किंवा स्पर्धात्मक पद्धतीने मंजूर करण्यात आलेल्या पारेषण यंत्रणा प्रकल्पांच्या बाबतीत, वार्षिक पारेषण आकार स्वीकारण्यासाठी केलेली याचिका, जसे असेल तसे, यांच्या आधारे आयोगाकडून पारेषण परवानाधारकाचे वार्षिक पारेषण आकार निश्चित करण्यात येतील.

**५५. तात्पुरत्या दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका—**

५५.१ नवीन पारेषण परवानाधारक, त्याच्या पारेषण मालमत्तांचे वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू करण्याच्या अंदाजित दिनांकाच्या सहा महिने अगोदर तात्पुरत्या दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करील.

५५.२ नवीन पारेषण परवानाधारक, वैधानिक लेखापरीक्षकाकडून यथोचितपणे प्रमाणित करण्यात आलेल्या, केलेला भांडवली खर्च आणि वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू करण्याच्या दिनांकापर्यंत करावयाचा अंदाजित भांडवली खर्च आणि केलेल्या अतिरिक्त भांडवली खर्चावर आधारित, तात्पुरत्या दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करील :

परंतु असे की, याचिकेमध्ये अंदाजित भांडवली खर्च आणि अतिरिक्त भांडवली खर्च, जेथे लागू असेल तेथे, यासाठी मूळ गृहितकाचा तपशील समाविष्ट असेल.

५५.३ आयोगाकडून नवीन पारेषण परवानाधारकाला वाणित्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या अपेक्षित दिनांकापासून अंदाजित भांडवली खर्चाच्या आधारे, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, तात्पुरता दर मंजूर करता येईल.

५५.४ वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या दिनांकास, तात्पुरत्या वीज दराच्या मान्यतेचा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा जास्त विलंब होण्याची शक्यता असेल तर, पारेषण परवानाधारक, प्रकल्पाच्या कामाच्या सद्यस्थितीचा तपशील आणि प्रकल्प पूर्ण होण्यामागील विलंबाच्या कारणाचा तपशील देऊन, तात्पुरता वीज दर लागू राहण्याच्या वैधतेच्या वाढीकरिता याचिका सादर करू शकेल, जी आयोग काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर विचारात घेऊ शकेल.

५५.५ नवीन पारेषण परवानाधारक, वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत, लेखापरीक्षित भांडवली खर्च आणि वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या दिनांका रोजीचे भांडवलीकरण यांच्या आधारे, अंतिम दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करील.

५५.६ लेखापरीक्षित भांडवली खर्च आणि वाणिज्यिक तत्त्वावर कामकाज सुरू होण्याच्या दिनांका रोजीचे भांडवलीकरण यांच्या आवश्यक तपासणीच्या आधारे, आयोगाकडून, नवीन पारेषण परवानाधारकासाठी अंतिम दराचे निश्चितीकरण करण्यात येईल.

५५.७ आयोगाकडून तात्पुरत्या दराच्या निश्चितीकरणासाठी मान्यता देण्यात आलेल्या भांडवली खर्चापेक्षा वार्षिक तत्त्वावर झालेला प्रत्यक्ष भांडवली खर्च जेव्हा, पाच किंवा अधिक टक्क्यांनी कमी झालेला असेल तेव्हा, पारेषण परवानाधारक जास्तीच्या भांडवली खर्चाशी अनुरूप वसूल केलेला जास्तीचा दर लाभधारकाला, संबंधित वर्षाच्या १ एप्रिल रोजी प्रचलित असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने परत करील.

५५.८ आयोगाकडून तात्पुरत्या दराच्या निश्चितीकरणासाठी मान्यता दिलेल्या भांडवली खर्चापेक्षा, जेव्हा वार्षिक तत्त्वावर केलेला प्रत्यक्ष भांडवली खर्च, पाच किंवा अधिक टक्क्यांनी जास्त झालेला असतो, तेव्हा पारेषण परवानाधारक, आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून, भांडवली खर्चातील अशा घटीशी अनुरूप दरातील तूट लाभधारकांकडून, संबंधित वर्षाच्या १ एप्रिल रोजी प्रचलित असलेल्या आधारभूत दरास १५० बेसिस अंशाने वाढवून येणाऱ्या दराने वसूल करील.

**५६. भांडवल गुंतवणूक योजना—**

५६.१ पारेषण परवानाधारक संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय एकूण महसुली गरजेचा एक भाग म्हणून, राज्यांतर्गत यंत्रणेच्या बळकटीसाठी व वाढीसाठी नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी भौतिक लक्ष्ये, वीज भाराच्या वाढीची गरज भागविणे, वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेत सुधारणा, विश्वासार्हता, मिटरींग, अतिभारामध्ये घट इ.करिता नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी सविस्तर भांडवली गुंतवणुकीची योजना, निधी उभारणीची योजना आणि भौतिक लक्ष्यांक आयोगास मान्यतेसाठी सादर करील.

५६.२ भांडवल गुंतवणूक योजना गुंतवणुकीसाठीची कमीत कमी खर्चाची योजना असेल आणि भांडवल गुंतवणुकीच्या योजनेमध्ये रुपये दहा कोटी किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश असेल आणि आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यामध्ये ही योजना तयार करण्यात येईल.

५६.३ भांडवल गुंतवणूक योजनेमध्ये आवश्यक असलेली सर्व माहिती, तपशील आणि दस्तवेजांचा समावेश असेल व ही माहिती, उप-साधनांच्या संचांची (बेज) संख्या, ग्रिडच्या उप-केंद्रांची नावे, अंतर्गत भागांची रचना आणि ठिकाणे, उप-केंद्रांची क्षमता (एमव्हीए), पारेषण वाहिनीची लांबी (सर्किट- किलोमीटर) ज्यावरून प्रस्तावित गुंतवणुकीची गरज स्पष्ट होईल, विचारात घेतलेले पर्याय, खर्च-लाभ विश्लेषण आणि ज्यांचा पारेषण आकारांवर परिणाम होऊ शकेल अशा अन्य बाबी, यांच्यासह असेल परंतु ती फक्त यांच्यापुरतीच मर्यादित असणार नाही.

५६.४ पारेषण परवानाधारकाची भांडवल गुंतवणूक योजना राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी राज्य पारेषण कंपनीने विकसित केलेल्या पारेषण यंत्रणा योजनेशी सुसंगत असेल :

परंतु असे की, निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारक यांच्या विशिष्ट आवश्यकतेच्या आधारावर, पारेषण परवानाधारकाकडून करण्यात आलेल्या कोणत्याही भांडवली खर्चासाठीच्या पुष्ट्यर्थ विनंतीच्या स्वरूपातील आवश्यक कागदोपत्री पुरावा आणि दिलेले उचित हमीपत्र सादर करण्यात येईल.

५६.५ आयोग, प्रस्तावित खर्चाची आवश्यकता आणि पारेषण आकारांवर होऊ शकणारा संभाव्य परिणाम विचारात घेऊन, संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी पारेषण परवानाधारकाकडून बहु-वर्षीय एकूण महसुली गरजेसह सादर करण्यात आलेली भांडवल गुंतवणूक योजना विचारात घेईल.

५६.६ पारेषण परवानाधारक, एकूण महसुली गरज निश्चित करण्यासाठीच्या याचिकेसोबत किंवा कामगिरीच्या मध्यवधी आढाव्यासाठीच्या याचिकेसोबत, जसे असेल तसे, आयोगाला भांडवली खर्चाच्या प्रकल्पांच्या प्रगतीची पडताळणी करण्यासाठी आवश्यक अशी माहिती म्हणजेच भांडवली खर्चाच्या प्रकल्पांची प्रगती व त्यासह अन्य माहिती, तपशील व दस्तऐवज सादर करील.

**५७. कामे करण्याचे निकष—**

५७.१ पारेषण परवानाधारकासाठी उपलब्धता लक्ष्यांक खालीलप्रमाणे :—

(ए) वार्षिक पारेषण आकारांच्या पूर्ण वसुलीसाठी :—

(ए) ए सी यंत्रणा : ९८%

(बी) एच व्ही डी सी बाय-पोल्स लिंक्स आणि एच व्ही डी सी बॅक टू बॅक केंद्रे : ९५%

(बी) प्रोत्साहन-अधिदान विचारात घेण्यासाठी :—

(ए) ए सी यंत्रणा : ९९%

(बी) एच व्ही डी सी बाय-पोल्स लिंक्स आणि एच व्ही डी सी बॅक टू बॅक केंद्रे : ९६%

**टीप १.—**उपलब्धता लक्ष्यांकपेक्षा कमी पातळीवरील उपलब्धतेकरिता वार्षिक पारेषण आकारांची वसुली यथाप्रमाण तत्त्वावर करण्यात येईल आणि उपलब्धता शून्य असताना कोणताही पारेषण आकार देय नसेल.

**टीप २.—**उपलब्धता लक्ष्यांकाची परिगणना या विनियमांच्या सोबत जोडलेल्या **जोडपत्र-२** मधील कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल आणि त्यास एमएसएलडीसीकडून प्रमाणित करण्यात येईल.

५७.२ पारेषण परवानाधारकाने, उपलब्धता लक्ष्यांकापेक्षा जास्त वार्षिक उपलब्धता साध्य केल्यानंतर, त्याला खाली नमूद केलेल्या सूत्रानुसार, प्रोत्साहन-अधिदान मिळण्याचा हक्क राहील :—

प्रोत्साहन-अधिदान = वार्षिक पारेषण आकार × (साध्य केलेली वार्षिक उपलब्धता - उपलब्धता लक्ष्यांक) / उपलब्धता लक्ष्यांक ;

जेथे,

राज्यातील विशिष्ट पारेषण परवानाधारकाकरिता वार्षिक पारेषण आकार, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या एकूण महसुली गरजेशी अनुरूप असतील :

परंतु असे की, ए सी यंत्रणेकरिता ९९.७५% पेक्षा आणि एच व्ही डी सी यंत्रणेकरिता ९८.५% पेक्षा जास्त असलेल्या उपलब्धतेसाठी कोणतेही प्रोत्साहन-अधिदान देय नसेल :

परंतु आणखी असे की, ए सी यंत्रणेकरिता, प्रती वर्षी प्रत्येक भागाकरिता दोनदा पुरवठा बंद पडण्याला परवानगी देण्यात येईल, आणि एका वर्षातील दोन वेळाच्या बंदनंतर, अशा प्रत्येक बंदसाठी त्या विशिष्ट भागाकरिता प्रत्यक्ष आउटेजशिवाय १२ तासांचे अतिरिक्त आउटेज विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, जर पारेषण बाबींच्या आउटेजमुळे निर्मिती केंद्रातून विजेचे निष्कासन करण्यावर विपरित परिणाम होत असेल तर आउटेज तासांना २ या गुणकाने गुणण्यात येईल :

परंतु असेही की, द्यावयाच्या/न द्यावयाच्या प्रोत्साहन-अधिदानांची परिगणना कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस हाती घेण्यात येईल.

**५८. संचालन व देखभाल खर्च—**

५८.१ विद्यमान आणि नवीन पारेषण परवानाधारकांकरिता संचालन व देखभाल खर्चाचे निकष पारेषण परवानाधारकाच्या पारेषण वाहिन्यांची सर्कीट किलोमीटर मधील लांबी, आणि बेजची संख्या यांच्या आधारे खाली दाखविल्याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत :—

**स्पष्टीकरण.—**या विनियमांतर्गत प्रमाणकानुसार संचालन व देखभाल खर्च लागू करण्याच्या प्रयोजनासाठी, 'बे' याचा अर्थ उपसाधनांचा संच जो पारेषण परवानाधारकाच्या उप-केंद्रातील बसच्या ठिकाणापासून निघणाऱ्या पारेषण वाहिन्या, बस सेक्शन ब्रेकर्स, पोटेन्शिअल ट्रान्सफार्मर्स, पॉवर ट्रान्सफॉर्मर्स्, कॅपॅसिटर्स आणि ट्रान्सफर ब्रेकर आणि फीडर्स यासारख्या विद्युत उपकरणांना जोडण्यासाठी आवश्यक असेल. तसेच येथे संबोधित करण्यात आलेल्या बे मध्ये फक्त पारेषण उप-केंद्रात असलेल्या बे चा समावेश असेल आणि त्यातून निर्मिती केंद्रातील स्विचयार्ड मधील कोणतेही बेज, ज्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सर्वसाधारणपणे निर्मिती कंपनीची असते, वगळण्यात येतील :

परंतु असे की, कोणत्याही वर्षाच्या अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्चाची परिगणना करण्यासाठी, त्या वर्षात पारेषण परवानाधारकाच्या उप-केंद्रात भर घालण्यात आलेल्या पारेषण वाहिन्यांच्या सर्कीट किलोमीटरच्या आणि बेजच्या संख्येच्या ५० टक्के, यांचा देखील विचार करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, मध्यावधी आढाव्यासह अचूक समायोजनाच्या वेळी किंवा नियंत्रण कालावधीच्या अखेरीस, कोणत्याही वर्षासाठी अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संचालन व देखभाल खर्चाच्या निकषांवर आणि याचिकाकर्त्याने भांडवलीकृत केलेल्या मालमत्तेच्या कागदोपत्री पुराव्यांवर आधारित, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, असतील.

५८.२ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.(महापारेषण)साठी संचालन आणि देखभाल खर्चाचे निकष खालीलप्रमाणे असतील :—

| **व्होल्टेज पातळी** | **आर्थिक वर्ष २०१६-१७** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** |
|---|---|---|---|---|
| एचडीव्हीसी (रु. लाख ) | १७७४ | १९२२ | २०८२ | २२५६ |
| **रु. लाख/सर्कीट किमी** | | | | |
| ७६५ केव्ही | ०.९७ | १.०२ | १.०७ | १.१३ |
| ४०० केव्ही | ०.६९ | ०.७३ | ०.७६ | ०.८० |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | ०.२८ | ०.२९ | ०.३० | ०.३२ |
| ६६ केव्ही आणि कमी | ०.१७ | ०.१७ | ०.१९ | ०.१९ |
| **रु लाख/ बे** | | | | |
| ७६५ केव्ही | १७१.४७ | १८०.०४ | १८९.०४ | १९८.५० |
| ४०० केव्ही | १२२.४९ | १२८.६१ | १३५.०४ | १४१.८० |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | १७.७५ | १८.६४ | १९.५७ | २०.५५ |
| ६६ केव्ही आणि कमी | ३.७१ | ३.८९ | ४.०९ | ४.२९ |

५८.३ **टाटा पॉवर कंपनी लि.- पारेषण (टीपीसी-टी) साठी संचालन आणि देखभाल खर्चाचे निकष खालीलप्रमाणे असतील :—**

| **व्होल्टेज पातळी** | **आर्थिक वर्ष २०१६-१७** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** |
|---|---|---|---|---|
| **रु. लाख/सर्कीट किमी** | | | | |
| >६६ केव्ही आणि<४०० केव्ही | १.१९ | १.२५ | १.३२ | १.३८ |
| **रु लाख/ बे** | | | | |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | ३१.१२ | ३२.६८ | ३४.३१ | ३६.०३ |
| ६६ केव्ही आणि कमी | ६.५१ | ६.८३ | ७.१८ | ७.५३ |

५८.४ **रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- पारेषण (आरइन्फ्रा-टी) साठी संचालन आणि देखभाल खर्चाचे निकष खालीलप्रमाणे असतील :—**

| **व्होल्टेज पातळी** | **आर्थिक वर्ष २०१६-१७** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** |
|---|---|---|---|---|
| **रु. लाख/सर्कीट किमी** | | | | |
| >६६ केव्ही आणि<४०० केव्ही | ०.५९ | ०.६२ | ०.६५ | ०.६८ |
| **रु लाख/ बे** | | | | |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | २७.७० | २९.०९ | ३०.५४ | ३२.०७ |
| ६६ केव्ही आणि कमी | ५.७९ | ६.०८ | ६.३८ | ६.७० |

५८.५ **जयगड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड.- (जेपीटीएल) साठी संचालन आणि देखभाल खर्चाचे निकष खालीलप्रमाणे असतील :—**

| **व्होल्टेज पातळी** | **आर्थिक वर्ष २०१६-१७** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** |
|---|---|---|---|---|
| **रु. लाख/सर्कीट किमी** | | | | |
| 400 केव्ही | ०.४२ | ०.४४ | ०.४६ | ०.४८ |
| **रु लाख/ बे** | | | | |
| 400 केव्ही | ७४.१३ | ७७.८४ | ८१.७३ | ८५.८२ |

५८.६ उच्च व्होल्टेज पातळी आणि एचव्हीडीसीकरिता वर्ष-निहाय संचालन व देखभालीचे जे निकष विनियम ५८.७ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आणि जे अन्य विद्यमान पारेषण परवानाधारकांकरिता विनिर्दिष्ट करण्यात आलेले नाहीत, ते निकष अशा अन्य विद्यमान पारेषण परवानाधारकांनी नियंत्रण कालावधीदरम्यानच्या संबंधित वर्षात भर घातलेल्या पारेषण मालमत्तांसाठी लागू राहतील.

५८.७ नवीन पारेषण परवानाधारकांसाठी संचालन व देखभालीचे वर्ष-निहाय निकष खालीलप्रमाणे असतील :—

| **व्होल्टेज पातळी** | **आर्थिक वर्ष २०१६-१७** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** |
|---|---|---|---|---|
| एचडीव्हीसी (रु. लाख ) | १७७४ | १९२२ | २०८२ | २२५६ |
| **रु. लाख/सर्कीट किमी** | | | | |
| ७६५ केव्ही | ०.९७ | १.०२ | १.०७ | १.१३ |
| ४०० केव्ही | ०.४२ | ०.४४ | ०.४६ | ०.४८ |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | ०.२८ | ०.२९ | ०.३० | ०.३२ |
| ६६ केव्ही आणि कमी | ०.१७ | ०.१७ | ०.१९ | ०.१९ |
| **रु लाख/ बे** | | | | |
| ७६५ केव्ही | १७१.४७ | १८०.०४ | १८९.०४ | १९८.५० |
| ४०० केव्ही | ७४.१३ | ७७.८४ | ८१.७३ | ८५.८२ |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | १७.७५ | १८.६४ | १९.५७ | २०.५५ |
| ६६ केव्ही आणि कमी | ३.७१ | ३.८९ | ४.०९ | ४.२९ |

**स्पष्टीकरण.——**“नवीन पारेषण परवानाधारक” म्हणजे पारेषण परवानाधारक ज्याला या विनियमांच्या प्रभावी दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर आयोगाने पारेषण परवाना मंजूर केला आहे आणि ज्यासाठी विनियम ५८.२ ते ५८.५ मध्ये संचालन व देखभाल निकष विनिर्दिष्ट करण्यात आलेले नाहीत.

५८.८ ज्या पारेषण परवानाधारकांचे बेज अन्य पारेषण परवानाधारकाच्या जागेत स्थापन करण्यात आले असतील व देखभाल करण्यात येत असतील, अशा मत्तांवरील संचालन व देखभाल खर्च जो पारेषण परवानाधारक अशा मत्तांचे संचालन व देखभाल करीत असेल त्याला लागू असलेल्या निकषांनुसार, अनुज्ञेय राहतील :

परंतु असे की, पारेषण परवानाधारक अशा मंजूर करण्यात आलेल्या संचालन व देखभाल खर्चाची विभागणी करण्यासाठी परस्परांत सहमत होतील :

परंतु आणखी असे की, पारेषण परवानाधारक नियंत्रण कालावधीमध्ये भर घालण्यात आलेल्या अशा मत्ता त्यांच्या भांडवल गुंतवणूक योजनेमध्ये वेगळ्या दाखवतील.

**५९. वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न——**

५९.१ पारेषण व्यवसायाच्या संबंधात आयोगाने मान्यता दिलेली वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाची रक्कम, पारेषण परवानाधारकाचे वार्षिक पारेषण आकार निश्चित करताना एकूण महसुली गरजेतून कमी करण्यात येईल :

परंतु असे की, पारेषण परवानाधारक, वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या त्याच्या अंदाजांचा पूर्ण तपशील आयोगाकडून ठरवून देण्यात येईल त्या नमुन्यामध्ये आयोगाला सादर करील.

५९.२ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नामध्ये खालील बाबींचा समावेश असेल :—

(ए) जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न ;

(बी) भंगार विक्रीपासून मिळणारे उत्पन्न ;

(सी) गुंतवणुकांपासून मिळणारे उत्पन्न ;

(डी) पुरवठादार/ठेकेदारांना दिलेल्या अग्रिमावरील व्याज ;

(इ) कर्मचारी निवासस्थानांच्या भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(एफ) ठेकेदारांकडून भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(जी) ठेकेदार आणि अन्य व्यक्ती/संस्थांकडून त्यांना भाडे तत्त्वावर दिलेल्या वस्तुंपासून मिळणारे उत्पन्न ;

(एच) भांडवली कामांसाठी पर्यवेक्षण आकार ;

(आय) जाहिराती इ. पासून मिळणारे उत्पन्न ;

(जे) निविदा दस्तावेजांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न ;

(के) वीज दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्न :

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाच्या विनियमित व्यवसायाशी संबंधित भागभांडवलावरील परताव्यामधून केलेल्या गुंतवणुकीपासून मिळालेले व्याज वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नात समाविष्ट करण्यात येणार नाही.

**६०. अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न——**

६०.१ पारेषण परवानाधारक जर त्याच्या मत्तांच्या इष्टतम उपयोगासाठी अधिनियमाच्या कलम ४१ अंतर्गत कोणताही अन्य व्यवसाय करीत असेल तर, अशा अन्य व्यवसायापासून मिळालेल्या महसुलातून, अशा अन्य व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च वजा करून, उरलेल्या रकमेच्या दोन-तृतियांश इतकी रक्कम, पारेषण परवानाधारकाच्या वार्षिक पारेषण आकारांची परिगणना करताना एकूण महसुली गरजेतून कमी करण्यात येईल :

परंतु असे की, पारेषण परवानाधारक पारेषण व्यवसाय आणि अन्य व्यवसाय या दोहोंमध्ये संयुक्त व सामायिक खर्चांचे वाटप वाजवी आधारास अनुसरून करील आणि याबाबतचे वैधानिक लेखापरीक्षकाने यथोचितपणे प्रमाणित केलेले वाटप विवरणपत्र, एकूण महसुली गरजेच्या निश्चितीकरणासाठीच्या याचिकेसोबत, आयोगास सादर करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा अन्य व्यवसायाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चांची एकूण बेरीज ही अशा अन्य व्यवसायापासून मिळणाऱ्या महसुलापेक्षा जास्त असेल तेव्हा, अशा अन्य व्यवसायाच्या कारणास्तव पारेषण परवानाधारकाच्या एकूण महसुली गरजेत कोणत्याही रकमेची भर घालावयास परवानगी देण्यात येणार नाही.

## ६१. राज्यांतर्गत पारेषण दर निश्चितीकरण—

६१.१ राज्यातंर्गत पारेषण यंत्रणेचा खर्च "एकूण पारेषण यंत्रणेचा खर्च (टीटीएससी)" हा सर्व पारेषण परवानाधारकांची वार्षिक एकूण महसुली गरज असेल, जो नियंत्रण कालावधीच्या संबंधित वर्षात पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून (टीएसयु) खालील सूत्रानुसार वसूल करण्यात येईल.

$$TTSC_{(t)} = \sum_{i=1}^{n} ARR_i$$

जेथे,

$TTSC_{(t)}$ = नियंत्रण कालावधीतील $_{(t)}$ वर्षातील संयुक्त एकूण पारेषण यंत्रणेचा खर्च ;

$n$ = पारेषण परवानाधारकांची संख्या ;

$ARR_i$ = नियंत्रण कालावधीतील $_{(t)}$ वार्षिक कालावधीकरिता $i^{th}$ पारेषण परवानाधारकासाठी आयोगाने मान्यता दिलेली वार्षिक महसुली गरज :

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत पारेषणासाठीच्या स्पर्धात्मक बोलीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हाती घेतलेल्या पारेषण यंत्रणा प्रकल्पांच्या बाबतीत, अशा प्रकल्पांनी उद्धृत (क्वोट) केलेली वार्षिक पारेषण सेवा आकारानुसारची एकूण महसुली गरज, एकूण पारेषण यंत्रणा खर्चात (टीटीएससी) समाविष्ट करण्यासाठी विचारात घेण्यात येईल.

६१.२ नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक $_{(t)}$ वर्षातील १२ महिन्यांच्या कालावधीकरीता पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या (टीएसयु) अंदाजित एकाच वेळी असलेली (कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणी (सीपीडी) आणि एकाच वेळी नसलेली (नॉन-कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणी (एनसीपीडी) यांच्या सरासरी इतक्या असलेल्या बेस पारेषण क्षमता हक्कांना आयोग वार्षिक मंजुरी देईल, जे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा "क्षमता वापर" दर्शवतील आणि त्यानुसार वार्षिक "बेस पारेषण दर" खालील सूत्रानुसार निश्चित करील.

Base Transmission Capacity Rights (Base TCR) for the yearly period (t) $= \sum_{u=1}^{n} [(CPD(t) + NCPD(t))/2]$

जेथे,

$CPD_{(t)}$ = प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यासाठी नियंत्रण कालावधीतील $_{(t)}$ वार्षिक कालावधीकरिता मासिक अंदाजित एकाच वेळी असलेल्या (कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणीची सरासरी.

$NCPD_{(t)}$ = प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यासाठी नियंत्रण कालावधीतील $_{(t)}$ वर्षाच्या कालावधीकरिता मासिक अंदाजित एकाच वेळी नसलेल्या (नॉन-कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणीची सरासरी :

परंतु असे की, नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षाकरिता, सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांसाठी बेस पारेषण क्षमता हक्कांची निश्चिती, या विनियमांच्या प्रभावी दिनांकाच्यापूर्वीच्या बारा महिन्यांतील पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या सी पी डी आणि एन सी पी डी च्या प्रचलित मासिक सरासरीच्या आधारे किंवा पारेषण परवानाधारकाने याचिका दाखल करण्यापूर्वी १२ महिने आधी, अशी माहिती उपलब्ध होण्यावर अवलंबून राहून, करण्यात येईल :

परंतु आणखी की, बेस पारेषण क्षमता हक्कांच्या परिगणनेसाठी सरासरी मासिक सीपीडी आणि एनसीपीडी च्या ऐवजी अंशतः मुक्त प्रवेश उपयोगकर्ते वगळून दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश उपयोगकर्त्यासाठी वाटप केलेली क्षमता विचारात घेण्यात येईल :

परंतु असेही की, नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेचा एक भाग म्हणून राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या विविध पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या (टीएसयु) अंदाजित मागणीच्या आधारे आणि मागील बदलांच्या दिशेच्या आधारे, नियंत्रण कालावधीच्या सुरुवातीला, पुढील वार्षिक बेस पारेषण क्षमता हक्क निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या वार्षिक सी पी डी आणि एन सी पी डी किंवा वाटप केलेली क्षमता, जसे असेल तसे, यांची परिगणना करण्यात येईल :

परंतु असेही की, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्ष पूर्ण झाल्यानंतर, एमएसएलडीसी प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या मागील १२ महिन्यांच्या कालावधीतील नोंदलेल्या सी पी डी आणि एन सी पी डी ची माहिती किंवा वाटप केलेल्या क्षमतेची माहिती सादर करील आणि त्या माहितीच्या आधारे बेस पारेषण क्षमता हक्कांमध्ये, कामगिरीच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस, पुढील वर्षासाठी योग्य त्या सुधारणा करण्यात येतील.

६१.३ प्रत्येक वर्षाकरिता बेस पारेषण दर हा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता मान्यता दिलेले एकूण पारेषण यंत्रणा खर्च (टी टी एस सी) आणि मान्यता दिलेले बेस पारेषण क्षमता हक्क यांचे गुणोत्तर म्हणून निश्चित करण्यात येईल आणि तो 'रुपये/किलोवॅट/महिना'मध्ये (दीर्घ-कालिन/मध्यम-कालिन वापरासाठी) किंवा 'रुपये/प्रति युनिट'मध्ये (अल्प-कालिन उभयपक्षी मुक्त प्रवेश व्यवहारांच्या वापरासाठी, पॉवर एक्सचेंजमधील अल्प-कालिन सामुदायिक व्यवहारांकरिता आणि नूतनशील उर्जा व्यवहारांकरिता) खालील सुत्रानुसार दाखविण्यात येईल :—

Base Transmission Tariff$_{(t)}$ (long-term/medium-term) (Rs/kW/month or Rs/MW/day) $= TTSC_{(t)} / \text{Base } TCR_{(t)}$

Base Transmission Tariff$_{(t)}$ (Short-term) (Rs/kWh) $= \dfrac{TTSC_{(t)}}{\sum_{i=1}^{n}(\text{Energy Transmitted by T X 1})}$

जेथे,

$TTSC_{(t)}$ = नियंत्रण कालावधीतील वार्षिक कालावधीकरिता $_{(t)}$ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी केलेला संयुक्त (पुल्ड) खर्च.

Base $TCR_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता (t) बेस पारेषण क्षमता हक्क;

n = नियंत्रण कालावधीतील त्या विशिष्ट वर्षातील पारेषण परवानाधारकांची एकूण संख्या

$Tx_i$ = $i^{th}$ पारेषण परवानाधारक :

परंतु असे की, पारेषण परवानाधारकांनी पारेषण केलेले ऊर्जा ही, प्रत्येक वितरण परवानाधारकाने नियंत्रण कालावधीसाठी त्याच्या बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेचा भाग म्हणून अंदाजित केलेल्या आणि आयोगाने मान्यता दिलेल्या वितरण परवानाधारकांच्या निर्मिती-राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या आंतरजोडणीच्या ठिकाणच्या इनपुट ऊर्जेच्या गरजेच्या आधारावर असतील :

परंतु असे की, विनियम ६१.२ आणि ६१.३ मध्ये निश्चित केलेल्या बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर यामध्ये, प्रत्यक्ष आणि मान्यता दिलेले सी पी डी आणि एन सी पी डी यातील तफावतीमुळे, कोणत्याही सुधारणा कामकाजाच्या मध्यावधी आढाव्याच्या वेळी आणि नियंत्रण कालावधीच्या अखेरीस पुढील वर्षांसाठी करण्यात येतील :

परंतु असेही की, नियंत्रण कालावधी दरम्यान राज्यांतर्गत पारेषण जाळ्यात नवीन पारेषण परवानाधारक जोडण्यात आले तर, विनियम ६१.१, ६१.२ आणि ६१.३ अंतर्गत उल्लेख केलेले टीटीएससी, बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक शिल्लक वर्षासाठी फेर-निश्चित करण्यात येतील.

६१.४ या विनियमांनुसार आयोगाकडून बेस पारेषण वीज दराला मान्यता मिळेपर्यंत १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या कालावधीसाठी आयोगाने मान्यता दिलेल्या आणि ३१ मार्च, २०१६ रोजी लागू असलेल्या बेस पारेषण वीज दराने देयक आकारणी चालू ठेवण्यात येईल.

**६२. दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये (टीएसयु) एकूण पारेषण यंत्रणेच्या खर्चाची (टीटीएससी) विभागणी—**

६२.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या एकूण पारेषण यंत्रणेच्या खर्चाची विभागणी, प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या बेस पारेषण क्षमता हक्कांशी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत वाटप केलेल्या एकूण बेस पारेषण क्षमता हक्कांच्या प्रमाणात करण्यात येईल.

६२.२ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने देय असलेल्या वार्षिक पारेषण आकारांची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यात येईल :—

$$ATC(u)_{(t)} = TTSC_{(t)} \times ([\text{Base } TCR(u)]_{(t)} / \textstyle\sum_{u=1}^{n} [\text{Base } TCR(u)]_{(t)})$$

जेथे,

$ATC(u)_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये विभागणी करावयाचे वार्षिक पारेषण आकार

Base TCR (u) = $[CPD(u)_{(t)} + NCPD(u)_{(t)}] / 2$

जेथे,

बेस पारेषण क्षमता हक्क, हे प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचे वार्षिक कालावधीतील $_{(t)}$ बेस पारेषण क्षमता हक्क दाखवितात.

$CPD(u)_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या एकाच वेळी असलेल्या (कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणीची सरासरी :

$NCPD\ (u)_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ पारेषण उपयोगकर्त्याच्या एकाच वेळी नसलेल्या (नॉन-कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणीची सरासरी :

परंतु असे की, अंशतः मुक्त प्रवेश उपयोगकर्ते वगळून, दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश उपयोगकर्त्यांसाठी बेस पारेषण क्षमता हक्कांच्या (टीसीआर) परिगणनेसाठी सरासरी मासिक सीपीडी आणि एनसीपीडीच्या ऐवजी अशा मुक्त प्रवेश उपयोगकर्त्यांसाठी वाटप केलेली क्षमता विचारात घेण्यात येईल.

**६३. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर—**

६३.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरासाठीचे आकार विविध पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये खालील पद्धतीनुसार विभागण्यात येतील :—

(ए) दीर्घकालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते, ज्यांची नोंद ठेवलेली मागणी बेस पारेषण क्षमता हक्कांपर्यंत (टीसीआर) असेल तर त्यांना अल्प-कालिन पारेषण आकार भरावा लागणार नाही ;

(बी) दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते ज्यांची नोंद ठेवलेली मागणी ही बेस पारेषण क्षमता हक्कांपेक्षा जास्त परंतु करारांतर्गत क्षमतेपेक्षा कमी असेल तर, त्यांना बेस पारेषण क्षमता हक्कांपेक्षा जास्त असलेल्या नोंद ठेवलेल्या मागणीकरिता अल्प-कालिन पारेषण आकार भरावे लागतील ;

(सी) दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांची नोंद ठेवलेली मागणी करारांतर्गत क्षमतेपेक्षा जास्त असेल तर, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, पारेषण मुक्त प्रवेशांचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले, अतिरिक्त पारेषण आकार, भरावे लागतील :

परंतु असे की, वरील खंड (ए) (बी) आणि (सी) नुसार लागू असलेले अल्प-कालीन पारेषण आकार आणि अतिरिक्त पारेषण आकार, जर दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने देय असतील किंवा अदा केलेले असतील, तर त्यांचे समायोजन, अशा दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या प्रत्यक्ष नोंदण्यात आलेल्या मागणीची माहिती उपलब्ध झाल्यावर पुढील देयकामध्ये करण्यात येईल.

**६४. पारेषण दराची चौकट—**

आयोग, सविस्तर अभ्यास करून तसेच योग्य नियामक प्रक्रियेचे पालन केल्यानंतर, विद्यमान पारेषण दराच्या चौकटीत, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीच्या आधारे व्होल्टेज, अंतर, दिशा आणि विद्युत प्रवाहाचे परिमाण असे घटक विचारात घेऊन, आयोगास उचित वाटेल त्याप्रमाणे बदल करू शकेल.

**६५. देयक आकारणी व आकारांचा भरणा—**

६५.१ मागील महिन्यातील पारेषण आकारांसाठी महिन्याच्या पहिल्या कामाच्या दिवशी, राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला राज्यांतर्गत पारेषण आकाराचे देयक मासिक तत्त्वावर पाठवेल.

६५.२ पारेषण आकाराचे मासिक देयक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने देयक प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत देय राहील.

६५.३ सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून त्यांच्या पारेषण आकारांचा भरणा राज्य पारेषण कंपनीकडे वेळेवर केला जाईल, याची ते खात्री करतील ज्यामुळे राज्य पारेषण कंपनीला पारेषण परवानाधारकाने केलेली मागणी वेळीच भागविणे शक्य होईल.

**६६. पारेषण हानि—**

६६.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर ज्या प्रमाणात केला असेल त्या प्रमाणात त्याला राज्य भार प्रेषण केंद्राने निश्चित केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली पारेषण यंत्रणेतील ऊर्जा हानि, सहन करावी लागेल.

**६७. रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार.—**

६७.१ महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या निर्देशानुसार निर्मिती कंपनी यंत्राच्या क्षमतेच्या आधारावर ग्रिडमध्ये रिॲक्टिव्ह ऊर्जा अंतक्षेपित करील/खेचून घेईल.

६७.२ एमएसएलडीसीच्या निर्देशानुसार लागू असलेल्या कालावधीसाठी (अंतक्षेपण किंवा ॲबसॉर्पशन) रिॲक्टिव्ह ऊर्जेचा विनिमय केला असेल तरच केवळ, नियंत्रण कालावधीच्या आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता १२.०० पैसे/आरकेव्हीएएच दराने आणि पुढील आर्थिक वर्षाकरिता वार्षिक ०.५० पैसे/आरकेव्हीएएच दराने वाढ करून, आयोगाने त्यामध्ये अन्यथा सुधारणा केली नसेल तर, एमएसएलडीसीकडून निर्मिती कंपनीला भरपाई करून देण्यात येईल/वसूल करण्यात येईल.

६७.३ पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता, पारेषण यंत्रणेमध्ये रिॲक्टिव्ह ऊर्जेचा समतोल राखण्यासाठी एमएसएलडीसीकडून खालील प्रोत्साहन-अधिदान मिळणे किंवा न मिळण्याच्या/वसुलीच्या अधीन राहील :—

| रिॲक्टिव्ह ऊर्जा नुकसानभरपाईला जबाबदार असलेला पक्षकार | सुरुवातीची कामगिरी | आंतरजोडणीच्या ठिकाणचे ($V_p$) व्होल्टेज | नुकसानभरपाईसाठी दर |
|---|---|---|---|
| पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता (टीएसयु) | ०.९ च्या ऊर्जा घटकाशी अनुरूप मर्यादेत ठेवण्याची कमाल | - जर $V_p$ > १०३% of $V_{nom}$ | - अतिरिक्त वीज खेचणीसाठी रु. ०.१२/आरके व्हीएएच दराने प्रोत्साहन-अधिदान. |
| | रिॲक्टिव्ह ऊर्जा खेचणी प्रत्येक आंतरबदल जोडणी | - जर $V_p$ < ९७ % of $V_{nom}$ | - अतिरिक्त वीज खेचणीसाठी रु. ०.१२/आरके व्हीएएच दराने दंड. |
| | | - जर ९७ % < $V_p$ < १०३ % | - निरंक |

जेथे,

$V_p$ = आंतरबदलाच्या ठिकाणी असलेले व्होल्टेज

$V_{nom}$ = व्होल्टेजचे नाममात्र मूल्य

**भाग- जी : वितरण वायर्स व्यवसाय**

**६८. वितरण परवानाधारकाच्या लेख्यांचे अलगीकरण.—**

आयोगाला (ए) वितरण वायर्स व्यवसाय, (बी) किरकोळ वीज पुरवठा यांच्या वीज दरांचे वेगवेगळे निश्चितीकरण करणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक वितरण परवानाधारक वितरण वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांच्याकरिता वेगवेगळे लेखा अभिलेखे ठेवेल आणि त्यासाठी एक वाटप विवरणपत्र तयार करील :

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसायांमध्ये लेख्याचे संपूर्ण अलगीकरण झालेले नसेल तर, वितरण परवानाधारकाची एकूण महसुली गरज खालील वाटणी सूत्रानुसार वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांच्यामध्ये विभाजित करण्यात येईल :—

| तपशील | वितरण वायर्स व्यवसाय (%) | किरकोळ वीज पुरवठा (%) |
|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ०% | १००% |
| आंतर-राज्य पारेषण आकार | ०% | १००% |
| राज्यांतर्गत पारेषण आकार | ०% | १००% |
| संचालन व देखभाल खर्च | ६५% | ३५% |
| घसारा | ९०% | १०% |
| दीर्घ-कालिन कर्ज भांडवलावरील व्याज | ९०% | १०% |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १०% | ९०% |
| ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | १०% | ९०% |
| बुडित कर्जासाठी तरतूद | १०% | ९०% |
| आयकर | ९०% | १०% |
| आकस्मिक निधीकरिता वर्गणी | ९०% | १०% |
| भागभांडवलावरील परतावा | ९०% | १०% |
| वीज दराच्या व्यतिरिक्त उत्पन्न | १०% | ९०% |

परंतु आणखी असे की, वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ पुरवठा व्यवसाय या दोन्हींमध्ये जेथे प्रत्यक्ष लेख्यांचे विभाजन करण्यात आलेले नसेल अशा, सर्व किंवा कोणत्याही खर्च आणि महसुलाच्या शीर्षकांना वरील वाटणी सूत्र लागू करण्यात येईल :

परंतु असेही की, वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांच्या दराच्या निश्चितीकरणाकरिता, आयोग, वितरण परवानाधारकाला वेगवेगळी याचिका दाखल करण्यास सांगू शकेल.

**६९. व्याप्ती—**

वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर्सचा उपयोग करण्यासाठी वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने द्यावयाचे वहन आकार निश्चित करण्यासाठी या भागात समाविष्ट असलेले विनियम लागू राहतील.

**७०. वितरण वायर्स व्यवसायाकरिता लागणाऱ्या एकूण महसुली गरजेचे भाग—**

७०.१ नियंत्रण कालावधीच्या संबंधित वर्षासाठी वितरण वायर्सच्या व्यवसायाच्या एकूण महसुली गरजेची वसुली, आयोगाने मान्यता दिल्यानुसार वितरण परवानाधारकाच्या वहन आकारातून करण्यात येईल आणि एकूण महसुली गरजेचे भाग खालीलप्रमाणे असतील :—

(ए) संचालन व देखभाल खर्च ;

(बी) घसारा ;

(सी) कर्ज भांडवलावरील व्याज ;

(डी) खेळत्या भांडवलावरील व्याज ;

(इ) ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या अनामत रकमेवरील व्याज ;

(एफ) बुडित कर्जासाठी तरतूद ;

(जी) आकस्मिक निधीकरिता वर्गणी ;

(एच) भाग भांडवलावरील परतावा ;

(आय) आय कर ;

**वजा :**

(जे) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न ;

(के) या विनियमांत विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न :

परंतु असे की, या विनियमांच्या **भाग डी** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींनुसार, वितरण वायर्स व्यवसायासाठी घसारा, कर्ज भांडवलावरील व्याज, खेळत्या भांडवलावरील व्याज, ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून आलेल्या अनामत रकमेवरील व्याज, आकस्मिक निधीकरिता वर्गणी, भागभांडवलावरील परतावा आणि आयकर यांना परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, आयोगाकडून, लेखापरीक्षित लेख्यांच्या आधारे अचूक समायोजनाच्या वेळी, प्रकरण-निहाय, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मागील कालावधीतील उत्पन्न/खर्चास परवानगी देण्यात येईल :

परंतु असेही की, कोणत्याही कृतीच्या मानकांचे पालन करण्यात आलेले अपयश किंवा नुकसानीसाठी आयोग, न्यायालये, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, आणि विद्युत लोकपाल इ. नी दिलेल्या आदेशांच्या परिणामस्वरूप असलेला सर्व दंड आणि नुकसानभरपाई, एकूण महसुली गरजेच्या माध्यमातून वसूल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु असेही की, वितरण परवानाधारकाने अदा केलेला किंवा अदा करावयाचा असा दंड आणि नुकसानभरपाई, असल्यास, यांचा तपशील वितरण परवानाधारक वेगळा ठेवेल आणि सदर तपशील त्याच्या याचिकेसह आयोगाला सादर करील.

७०.२ वितरण परवानाधारकाने या विनियमांच्या **भाग-बी** नुसार वीज दर निश्चितीकरणासाठी दाखल केलेल्या याचिकेच्या आधारे, आयोगाकडून वितरण परवानाधारकाचे वहन आकार निश्चित करण्यात येतील :

परंतु असे की, वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून वहन आकार वसूल करण्यासाठी वहन आकार हा रुपये/युनिट मध्ये किंवा रुपये/किलोवॅट/ महिना मध्ये किंवा आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा परिमाणात/संज्ञेत दाखविण्यात येईल :

परंतु आणखी असेही की, हे विनियम प्रभावी होण्याच्या दिनांकापर्यंत आयोगाकडून ज्याचा वीज दर अद्याप निश्चित करण्यात यावयाचा आहे अशा मानीव वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, आयोग वहन आकारांची कमाल मर्यादा निश्चित करू शकेल, हे आकार अशा मानीव वितरण परवानाधारकाकडून आयोगास उचित वाटतील इतक्या कालावधीपर्यंत, आकारता येतील.

७०.३ या विनियमांनुसार आयोगाकडून वहन आकारांना मान्यता मिळेपर्यंत १ एप्रिल, २०१६ पासून सुरू होणाऱ्या कालावधीसाठी आयोगाने मान्यता दिलेल्या आणि ३१ मार्च, २०१६ रोजी लागू असलेल्या वीज दराने वहन आकारांची देयकआकारणी चालू ठेवण्यात येईल.

**७१. भांडवल गुंतवणूक योजना—**

७१.१ वितरण परवानाधारक संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय वीज दर याचिकेचा एक भाग म्हणून, त्याच्या वितरण जाळ्याचे बळकटीकरण व वाढ, वीज भाराच्या वाढीची गरज भागविणे, वितरण हानिमध्ये घट, वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेत सुधारणा, विश्वासार्हता, मिटरींग, अतिभारामध्ये घट इ. करिता नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी भांडवली गुंतवणुकीची सविस्तर योजना, निधी उभारणीची योजना आणि भौतिक लक्ष्यांक, आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करील.

७१.२ भांडवल गुंतवणूक योजना गुंतवणूक करण्यासाठीच्या कमीत कमी खर्चाच्या योजना असतील आणि त्यामध्ये रु. दहा कोटीपेक्षा अधिक रकमेच्या किंवा आयोगाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अशा अन्य रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश असेल आणि ते आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यामध्ये असतील.

७१.३ भांडवली गुंतवणूक योजनेमध्ये आवश्यकता असल्यानुसार, परंतु त्यापुरतेच मर्यादित न राहता, अशी माहिती, तपशील आणि दस्तावेज जसे की, वितरण उप-केंद्रांची संख्या, ग्राहकांची उप-केंद्रे, एमव्हीए मधील ट्रान्सफॉर्मेशन क्षमता आणि वेगवेगळ्या क्षमतेच्या वितरण रोहित्रांचे तपशील, उच्च-दाब व लघु-दाब यांचे गुणोत्तर तसेच प्रस्तावित गुंतवणुकीसाठी आवश्यकता दर्शविणारी वितरण वाहिन्यांची लांबी, विचारात घेतलेले पर्याय, खर्च-लाभ विश्लेषण आणि अन्य बाबी ज्यांचा वहन आकारांवर परिणाम होऊ शकेल, यांचा समाावेश असेल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक त्याच्या परवाना क्षेत्रातील प्रत्येक वितरण फ्रॅन्चायसीच्या क्षेत्रात हाती घेण्यात येत असलेल्या भांडवली गुंतवणुकांचा वेगळा तपशील सादर करील.

७१.४ आयोग, प्रस्तावित खर्चाची आवश्यकता आणि वहन आकारावरील संभाव्य परिणाम या बाबी विचारात घेऊन, वितरण परवानाधारकाकडून संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय एकूण महसुली गरजेसह सादर करण्यात आलेली भांडवली गुंतवणूक योजना विचारात घेईल.

७१.५ वितरण परवानाधारक, वहन आकारांच्या निश्चितीकरणाच्या याचिकेसह, किंवा मध्यावधी कामगिरीच्या आढाव्यासाठीच्या याचिकेसह, जसे असेल तसे, भांडवली खर्चाच्या प्रकल्पांची प्रगती दर्शविणारा तपशील, त्यासह आयोगाला अशा प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक असणारी अशी अन्य माहिती, तपशील किंवा दस्तावेज सादर करील.

**७२. संचालन व देखभाल खर्च—**

७२.१ वितरण वायर्स व्यवसायाकरिता संचालन व देखभाल खर्चाची परिगणना या विनियमांनुसार करण्यात येईल.

७२.२ दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या तीन वर्षांच्या अचूक समायोजन केलेल्या संचालन व देखभालीवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चामध्ये कार्यक्षमतेतील वाढ/घटीचा हिस्सा, वाढवून/कमी केल्यानंतर येणाऱ्या सरासरीच्या आधारे संचालन व देखभाल खर्च काढण्यात येतील व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, वगळण्यात येतील.

७२.३ अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०१५ रोजी सुरू होणाऱ्या आधारभूत वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठी, ५.७२ % वृद्धी दराने वाढ करण्यात येईल.

७२.४ पुढील प्रत्येक वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च, आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता निश्चित केलेला आधारभूत खर्चास, चलनवाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर मागील वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलनवाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) मागील वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने, विचारात घेऊन व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का कमी करून, वाढविण्यात येऊन, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढता येतील :

परंतु असे की, आयोगाकडून वेळोवेळी वेगवेगळा कार्यक्षमता घटक ठरवून देता येईल :

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील वेगवेगळ्या वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्चाचे अचूक समायोजन करताना, चलनवाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर संबंधित वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलनवाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) संबंधित वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मुल्याने कमी करून, विचारात घेण्यात येईल.

७२.५ ज्या मानीव वितरण परवानाधारकांच्या वीज दरांचे निश्चितीकरण आयोगाकडून हे विनियम प्रभावी होण्याच्या दिनांकापर्यंत अद्याप व्हावयाचे असेल तर, त्यांच्या संचालन व देखभाल खर्चाचे निश्चितीकरण आयोग प्रकरण-निहाय तत्त्वावर करील.

**७३. बुडित कर्जासाठी तरतूद—**

कोणत्याही वर्षासाठी, आयोग, वितरण परवानाधारकाच्या त्या वर्षातील लेखापरीक्षित लेख्यांमध्ये दाखविण्यात आलेल्या व्यापारामधून येणे रकमा किंवा वहन आकारांपासून येणे रकमांच्या १.५ टक्क्यापर्यंत बुडित कर्जासाठी तरतूद करण्यास परवानगी देऊ शकेल :

परंतु असे की, आयोगाने दिलेल्या परवानगीनुसार, याचिकाकर्त्याकडे अगदी अलीकडील उपलब्ध असलेल्या लेखापरीक्षित लेख्यांमध्ये वितरण परवानाधारकाने, केलेल्या बुडित कर्जासाठीच्या प्रत्यक्ष तरतुदीच्या आधारे, आयोग, त्याच्या बहुवर्षीय वीज दर आदेशामध्ये, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी बुडित कर्जाच्या तरतुदीस तात्पुरती मान्यता देईल :

परंतु आणखी असे की, आयोगाने त्यावर्षाकरिता परवानगी दिलेली अशी तरतूद ही वितरण परवानाधारकाने त्या वर्षाच्या लेखापरीक्षित लेख्यामध्ये बुडित कर्जापोटी केलेल्या प्रत्यक्ष तरतुदीपेक्षा, जी वितरण वायर्स व्यवसायाला यथोचितपणे वाटप केलेली असेल, जास्त असणार नाही आणि त्यामध्ये वितरण परवानाधारकाने वर्ष अखेरीस देयके न पाठविलेल्या परंतु त्यापोटी येणे असलेल्या महसुलासाठी केलेली तरतूद वगळण्यात येईल :

परंतु असेही की, ज्या वर्षाकरिता आयोगाने बुडित कर्जासाठी संचयी तरतूद करण्यास परवानगी दिली असेल अशी तरतूद, जी वितरण वायर्स व्यवसायाला यथोचितपणे वाटप केलेली असेल, ती जर वितरण परवानाधारकाच्या लेखापरीक्षित लेख्यामध्ये दाखवलेल्या व्यापारी येणे किंवा वहन आकारापोटी येणे असलेल्या रकमांपेक्षा पाच टक्क्यांनी जास्त असेल तर अशा प्रकारच्या विनियोजनास परवानगी देण्यात येणार नाही ज्याचा परिणाम संचयी तरतूद सदर कमाल मर्यादेपेक्षा जास्त वाढण्यात झाला असता :

परंतु असेही की, वितरण परवानाधारकाने बुडित कर्जापोटी निर्लेखित केलेली प्रत्यक्ष रक्कम वितरण परवानाधारकाला बुडित कर्जासाठी केलेल्या संचित तरतुदींमधून समायोजित करावी लागेल आणि अशी रक्कम वितरण परवानाधारकाच्या एकूण महसुली गरजेत खर्च म्हणून वेगळी दाखविण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**७४. वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न—**

७४.१ आयोगाकडून मान्यता देण्यात आलेले वितरण परवानाधारकाच्या वितरण वायर्स व्यवसायाशी संबंधित वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न वितरण वायर्स व्यवसायाचे वहन आकार निश्चित करण्यासाठी एकूण महसुली गरजेतून वजा करण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, त्याच्या वीज दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नाच्या अंदाजांचा पूर्ण तपशील, आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा नमुन्यामध्ये, आयोगास सादर करील.

७४.२ वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये खालील घटकांचा समावेश असेल :—

(ए) जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न ;

(बी) भंगार विक्रीपासून मिळणारे उत्पन्न ;

(सी) गुंतवणुकांपासून मिळणारे उत्पन्न ;

(डी) पुरवठादार/ठेकेदारांना दिलेल्या अग्रिमांवरील व्याज ;

(इ) कर्मचारी निवासस्थानांच्या भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(एफ) ठेकेदारांकडून भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(जी) ठेकेदार आणि अन्य व्यक्ती/संस्थांकडून भाडे तत्त्वावर दिलेल्या वस्तुंपासून मिळणारे उत्पन्न ;

(एच) आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीनुसार लागू केलेल्या ग्राहक आकारांपासून मिळणारे उत्पन्न ;

(आय) भांडवली कामांसाठी पर्यवेक्षण आकार ;

(जे) जाहिरातींपासून मिळणारे उत्पन्न ;

(के) निविदा दस्तावेजांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न ;

(एल) वीज दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्न :

परंतु असे की, वितरण वायर्स व्यवसायाच्या विनियमित व्यवसायाशी अनुरूप भागभांडवलावरील परताव्यातून केलेल्या गुंतवणुकीतून प्राप्त झालेले व्याज वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही.

**७५. अन्य व्यवसायापासून उत्पन्न—**

वितरण परवानाधारक त्याचा वितरण वायर्स व्यवसाय जर त्याच्या मत्तांचा इष्टतम वापर व्हावा म्हणून अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत कोणताही अन्य व्यवसाय करीत असेल तर, अशा अन्य व्यवसायापासून मिळालेल्या महसुलातून, अशा अन्य व्यवसायाशी संबंधित असलेले सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च वजा करून, उरलेल्या रकमेच्या दोन-तृतियांश इतकी रक्कम, वितरण वायर्स व्यवसायाचे वहन आकार निश्चित करताना एकूण महसुली गरजेतून कमी करण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक संयुक्त (पुल्ड) व सामायिक खर्चाचे वाटप वाजवी आधारास अनुसरून वितरण वायर्स व्यवसाय आणि अन्य व्यवसायात करील आणि याबाबतचे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून यथोचितपणे प्रमाणित केलेले वाटप विवरणपत्र, वहन आकारांची निश्चिती करण्यासाठीच्या याचिकेसोबत आयोगास सादर करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा अन्य व्यवसायाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चाची एकूण बेरीज ही अशा अन्य व्यवसायापासून मिळणाऱ्या महसुलापेक्षा जास्त असेल तर, अशा अन्य व्यवसायाच्या कारणास्तव वितरण वायर्स व्यवसायाच्या एकूण महसुली गरजेत कोणत्याही रकमेची भर घालण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**७६. वहनहानी—**

वितरण वायर्स व्यवसायाला, वितरण यंत्रणा चालविताना उद्‌भवणाऱ्या मान्यता देण्यात आलेल्या वहनहानीच्या ठरविलेल्या लक्ष्यांकाइतकी वसुली, वस्तुरूपात, करण्यास परवानगी देण्यात येईल :

परंतु असे की, आयोग, वितरण परवानाधारकाने दाखल केलेल्या बहुवर्षीय वीज दराच्या याचिकेवरील आदेशाचा एक भाग म्हणून, विनियम ९ नुसार वहन हानींसाठी एक मार्गदर्शिका ठरवून देऊ शकेल.

## भाग - एच : किरकोळ विद्युत पुरवठा

**७७. व्याप्ती—**

वितरण परवानाधारकाकडून त्याच्या ग्राहकांना करावयाच्या किरकोळ वीज पुरवठ्यासाठी दर निश्चित करताना या भागामध्ये समाविष्ट असलेले विनियम लागू राहतील.

**७८. किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाकरिता एकूण महसुली गरजेचे भाग—**

७८.१ वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्याच्या दराद्वारे, नियंत्रण कालावधीतील संबंधित वर्षाकरिता किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाच्या आयोगाने मान्यता दिलेल्या एकूण महसुली गरजेची वसुली करता येईल आणि एकूण महसुली गरजेचे भाग खालीलप्रमाणे असतील :—

(ए) स्वतःच्या वीज निर्मितीचा खर्च / वीज खरेदीचा खर्च ;

(बी) आंतर-राज्य पारेषण आकार ;

(सी) राज्यांतर्गत पारेषण आकार ;

(डी) एमएसएलडीचे शुल्क व आकार ;

(इ) संचालन व देखभाल खर्च ;

(एफ) घसारा ;

(जी) कर्ज भांडवलावरील व्याज ;

(एच) खेळत्या भांडवलावरील व्याज ;

(आय) ग्राहक सुरक्षा अनामत रकमेवरील व्याज ;

(जे) बुडित कर्जासाठी तरतूद ;

(के) आकस्मिक निधीकरिता वर्गणी ;

(एल) भागभांडवलावरील परतावा ; आणि

(एम) आयकर ;

**वजा :**

(एन) वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न ;

(ओ) या विनियमांत विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, अन्य व्यवसायापासूनचे उत्पन्न ;

(पी) क्रॉस-सबसिडीवरील अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमा ;

(क्यु) अतिरिक्त अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमा :

परंतु असे की, या विनियमांच्या **भाग डी** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींनुसार, किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी घसारा, कर्ज भांडवलावरील व्याज, खेळत्या भांडवलावरील व्याज, ग्राहकांच्या सुरक्षा अनामतीवरील व्याज, आकस्मिक निधीकरिता वर्गणी, भागभांडवलावरील परतावा आणि आयकर, यांना परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, आयोगाकडून, लेखापरीक्षित लेख्यांच्या आधारे अचूक समायोजनाच्या वेळी, प्रकरण-निहाय, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, मागील कालावधीतील उत्पन्न/खर्चास परवानगी देण्यात येईल :

परंतु असेही की, कोणत्याही कृतीच्या मानकांचे पालन करण्यात आलेले अपयश किंवा नुकसानीसाठी आयोग, न्यायालये, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, आणि विद्युत लोकपाल इ. नी दिलेल्या आदेशाच्या परिणामस्वरूप असलेला सर्व दंड आणि नुकसानभरपाई, एकूण महसुली गरजेच्या माध्यमातून वसूल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु असेही की, वितरण परवानाधारक असा अदा करण्यात आलेला किंवा अदा करावयाचा दंड आणि नुकसानभरपाई, असल्यास, यांचा तपशील वेगळा ठेवेल आणि त्याच्या याचिकेसह आयोगाला सादर करील.

७८.२ या विनियमांच्या **भाग बी** नुसार, वितरण परवानाधारकाने दर निश्चितीकरणासाठी सादर केलेल्या याचिकेच्या आधारे आयोगाकडून वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्याचे दर निश्चित करण्यात येतील :

परंतु असे की, वितरण परवानाधारकाची एकूण महसुली गरज विनियम ६८ च्या तरतुदींनुसार वितरण वायर्स व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांच्यामध्ये वाटून देण्यात किंवा संविभाजित करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, आयोगाकडून ठरवून देण्यात आल्यानुसार, ग्राहकांकडून वसुली करण्याच्या प्रयोजनासाठी, किरकोळ वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दरामध्ये स्थिर/मागणी आकार आणि ऊर्जा आकार यांच्या कोणत्याही संयोगाचा (कॉम्बिनेशन) समावेश असू शकेल :

परंतु असेही की, आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा कामगिरीच्या मापदंडांच्या आधारे, वितरण परवानाधारकासाठी क्षेत्र-निहाय वीज दर निश्चित करण्यात येईल :

परंतु असेही की, हे विनियम प्रभावी होण्याच्या दिनांकापर्यंत आयोगाकडून ज्याचा वीज दर अद्याप निश्चित करावयाचा आहे अशा मानीव वितरण परवानाधारकाच्या बाबतीत, आयोग किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दराची कमाल मर्यादा निश्चित करू शकेल, जो दर वितरण परवानाधारकाला आयोगास उचित वाटेल अशा कालावधीपर्यंत, आकारता येईल.

७८.३ या विनियमांनुसार आयोगाकडून किरकोळ वीज पुरठ्यासाठीच्या वीज दराला मान्यता मिळेपर्यंत १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या कालावधीसाठी आयोगाने मान्यता दिलेल्या आणि ३१ मार्च २०१६ रोजी लागू असलेल्या वीज दराने वितरण परवानाधारकाकडून किरकोळ वीज पुरवठ्यासाठी देयकआकारणी चालू ठेवण्यात येईल.

७८.४ वितरण परवानाधारक, आयोगाने निश्चित केलेल्या दरावर आणि आकारांवर, ग्राहकांना रिबेट देऊ शकेल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक अशा रिबेटचा तपशील, आयोगाकडून ठरवून देण्यात आलेल्या पद्धतीनुसार व नमुन्यामध्ये दर तिमाहीला, आयोगाला सादर करील :

परंतु आणखी असे की, अशा रिबेटचे वितरण परवानाधारकावर होणारे परिणाम पूर्णपणे वितरण परवानाधारकाला सहन करावे लागतील आणि अशा रिबेटचे परिणाम कोणत्याही स्वरूपात ग्राहकांकडून वसूल करण्यात येणार नाही :

परंतु असेही की, असे रिबेट कोणत्याही निवडक ग्राहकाला/ग्राहकांना देण्यात येणार नाहीत आणि ते संपूर्ण ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारी/वापर टप्प्यांनुसार, भेदभाव-रहित पद्धतीने द्यावे लागतील.

**७९. विक्रीचे अंदाज—**

७९.१ वितरण परवानाधारक, वीज दरातील प्रत्येक ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारीला आणि अशा वीज दरातील ग्राहक वर्गवारी/उप-वर्गवारीतील प्रत्येक वीज दराच्या टप्प्यासाठी, विजेच्या अपेक्षित विक्रीचे महिना-निहाय अंदाज, या विनियमांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, आयोगास, बहुवर्षीय वीज दराच्या याचिकेसोबत, मान्यतेसाठी सादर करील :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, त्याच्या परवाना क्षेत्रातील प्रत्येक वितरण फ्रॅन्चायसीच्या क्षेत्राकरिता वर्गवारी-निहाय विक्रीशी संबंधित वेगवेगळा तपशील, तसेच त्याच्या परवाना क्षेत्रातील एकूण वर्गवारी-निहाय विक्रीचा तपशील, सादर करील.

७९.२ विक्रीचे अंदाज हे, या विनियमांतील **भाग-सी** अतंर्गत वीज खरेदी योजनेचा एक भाग म्हणून तयार केलेल्या विद्युत भाराच्या अंदाजांशी सुसंगत असतील आणि ते मागील माहिती-संग्रहावर आणि भविष्यांविषयी वाजवी गृहितकांवर आधारित असतील :

परंतु असे की, आयोगाने जर वीज दरातील कोणत्याही विशिष्ट वर्गवारीसाठी विक्रीचे अंदाज तयार करण्याकरिता पद्धत ठरवून दिली असेल तर, वितरण परवानाधारक अशा वीज दरातील वर्गवारीकरिता विक्रीचे अंदाज तयार करताना या पद्धतीचा अवलंब करील.

**८०. भांडवल गुंतवणूक योजना—**

८०.१ वितरण परवानाधारक संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय वीज दर याचिकेचा एक भाग म्हणून, ग्राहकांच्या संख्येत झालेल्या वाढीच्या गरजा भागविण्यासाठी, वितरण हानीमध्ये घट, मिटरींग, इ. करीता नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी सविस्तर भांडवली गुंतवणुकीची योजना, निधी उभारणीची योजना आणि भौतिक लक्ष्यांक, आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करील.

८०.२ भांडवल गुंतवणूक योजना गुंतवणूक करण्यासाठीच्या कमीत कमी खर्चाची योजना असेल आणि त्यामध्ये रुपये एक कोटीपेक्षा अधिक रकमेच्या किंवा आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा अन्य रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश असेल आणि आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल त्या नमुन्यामध्ये ही भांडवल गुंतवणूक योजना असेल :

८०.३ भांडवल गुंतवणूक योजनेसोबत, प्रस्तावित गुंतवणुकीची गरज दर्शविणारी, विचारात घेतलेले पर्याय, खर्च-लाभ विश्लेषण आणि किरकोळ वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दरावर परिणाम करू शकणाऱ्या अशा अन्य बाबींची माहिती, तपशील व दस्तावेज सोबत जोडण्यात येतील.

८०.४ आयोग, प्रस्तावित खर्चाची आवश्यकता आणि किरकोळ वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दरावरील संभाव्य परिणाम या बाबी विचारात घेऊन, वितरण परवानाधारक संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय एकूण महसुली गरजेसह सादर करण्यात आलेली भांडवली गुंतवणूक योजना, विचारात घेईल.

८०.५ वितरण परवानाधारक, किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दराच्या निश्चितीकरणाच्या याचिकेसह, किंवा मध्यावधी कामगिरीच्या आढाव्यासाठीच्या याचिकेसह, जसे असेल तसे, भांडवली खर्चाच्या प्रकल्पांची प्रगती दर्शविणारा तपशील, आयोगाला अशा प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक असणारी अशी अन्य माहिती, तपशील किंवा दस्तावेज, सादर करील.

**८१. संचालन व देखभाल खर्च—**

८१.१ किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाकरिता संचालन व देखभाल खर्चाची परिगणना या विनियमांनुसार करण्यात येईल.

८१.२ दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या तीन वर्षांच्या अचूक समायोजन केलेल्या संचालन व देखभालीवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चामध्ये कार्यक्षमतेतील वाढ/घटीचा हिस्सा, वाढवून/कमी केल्यानंतर येणाऱ्या सरासरीच्या आधारे संचालन व देखभाल खर्च काढण्यात येतील व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, वगळण्यात येतील.

८१.३ अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०१५ रोजी सुरू होणाऱ्या आधारभूत वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठी, ५.७२ % वृद्धी दराने वाढ करण्यात येईल.

८१.४ पुढील प्रत्येक वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता निश्चित केलेला आधारभूत खर्च, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर मागील वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) मागील वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने, विचारात घेऊन व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का कमी करून, वाढविण्यात येऊन, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढता येतील :

परंतु असे की, आयोगकडून वेळोवेळी वेगवेगळा कार्यक्षमता घटक ठरवून देता येईल :

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील वेगवेगळ्या वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्चाचे अचूक समायोजन करताना, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार याच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर संबंधित वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील ) संबंधित वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मूल्याने कमी करून, विचारात घेण्यात येईल.

८१.५ जर मानीव वितरण परवानाधारकाचा वीज दर आयोगाने हे विनियम अंमलात येण्याच्या दिनांकापर्यंत अद्याप निश्चित करावयाचा असेल तर, आयोग संचालन व देखभाल खर्च प्रकरण-निहाय तत्त्वावर निश्चित करील.

**८२. बुडित कर्जासाठी तरतूद—**

आयोग, वितरण परवानाधारकाच्या त्या वर्षातील लेखापरीक्षित लेख्यांमध्ये दाखविण्यात आलेल्या व्यापाऱ्यांकडून येणे रकमा किंवा वीज विक्रीपासून येणे रकमांच्या १.५ टक्क्यापर्यंत बुडित कर्जासाठी तरतूद करण्यास परवानगी देऊ शकेल :

परंतु असे की, आयोगाने परवानगी दिल्यानुसार, याचिकाकर्त्याकडे अगदी अलीकडील उपलब्ध असलेल्या लेखापरीक्षित लेख्यांमध्ये वितरण परवानाधारकाने, केलेल्या बुडित कर्जासाठीच्या प्रत्यक्ष तरतुदीच्या आधारावर, आयोग, त्याच्या बहु-वर्षीय वीज दर आदेशामध्ये, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी बुडित कर्जाच्या तरतुदीस तात्पुरती मान्यता देईल :

परंतु आणखी असे की, आयोगाने कोणत्याही वर्षाकरिता परवानगी दिलेली अशी तरतूद ही वितरण परवानाधारकाने त्या वर्षाच्या लेखापरीक्षित लेख्यांमध्ये बुडीत कर्जापोटी केलेल्या प्रत्यक्ष तरतुदीपेक्षा, जी किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाला यथोचितपणे वाटप केलेली असेल, जास्त असणार नाही आणि त्यामध्ये वितरण परवानाधारकाने वर्ष अखेरीस देयके न पाठविलेल्या परंतु त्यापोटी येणे असलेल्या महसुलासाठी केलेली तरतूद वगळण्यात येईल :

परंतु असेही की, ज्या वर्षाकरिता आयोगाने बुडीत कर्जासाठी संचयी तरतूद करण्यास परवानगी दिली असेल अशी तरतूद, जी किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाला यथोचितपणे वाटप केलेली असेल, ती जर वितरण परवानाधारकाच्या लेखापरीक्षित लेख्यांमध्ये दाखवलेल्या व्यापारी येणे किंवा विजेच्या विक्रीपोटी येणे असलेल्या रकमांपेक्षा पाच टक्क्यांनी जास्त असेल तर अशा प्रकारच्या विनियोजनास परवानगी देण्यात येणार नाही ज्याचा परिणाम संचयी तरतूद सदर कमाल मर्यादेपेक्षा जास्त वाढण्यात झाला असता ;

परंतु असेही की, वितरण परवानाधारकाने बुडीत कर्जापोटी प्रत्यक्ष निर्लेखित केलेली रक्कम ही बुडीत कर्जासाठी केलेल्या संचित तरतुदींमधून समायोजित करण्यात येईल आणि अशी रक्कम एकूण महसुली गरजेत खर्च म्हणून वेगळी दाखविण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**८३. वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न—**

८३.१ आयोगाने मान्यता दिलेले किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाशी संबंधित वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न हे एकूण महसुली गरजेतून, वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी वीज दराची परिगणना करताना, वजा करण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक आयोगाकडून ठरवून देण्यात येऊ शकेल अशा नमुन्यामध्ये वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या अंदाजांचा पूर्ण तपशील सादर करील.

८३.२ **वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये खालील घटकांचा समावेश असेल :—**

(ए) जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न ;

(बी) भंगार विक्रीपासून मिळणारे उत्पन्न ;

(सी) गुंतवणुकांपासून मिळणारे उत्पन्न ;

(डी) पुरवठादार/ठेकेदारांना दिलेल्या अग्रिमावरील व्याज ;

(इ) कर्मचारी निवासस्थानांच्या भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(एफ) ठेकेदारांकडून भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(जी) ठेकेदार आणि अन्य व्यक्ती/संस्थांकडून भाडे तत्त्वावर दिलेल्या वस्तुंपासून मिळणारे उत्पन्न ;

(एच) भांडवली कामांसाठी पर्यवेक्षण आकार ;

(आय) आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीनुसार लागू केलेल्या ग्राहक आकारांपासून मिळणारे उत्पन्न ;

(जे) विजेची चोरी आणि/किंवा भुरट्या चोरीपोटी वसुलीतून मिळणारे उत्पन्न ;

(के) जाहिरातींपासून मिळणारे उत्पन्न ;

(एल) निविदा दस्तावेजांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न ;

(एम) वीज दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्न ;

परंतु असे की, किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाच्या विनियमित व्यवसायाशी अनुरूप भागभांडवलावरील परताव्यातून केलेल्या गुंतवणुकीतून प्राप्त झालेले व्याज वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही.

**८४. अन्य व्यवसायापासून उत्पन्न—**

वितरण परवानाधारकाचा किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय जर त्याच्या मत्तांच्या इष्टतम वापर व्हावा म्हणून अधिनियमाच्या कलम ५१ अंतर्गत अन्य कोणताही व्यवसाय करीत असेल तर, अशा अन्य व्यवसायापासून मिळालेल्या महसूलातून, अशा अन्य व्यवसायाशी संबंधित

असलेले सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च वजा करून, उरलेल्या रकमेच्या दोन-तृतियांश इतकी रक्कम, वितरण परवानाधारकाकडून किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दराची परिगणना करताना एकूण महसुली गरजेतून कमी करण्यात येईल :

परंतु असे की, वितरण परवानाधारक, संयुक्त व सामायिक खर्चांचे वाटप, वाजवी आधारास अनुसरून, किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय आणि अन्य व्यवसायात करील आणि याबाबतचे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून यथोचितपणे प्रमाणित केलेले वाटप विवरणपत्र, वीज दराच्या निश्चितीकरणासाठीच्या याचिकेसोबत आयोगास सादर करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा अन्य व्यवसायाच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चांची एकूण बेरीज ही अशा अन्य व्यवसायापासून मिळणाऱ्या महसुलापेक्षा जास्त असेल तर, अशा अन्य व्यवसायाच्या कारणास्तव किरकोळ वीज पुरवठा व्यवसायाच्या एकूण महसुली गरजेत कोणत्याही रकमेची भर घालण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**८५. क्रॉस सबसिडी अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमा—**

वितरण मुक्त प्रवेशांचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांनुसार, आयोगाने मान्यता दिलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराच्या माध्यमातून वितरण परवानाधारकाला मिळालेल्या रकमा, अशा वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दराची परिगणना करताना, एकूण महसुली गरजेतून वजा करण्यात येतील.

**८६. अतिरिक्त अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमा—**

वितरण मुक्त प्रवेशांचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांनुसार आयोगाने मान्यता दिलेल्या अतिरिक्त अधिभाराच्या माध्यमातून वितरण परवानाधारकाला मिळालेल्या रकमा, अशा वितरण परवानाधारकाच्या किरकोळ वीज पुरवठ्यासाठी वीज दराची परिगणना करताना, एकूण महसुली गरजेतून वजा करण्यात येतील.

**८७. वितरण हानी—**

८७.१ वितरण परवानाधारकाच्या, पारेषण-वितरण जोडणीच्या पातळीवरील वीज खरेदीच्या आवश्यकतेची परिगणना, विजेच्या विक्रीत आयोगाने मान्यता दिलेली वितरण हानी समायोजित करून करण्यात येईल :

परंतु असे की, आयोग, बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेतील आदेशाचा एक भाग म्हणून विनियम ९ नुसार वितरण हानीचा लक्ष्यांक ठरवून देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात वितरण परवानाधारक संबंधित वर्षाकरीता वितरण हानीचे तपशील क्षेत्र-निहाय सादर करील :

परंतु असेही की, क्षेत्र-निहाय वितरण हानीमध्ये प्रत्येक वितरण फ्रेंन्चायसीच्या परवाना क्षेत्रातील वितरण हानी संबंधित वर्षाकरीता वेगळी निर्देशित करण्यात येईल.

**८८. किरकोळ वीज पुरवठ्याच्या वीज दराचे निश्चितीकरण—**

८८.१ आयोग ग्राहकांचे वर्गीकरण, त्यांचा विद्युत भार घटक, पॉवर फॅक्टर, व्होल्टेज, विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कालावधीतील विजेचा एकूण वापर किंवा वीज पुरवठा हवा असलेली वेळ किंवा कोणत्याही क्षेत्राचे भौगोलिक स्थान, वीज पुरवठ्याचे स्वरूप आणि ज्या उद्देशासाठी पुरवठा हवा असेल तो उद्देश, यांच्या आधारे करील.

८८.२ वेगवेगळ्या वर्गवारीतील ग्राहकांकरिता किरकोळ वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दराचे निश्चितीकरण हे, वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च ज्याची परिगणना, मागील वर्षीच्या वसूल न केलेल्या महसुली तुटीच्या मर्यादेपर्यंत वसूल करावयाची प्रस्तावित महसुली तूटीसह, विनियम ७८ नुसार निश्चित केलेल्या त्या वर्षाच्या एकूण महसुली गरजेचे संबंधित वर्षातील एकूण विक्रीशी असलेल्या गुणोत्तराच्या आधारे, करण्यात येईल.

८८.३ आयोग, अधिनियमांतील तरतुदींना अनुसरून, वेगवेगळ्या ग्राहक वर्गवारीतील सरासरी वीज पुरवठ्याच्या खर्चाशी संबंधित क्रॉस-सबसिडी हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न करील.

८८.४ आयोग वीज दर निश्चित करताना वेगवेगळ्या व्होल्टेज पातळीवर होणारा वीज पुरवठ्याचा खर्च आणि ग्राहकांना वीज दर वाढीचा कमीत-कमी धक्का बसावा, या बाबी विचारात घेईल.

## भाग आय : महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकरिता (एमएसएलडीसी) शुल्क व आकार

**८९. व्याप्ती—**

या भागात समाविष्ट असलेले विनियम हे एमएसएलडीसीने १ एप्रिल २०१६ नंतर आकारावयाच्या करावयाच्या शुल्क व आकारांच्या निश्चितीकरणासाठी लागू राहतील.

**९०. भांडवल गुंतवणूक योजना—**

९०.१ एमएसएलडीसी, संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय एकूण महसुली गरजेचा एक भाग म्हणून, आयोगाने विहित केलेल्या कामकाजविषयक आवश्यकता आणि भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने किंवा कोणत्याही अन्य अशा वैधानिक प्राधिकरणाने राज्य भार प्रेषण केंद्राचे बळकटीकरण आणि रिंग फेन्सिंगशी संबंधित बाबींमध्ये लक्ष घालण्यासाठी गठीत केलेल्या विविध समित्यांच्या शिफारशींच्या आधारावर, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी सविस्तर भांडवल गुंतवणुकीची योजना, निधी उभारणीची योजना व भौतिक लक्ष्यांक, आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करील.

९०.२ भांडवल गुंतवणूक योजना गुंतवणूक करण्यासाठीच्या किमान खर्चाच्या योजना असतील आणि त्यामध्ये रु. एक कोटीपेक्षा अधिक रकमेच्या किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येऊ शकेल अशा अन्य रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या प्रकल्पांचा समावेश असेल आणि ते आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यामध्ये असतील.

९०.३ भांडवली गुंतवणूक योजनेसोबत, प्रस्तावित गुंतवणुकीची गरज दर्शविणारी, विचारात घेतलेले पर्याय, खर्च-लाभ विश्लेषण आणि एमएसएलडीसीच्या शुल्क व आकारांवर परिणाम करू शकणाऱ्या अन्य अशा बाबींची, महिती, तपशील व दस्तावेज, सोबत जोडण्यात येतील.

९०.४ आयोग, प्रस्तावित खर्चाची आवश्यकता आणि एमएसएलडीसीच्या शुल्क व आकारांवर होणारा संभाव्य परिणाम या बाबी विचारात घेऊन, एमएसएलडीसीकडून संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय एकूण महसुली गरजेसह सादर करण्यात आलेली भांडवली गुंतवणूक योजना, विचारात घेईल.

९०.५ एमएसएलडीसी, एकूण महसुली गरजेच्या निश्चितीकरणाच्या याचिकेसह, किंवा मध्यावधी कामगिरीच्या आढाव्यासाठीच्या याचिकेसह, जसे असेल तसे, भांडवली खर्चाच्या प्रकल्पांची प्रगती दर्शविणारा तपशील, त्यासह आयोगाला अशा प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक असणारी अशी अन्य माहिती, तपशील किंवा दस्तावेज, सादर करील.

**९१. एलडीसी विकास निधी—**

आयोग, त्यास उचित वाटतील अशा प्रयोजनासाठी आणि उत्पन्नाच्या अशा स्त्रोतांमधून, एमएसएलडीसीला त्यांनी सादर केलेल्या याचिकेवर, एक वेगळा विकास निधी स्थापन करण्यास आणि ठेवण्यास परवानगी देऊ शकेल.

**९२. एमएसएलडीसीकरिता वार्षिक स्थिर आकार—**

एमएसएलडीसीने आकारावयाच्या वार्षिक स्थिर आकारांच्या वसुलीमधून एमएसएलडीसीची नियंत्रण कालावधीतील संबंधित वर्षाकरीता एकूण महसुली गरज भागविता येईल, जी आयोगाने मान्यता दिल्यानुसार वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नाच्या रकमेने कमी करण्यात येईल. यामध्ये खालील घटक असतील :—

(ए) संचालन व देखभाल खर्च ;

(बी) प्रादेशिक भार प्रेषण केंद्र (आरएलडीसी) शुल्क आणि पश्चिम विभाग विद्युत समिती (डब्ल्युआरपीसी) आकार ;

(सी) घसारा ;

(डी) कर्ज भांडवलावरील व्याज ;

(इ) खेळत्या भांडवलावरील व्याज ;

(एफ) भाग भांडवलावरील परतावा ;

(जी) निर्माते/पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना अदा केलेले रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार ;

(एच) आयकर ;

**वजा :**

(आय) मुक्त प्रवेश आकारांपासून उत्पन्न ;

(जे) रिॲक्टिव्ह ऊर्जा आकारांपासूनचे उत्पन्न ;

(के) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न :

परंतु असे की, या विनियमांतील **भाग-डी** मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तरतुदींनुसार एमएसएलडीसीकरिता घसारा, कर्जावरील व्याज आणि भागभांडवलावरील परतावा अनुज्ञेय राहील :

परंतु आणखी असे की, मागील कालावधीतील उत्पन्न/खर्चाला लेखापरीक्षित लेख्यांवर आधारीत अचूक समायोजनाच्या वेळी, प्रकरण-निहाय तत्त्वावर, काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, आयोगाकडून मान्यता देण्यात येईल :

परंतु असेही की, एमएसएलडीसीने त्यांच्यावरील बंधनांची पूर्तता न केल्यामुळे किंवा नुकसानामुळे, आयोग आणि न्यायालयांच्या आदेशांच्या परिणामस्वरूप, अन्य व्यक्ती/संस्थेला देय असणाऱ्या दंड व भरपाईपोटी द्याव्या लागणाऱ्या रकमांना एकूण महसुली गरजेतून वसूल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु असेही की, अशा दंड व नुकसानभरपाईपोटी एमएसएलडीसीकडून अदा केलेल्या किंवा देय असलेल्या रकमांचा, असल्यास, एमएसएलडीसी वेगळा तपशील ठेवील, आणि हा तपशील आयोगास या विनियमांतर्गत दाखल करावयाच्या याचिकेसोबत सादर करील.

**९३. संचालन व देखभाल खर्च—**

९३.१ एमएसएलडीसीकरिता संचालन व देखभाल खर्चाची परिगणना या विनियमांनुसार करण्यात येईल.

९३.२ दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या तीन वर्षांच्या अचूक समायोजन केलेल्या संचालन व देखभालीवर झालेल्या प्रत्यक्ष खर्चामध्ये कार्यक्षमतेतील वाढ/घटीचा हिस्सा, वाढवून/कमी केल्यानंतर येणाऱ्या सरासरीच्या आधारे संचालन व देखभाल खर्च काढण्यात येतील व त्यामधून संचालन व देखभालीवर झालेले असाधारण खर्च, असल्यास, आयोगाच्या काळजीपूर्वक छाननीच्या अधीन राहून, वगळण्यात येतील.

९३.३ अशा संचालन व देखभाल खर्चाची सरासरी ही ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील संचालन व देखभाल खर्च म्हणून विचारात घेण्यात येईल आणि त्यामध्ये, १ एप्रिल २०१५ रोजी सुरू होणाऱ्या आधारभूत वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च काढण्यासाठी, ५.७२ % वृद्धी दराने वाढ करण्यात येईल.

९३.४ पुढील प्रत्येक वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्च, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता निश्चित केलेला आधारभूत खर्चास, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार यांच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर मागील वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) मागील वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने, विचारात घेऊन व त्यानंतर त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का कमी करून, वाढविण्यात येऊन, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता अनुज्ञेय संचालन व देखभाल खर्च काढता येतील :

परंतु असे की, आयोगाकडून वेळोवेळी वेगवेगळा कार्यक्षमता घटक ठरवून देता येईल :

परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीतील वेगवेगळ्या वर्षाकरिता संचालन व देखभाल खर्चांचे अचूक समायोजन करताना, चलन-वाढीचा घटक, भारत सरकारच्या आर्थिक सल्लागार याच्या कार्यालयानुसार घाऊक किंमत निर्देशांक संख्येवर संबंधित वर्षात प्रत्यक्ष बिंदू ते बिंदू चलन-वाढ ६० टक्के भारांकनाने आणि भारत सरकारच्या श्रम संस्थेनुसार औद्योगिक कामगारांसाठी (सर्व भारतातील) संबंधित वर्षात प्रत्यक्ष ग्राहक किंमत निर्देशांक ४० टक्के भारांकनाने व त्यातून कार्यक्षमता घटकासाठी १ टक्का किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशा अन्य कोणत्याही मूल्याने कमी करून, विचारात घेण्यात येईल.

**९४. आरएलडीसीचे शुल्क आणि डब्ल्यूआरपीसी आकार—**

९४.१ केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संबंधित आदेशानुसार, एमएसएलडीसीने देय असलेल्या आरएलडीसीच्या शुल्क व आकारांची वसुली, एमएसएलडीसीला आयोगाने मान्यता दिलेल्या शुल्क व आकारांमधून करण्यास परवानगी देण्यात येईल.

९४.२ डब्ल्यूआरपीसीच्या सचिवालयाला देय असलेल्या डब्ल्यूआरपीसी आकारांची वसुली एमएसएलडीसीला आयोगाने मान्यता दिलेल्या शुल्क व आकारांमधून करण्यास परवानगी देण्यात येईल.

९४.३ एमएसएलडीसीला मध्यावधी आढाव्याच्या किंवा अचूक समायोजनाच्या वेळी अशा आकारांचा भरणा केल्याचा कागदोपत्री पुरावा द्यावा लागेल :

परंतु असे की, मान्यता दिलेले आरएलडीसी शुल्क व आकार आणि डब्ल्यूआरपीसीचे आकार आणि एमएसएलडीसीने प्रत्यक्षात अदा केलेले आकार यांमधील तफावत, लेखापरीक्षित लेख्यांनुसार अचूक समायोजनाच्या वेळी, काळजीपूर्वक छाननीस अधीन राहून आणि आयोगाला उचित वाटतील असे अन्य घटकांसह विचारात घेण्यात येईल.

**९५. वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न—**

एमएसएलडीसीकरिता शुल्क व आकार निश्चित करताना एमएसएलडीसीला आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दराव्यतिरिक्त उत्पन्नाची रक्कम एकूण महसुली गरजेतून वजा करण्यात येईल :

परंतु असे की, एमएसएलडीसी त्यांच्या वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या अंदाजाचा संपूर्ण तपशील आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आयोगाला सादर करील.

९५.२ वीज दराव्यतिरिक्तच्या उत्पन्नामध्ये खालील घटकांचा समावेश असेल :—

(ए) भंगार विक्रीपासून मिळणारे उत्पन्न ;

(बी) गुंतवणुकांपासून मिळणारे उत्पन्न ;

(सी) पुरवठादार/ठेकेदारांना दिलेल्या अग्रिमावरील व्याज ;

(डी) कर्मचारी निवासस्थानांच्या भाड्यापोटी मिळणारे उत्पन्न ;

(इ) निविदा दस्तावेजांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न ;

(एफ) वीज दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्न ;

परंतु असे की, एमएसएलडीसीच्या भागभांडवलावरील परताव्यापासून केलेल्या गुंतवणुकीतून प्राप्त झालेले व्याज वीज दरा व्यतिरिक्तच्या उत्पन्नात समाविष्ट करण्यात येणार नाही.

**९६. एमएसएलडीसी आकारांची वाटणी—**

९६.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी देय असलेल्या एमएसएलडीसी आकारांची परिगणना खालील सूत्रांनुसार करण्यात येईल :–

$$AFC(u)_{(t)} = AFC_{(t)} \text{ X } ([\text{Base TCR}(u)]_{(t)} / \sum_{i=1}^{n} [\text{Base TCR}(u)]_{(t)})$$

जेथे,

$AFC(u)_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ लाभधारकांमध्ये विभागणी करावयाचे एमएसएलडीसी आकार ;

$AFC(t)$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ लाभधारकांमध्ये विभागणी करावयाचे एकूण एमएसएलडीसी आकार ;

$\text{Base TCR } (u) = [CPD(u)_{(t)} + NCPD(u)_{(t)}] /2$

जेथे

बेस पारेषण क्षमता हक्क, हे प्रत्येक लाभधारकाचे (u) वार्षिक कालावधीतील $_{(t)}$ बेस पारेषण क्षमता हक्क दाखवितात.

$CPD(u)_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ लाभधारकाच्या एकाच वेळी असलेल्या (कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणीची सरासरी :

$NCPD(u)_{(t)}$ = वार्षिक कालावधीकरिता$_{(t)}$ लाभधारकाच्या एकाच वेळी नसलेल्या (नॉन-कोइन्सिडंट) सर्वोच्च मागणीची सरासरी :

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी बेस पारेषण क्षमता हक्कांच्या परिगणनेसाठी सरासरी मासिक सीपीडी आणि एनसीपीडी च्या ऐवजी संपूर्ण दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी वाटप केलेली क्षमता, त्यातून अंशतः दीर्घ-कालिन उपयोगकर्ते वगळून, विचारात घेण्यात येईल.

९६.२ एका वर्षासाठी मान्यता दिलेल्या एमएसएलडीसी आकारांची वर्षाच्या १२ महिन्यांमध्ये समान विभागणी करण्यात येईल आणि एमएसएलडीसीकडून एमएसएलडीसी आकारांची प्रति मेगावॅट प्रति महिना परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :—

मासिक एमएसएलडीसी आकार (रु./मेगावॅट/महिना)

$$= [AFC(u)_{(t)} \div \sum_{i}^{n} = 1 \; [Base\ TCR(u)]_{(t)}] \div 12$$

९६.३ मुक्त प्रवेश ग्राहकांना, विनियम ९६.१ आणि ९६.३ मध्ये समाविष्ट असलेले मुक्त प्रवेश ग्राहक वगळून, संबंधित देयक कालावधीतील ज्या कालावधीकरिता मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला असेल त्या कालावधीकरिता एमएसएलडीसी आकारांचा भरणा करण्यास ते यथा-प्रमाणात जबाबदार राहतील.

९६.४ या विनियमांनुसार आयोगाकडून आकारांना मान्यता मिळेपर्यंत १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या कालावधीसाठी आयोगाने मान्यता दिलेल्या आणि ३१ मार्च २०१६ रोजी लागू असलेल्या वीज दराने एमएसएलडीसीकडून वसूल करावयाच्या आकारांची देयक आकारणी चालू ठेवण्यात येईल.

**९७. एमएसएलडीसीने आकारावयाचे शुल्क—**

९७.१ आयोगाने वेळोवेळी मान्यता दिल्यानुसार एमएसएलडीसी खालील शुल्क वसूल करील :—

(ए) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या सर्व उपयोगकर्त्यांकडून प्रति जोडणीकरिता नोंदणी किंवा जोडणी शुल्क ;

(बी) राज्यांतर्गत अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांसाठी प्रति दिवशी शेड्युलिंग शुल्क ;

(सी) डे-अहेड तत्त्वावर एमएसएलडीसी कडून अंतिम शेड्युल तयार करण्यात आल्यानंतर या शेड्युलमधील प्रत्येक सुधारणेसाठीचे किंवा राज्य ग्रिड संहितेच्या आवश्यकतांप्रमाणे शेड्युल सादर न करण्यासाठीचे री-शेड्युलिंग शुल्क ;

(डी) अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या अर्जाचे प्रक्रिया शुल्क ;

(इ) आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेले कोणतेही अन्य शुल्क.

९७.२ अशा शुल्कापासून मिळणारा महसूल, तो एलडीसी विकास निधीचा भाग बनत नसेल तर, पुढील वर्षांमध्ये वार्षिक स्थिर आकारांच्या समायोजनासाठी विचारात घेण्यात येईल.

**९८. देयक तयार करणे व आकारांचा भरणा—**

९८.१ मागील महिन्यातील एमएसएलडीसी आकारांसाठी महिन्याच्या पहिल्या कामाच्या दिवशी एमएसएलडीसी प्रत्येक दीर्घ-कालिन लाभधारक आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकाला एमएसएलडीसी आकारांचे मासिक देयक पाठवील.

९८.२ एमएसएलडीसी आकारांसाठीचे मासिक देयक दीर्घ-कालिन लाभधारक आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकांकडून देयक प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत देय राहील.

## भाग-जे : राज्य शासनाने सबसिडी देणे बाबत

**९९. राज्य शासनाने सबसिडी मंजूर करण्याची पद्धत—**

९९.१ राज्य शासनास कोणत्याही ग्राहकास किंवा ग्राहकांच्या वर्गवारीस आयोगाने निश्चित केलेल्या वीज दरात कोणतीही सबसिडी द्यावयाची असेल तर राज्य शासन, आयोगाला पूर्व-सूचना देऊन, सबसिडी दिल्याने बाधित होणाऱ्या वितरण परवानाधारकास/व्यक्तीस भरपाईची रक्कम या विनियमांत विहित केलेल्या पद्धतीनुसार, आगाऊ अदा करील.

९९.२ राज्य शासनाने सबसिडी द्यावयाची ठरविलेली रक्कम राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरूपात देण्यात येईल.

९९.३ राज्य शासनाने वितरण परवानाधारकाची एकूण गरज असलेली सबसिडीची रक्कम ज्या प्रमाणात अदा केली असेल त्या प्रमाणात सबसिडीची रक्कम पात्र ग्राहकांच्या वीज देयकात जमा करण्यात येईल :

परंतु असे की, चुकीच्या अंदाजामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे सबसिडी प्रत्यक्ष देण्यात जर काही तूट आली तर ही तूट ग्राहकांच्या देयकात स्पष्टपणे दाखविण्यात येईल आणि ती, जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत किंवा संपेपर्यंत, संबंधित पात्र ग्राहकांमध्ये यथा-प्रमाणात विभागण्यात येईल.

९९.४ वितरण परवानाधारक ग्राहकांच्या देयकात खालील तपशील स्पष्टपणे दाखवेल :—

(ए) आयोगाने निश्चित केलेला वीज दर ;

(बी) राज्य शासनाच्या सबसिडीची रक्कम, त्याचा दर व कालावधी ;

(सी) निव्वळ देय रक्कम.

**भाग के : संकीर्ण**

**१००. कार्य-प्रणाली निर्देश—**

या विनियमांची अंमलबजावणी करण्यासाठी, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, आयोग, वेळोवेळी, कार्य-प्रणाली निर्देश निर्गमित करू शकेल.

**१०१. दुरुस्ती करण्याचे अधिकार—**

आयोग कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, फेरबदल किंवा सुधारणा करू शकेल.

**१०२. अडचणी दूर करण्याचे अधिकार—**

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना जर कोणतीही अडचण आली तर, आयोग, साधारण किंवा विशिष्ट आदेशाने, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसणाऱ्या, तरतुदी करू शकेल.

## जोडपत्र - १

## घसाऱ्याची अनुसूची

| | मत्तांचा तपशील | | घसारा (सरळ रेषा पद्धतीने) % |
|---|---|---|---|
| ए. | पूर्णपणे मालकीची असलेली जागा | | - |
| बी. | भाडेपट्ट्यावर (लीजवर) घेतलेली जागा | | - |
| (ए) | जागेतील गुंतवणुकीसाठी | | ३.३४% |
| (बी) | जागा साफ करण्याच्या खर्चासाठी | | ३.३४% |
| (सी) | जल-विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत रिझर्वायरसाठी जागा | | ३.३४% |
| सी. | नवीन खरेदी केलेल्या मालमत्ता : | | |
| (ए) | विद्युत निर्मिती केंद्रातील प्लँटच्या पायासह प्लँट व मशिनरी | | |
| | (एक) | जल-विद्युत | ५.२८% |
| | (दोन) | बाष्प-विद्युत | ५.२८% |
| | एन एच आर एस आणि वाया जाणारी उष्णता परत मिळविणारे बॉयलर्स/प्लँट्स | | |
| | (तीन) | डिझेल-विद्युत आणि गॅस प्लँट्स | ५.२८% |
| (बी) | कुलिंग टॉवर्स आणि सर्कुलेटिंग पाण्याची यंत्रणा | | ५.२८% |
| (सी) | जल-विद्युत यंत्रणेचा भाग असलेली खालील कामांसह जलशक्तीवर चालणारी कामे :- | | |
| | (एक) | धरणे, स्पिल-वेज, विअर्स, कालवे, रिइनफोर्सड कॉंक्रिट फ्ल्युम्स ॲन्ड सिफोन्स | ५.२८% |
| | (दोन) | रि-इनफोर्सड कॉंक्रिट पाइपलाइन्स ॲन्ड सर्ज टॅन्क्स, स्टील पाइपलाइन्स, स्लुइस गेट्स, स्टील सर्ज (टॅन्क्स) हायड्रॉलिक कंट्रोल व्हॉल्व्हज ॲन्ड अदर हायड्रॉलिक वर्क्स | ५.२८% |
| डी. | कायम स्वरूपाची स्थापत्य व बांधकाम अभियांत्रिकी कामे | | |
| | (एक) | कार्यालये आणि शो-रूम्स | ३.३४% |
| | (दोन) | औष्णिक-विद्युत निर्मिती प्लँट्स असलेली | ३.३४% |
| | (तीन) | जल-विद्युत निर्मिती प्लँट्स असलेली | ३.३४% |
| | (चार) | लाकडी बांधकामांसारखी तात्पुरती कामे | १००% |
| | (पाच) | कच्च्या रस्त्यांशिवाय अन्य रस्ते | ३.३४% |
| | (सहा) | इतर | ३.३४% |
| इ. | ट्रान्सफॉर्मर्स, ट्रान्सफॉर्मर (किसॉक्स) उप-केंद्रांतील साहित्य व इतर स्थिर साधने (प्लँट्च्या पायासह) | | |
| | (एक) | १०० किलो व्होल्ट ॲंपिअर्स आणि त्या वरील क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर्स (पायासह) | ५.२८% |
| | (दोन) | इतर | ५.२८% |
| एफ. | केबल जोडण्यांसह स्विच-गिअर्स | | ५.२८% |
| जी. | वीज निरोधक | | |
| | (एक) | स्टेशन टाइप | ५.२८% |
| | (दोन) | पोल टाइप | ५.२८% |
| | (तीन) | सिन्क्रोनस कंडेन्सर | ५.२८% |

**घसाऱ्याची अनुसूची—**समाप्त

| | | मत्तांचा तपशील | घसारा (सरळ रेषा पद्धतीने) % |
|---|---|---|---|
| एच. | बॅटरीज | | ५.२८% |
| | (एक) | अंडरग्राऊंड केबल्स इन्क्लुडिंग जॉईंट बॉक्सेस अॅन्ड डिस्काउंटेड बॉक्सेस | ५.२८% |
| | (दोन) | केबल डक्ट सिस्टीम | ५.२८% |
| आय. | ओव्हरहेड लाइन्स इन्क्लुडिंग सपोर्टस | | - |
| | (एक) | लाइन्स ऑन फॅब्रिकेटेड स्टील ऑपरेटिंग अॅट नॉमिनल व्होल्टेज हायर दॅन ६६ केव्ही | ५.२८% |
| | (दोन) | लाइन्स ऑन स्टील सपोर्ट ऑपरेटिंग अॅट नॉमिनल व्होल्टेज हायर दॅन १३.२ किलोव्होल्ट्स बट नॉट एक्सिडिंग ६६ किलोव्होल्ट्स | ५.२८% |
| | (तीन) | लाइन्स ऑन स्टील ऑर रि-इन्फोर्सड् कॉन्क्रिट सपोर्टस | ५.२८ |
| | (चार) | लाइन्स ऑन ट्रिटेड वुड सपोर्टस | ५.२८% |
| जे. | मीटर्स | | ५.२८% |
| के. | स्वयं-चलित (सेल्फ प्रोपेल्ड) वाहने | | ९.५०% |
| एल. | वातानुकुलिन प्लँट | | |
| | (एक) | स्थिर | ५.२८% |
| | (दोन) | सहज हाताने नेता येण्याजोगा (पोर्टेबल) | ९.५०% |
| एम. | | | |
| | (एक) | कार्यालयीन फर्निचर आणि फिटिंग्स | ६.३३% |
| | (दोन) | कार्यालयीन साधन-सामग्री | ६.३३% |
| | (तीन) | फिटिंग्स आणि साधनांसह अंतर्गत वायरिंग | ६.३३% |
| | (चार) | रस्त्यांवरील दिव्यांची फिटिंग्स | ५.२८% |
| एन. | भाड्यावर दिलेली साधने | | |
| | (एक) | मोटर्स शिवाय अन्य साधने | ९.५०% |
| | (दोन) | मोटर्स | ६.३३% |
| ओ. | संदेशवहन-साधने | | |
| | (एक) | रेडिओ आणि उच्च वारंवारता वाहक यंत्रणा | ६.३३% |
| | (दोन) | दूरध्वनी वाहिन्या व दूरध्वनी | ६.३३% |
| | (तीन) | फायबर ऑप्टिक | ६.३३% |
| पी. | आय.टी. साधने | | १५.००% |
| क्यू | सॉफ्टवेअर | | ३०.००% |
| आर. | वर समाविष्ट नसलेली अन्य कोणतीही मत्ता | | ५.२८% |

## जोडपत्र - २

## एका महिन्यासाठी पारेषण यंत्रणा उपलब्धतेची परिगणना करण्याची कार्यपद्धती

१. एका कॅलेंडर महिन्यातील पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना संबंधित पारेषण परवानाधारकाकडून प्रत्येक एसी आणि एचव्हीडीसी पारेषण यंत्रणेकरिता वेगवेगळी करण्यात येईल आणि एमएसएलडीसीकडून प्रमाणित करण्यात येईल. पारेषण यंत्रणा उपलब्धतेच्या परिगणनेच्या प्रयोजनाकरिता :—

(एक) एसी पारेषण वाहिन्या : प्रत्येक एसी पारेषण वाहिनीचे सर्कीट एक भाग म्हणून विचारात घेण्यात येईल.

(दोन) आंतर-जोडणी ट्रान्सफॉर्मर्स (आयसीटी) : प्रत्येक आयसीटी बँक (थ्री सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर एकत्र) एक भाग बनेल.

(तीन) स्टॅटिक व्हीएआर कॉम्पेनसेटर (एसव्हीसी) : एसव्हीसी ट्रान्सफॉर्मरसह एसव्हीसी मिळून एक भाग बनेल. तथापि, ५० टक्के क्रेडीट इण्डक्टीव्ह आणि ५० टक्के कपॅसिटीव्ह रेटींगला देण्यात येईल.

(चार) बस रिॲक्टर्स/स्विचेबल लाईन रिॲक्टर्स : प्रत्येक बस रिॲक्टर्स/स्विचेबल लाईन रिॲक्टर्सला एक भाग म्हणून विचारात घेण्यात येईल.

(पाच) एचव्हीडीसी बाय-पोल लिंक्स : एचव्हीडीसी लिंकचा प्रत्येक पोल त्यासह त्याच्या दोन्ही टोकांचे संलग्न उपकरण एक भाग म्हणून विचारात घेण्यात येईल.

(सहा) एचव्हीडीसी बॅक-टू-बॅक स्टेशन : एचव्हीडीसी बॅक-टू-बॅक स्टेशनचा प्रत्येक गट एक भाग म्हणून विचारात घेण्यात येईल. जर संलग्न एसी वाहिनी (एचव्हीडीसी बॅक-टू-बॅक स्टेशनच्या माध्यमातून आंतर-प्रादेशिक विजेच्या हस्तांतरणासाठी आवश्यक) उपलब्ध नसेल तर, एचव्हीडीसी बॅक-टू-बॅक स्टेशन गट देखील अनुपलब्ध म्हणून विचारात घेण्यात येईल.

२. पारेषण यंत्रणेच्या एसी आणि एचव्हीडीसी भागाच्या उपलब्धतेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईल :—

एसी यंत्रणेसाठी उपलब्धता %

$$= \frac{o \text{ X } AVo + p \text{ X } AVp + q \text{ X } AVq + r \text{ X } AVr}{o + p + q + r} \text{ X } 100$$

एचव्हीडीसी यंत्रणेसाठी उपलब्धता %

$$= \frac{s \text{ X } AVs + t \text{ X } AVt}{s + t} \text{ X } 100$$

जेथे

o = ए सी वाहिन्यांची एकूण संख्या ;

AVo = ए सी वाहिन्यांच्या o संख्येची उपलब्धता ;

p = बस रिॲक्टर्स/स्विचेबल वाहिनी रिॲक्टर्सची एकूण संख्या ;

AVp = बस रिॲक्टर्स/स्विचेबल वाहिनी रिॲक्टर्सची p संख्येची उपलब्धता ;

q = आय सी टी ची एकूण संख्या ;

AVq = आय सी टी च्या q संख्येची उपलब्धता ;

r = एसव्हीसीची एकूण संख्या ;

AVr = एसव्हीसीच्या r संख्येची उपलब्धता ;

s = एचव्हीडीसी खांबांची एकूण संख्या ;

AVs = एचव्हीडीसी खांबांच्या s संख्येची उपलब्धता ;

t = एचव्हीडीसी बॅक-टू-बॅक स्टेशन ब्लॉकची एकूण संख्या ;

AVt = एचव्हीडीसी बॅक-टू-बॅक स्टेशन ब्लॉकच्या t संख्येची उपलब्धता ;

३. पारेषण भागाच्या प्रत्येक वर्गवारीसाठी भारांकित घटक (गुणक) खालीलप्रमाणे राहील :—

(ए) एसी वाहिनीच्या प्रत्येक सर्किटसाठी- सर्ज इम्पीडन्स लोडिंग (एस आय एल) भरपाई न दिलेल्या वाहिनीसाठी × सर्किट-किलोमीटर ;

विविध व्होल्टेज पातळ्या आणि कन्डक्टर कॉन्फिगरेशन्ससाठी एस आय एल दर्जा **परिशिष्ट-एक** मध्ये देण्यात आला आहे. तथापि, परिशिष्ट-१ मधील सूचित नसलेल्या विविध व्होल्टेज पातळ्या आणि कन्डक्टर कॉन्फिगरेशन्ससाठी, दीर्घ-कालिन पारेषण ग्राहक/डीआयसी यांना सूचित करून, तांत्रिक बाबींवर आधारीत उचित एसआयएलचा वापर करून, उपलब्धतेची परिगणना करण्यात येईल ;

भरपाई दिलेल्या एसी वाहिनीकरिता, एसआयएल हे महाराष्ट्र राज्य विद्युत समिती (एमएसपीसी)च्या सचिवालयाने, वाहिनीला दिलेली भरपाई विचारात घेऊन, दिलेल्या प्रमाणपत्रानुसार राहील ;

भरपाई दिलेल्या शंट (Shunt) वाहिनीकरिता, रिॲक्टर्सच्या ठिकाणानुसार एसआयएलचे घटीत मूल्य घेण्यात येईल. तसेच सेरीज भरपाईच्या वाहिन्यांच्या बाबतीत, भरपाईच्या टक्केवारीनुसार उच्च एसआयएल घेण्यात येईल ;

(बी) प्रत्येक एचव्हीडीसी खांबा करिता- प्रमाणित मेगावॅट क्षमता × सर्किट किलोमीटर ;

(सी) प्रत्येक आयसीटी बँककरिता - प्रमाणित एम व्ही ए क्षमता ;

(डी) एस व्ही सी करिता – प्रमाणित एम व्ही ए आर क्षमता (इंडक्टिव्ह आणि केपॅसीटीटीव्ह) ;

(इ) बस रिॲक्टर/ स्विचेबल लाईम रिॲक्टर्स करिता - प्रमाणित एम व्ही ए आर क्षमता ;

(एफ) दोन प्रांतिक ग्रिडसला जोडणारे एचव्हीडीसी बॅक टु बॅक स्टेशन - प्रत्येक ब्लॉकची प्रमाणित मेगावॅट क्षमता ;

४. पारेषण भागाच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना, भारांकित घटक (गुणक), त्या वर्गवारीतील प्रत्येक भागासाठी विचाराधीन असलेले एकूण तास आणि उपलब्ध नसलेले तास, यांच्या आधारे करण्यात येईल. पारेषण भागाच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीचे सूत्र **परिशिष्ट-दोन** मध्ये दिल्यानुसार आहे.

५. दुरुस्तीच्या कामासाठी खालील कारणांमुळे बंद असलेले पारेषण भाग उपलब्ध असल्याचे मानण्यात येईल :—

(एक) दुसऱ्या पारेषण योजनेच्या पारेषण भागांच्या देखभालीसाठी किंवा बांधकामासाठी बंद ठेवलेला कालावधी. जर दुसरी पारेषण योजना पारेषण परवानाधारकाची असेल तर एमएसएलडीसी, कामाचे स्वरूप लक्षात घेऊन, त्यास वाजवी वाटेल इतका हा मानीव उपलब्धता कालावधी, मर्यादित करू शकेल ;

(दोन) जास्त व्होल्टेज झाले असल्यास ते मर्यादित राखण्यासाठी पारेषण वाहिनी बंद करणे आणि एमएसएलडीसीच्या निर्देशाप्रमाणे स्वीच्ड रिॲक्टर्स हाताने बंद करणे.

६. पारेषणाच्या भागांची दुरुस्तीसाठी बंद असण्याची वेळ, खालील परिस्थितीत, विचाराधीन कालावधीकरिता, भागाच्या असलेल्या एकूण वेळेतून वगळण्यात येईल :—

(एक) पारेषण परवानाधारकाच्या नियंत्रणा बाहेर असलेल्या दैवी प्रकोप किंवा दैवी आपत्तीच्या घटनांमुळे पारेषणाचे भाग दुरुस्तीकरिता बंद असणे. तथापि, त्या भागाचे दुरुस्तीकरिता बंद ठेवणे डिझाईनच्या अपयशामुळे नसून ते वरील घटनांमुळे होते, याबाबत एमएसएलडीसीची खात्री पटविण्याची जबाबदारी ही पारेषण परवानाधारकाची राहील. पारेषणाचे भाग पूर्ववत सुरू करण्यासाठी वाजवी कालावधी विचारात घेण्यात येईल आणि पारेषण परवानाधारकाने भाग पुर्ववत सुरू करण्यासाठी वाजवी कालावधीपेक्षा घेतलेल्या कोणत्याही जादा कालावधीचा संबंध, हा पारेषण परवानाधारकाशी जोडण्यात येईल. ईआरएस (इमर्जन्सी रिस्टोरेशन सिस्टीम) द्वारा पूर्ववत केलेले सर्किट्स हे उपलब्ध असल्याचे म्हणून विचारात घेण्यात येईल ;

(दोन) पारेषण परवानाधारकाशी संबंध जोडता येणार नाही अशा ग्रिडमधील घटनेमुळे/अडथळ्यांमुळे उद्‌भवलेला दुरुस्तीसाठी बंदचा कालावधी, उदा. अन्य एजन्सीच्या मालकीच्या असलेल्या उप-केंद्रांतील किंवा बे मधील दोषांमुळे पारेषण परवानाधारकाचे पारेषणाचे भाग दुरुस्तीकरिता बंद ठेवणे, ग्रिडमधील अडथळ्यांमुळे वाहिन्या, आयसीटीज, एचव्हीडीसी इ. खंडीत होणे. तथापि, ग्रिडमधील घटना/अडथळ्यांनंतर यंत्रणा पूर्व स्थितीत आणत असताना जर, आरएलडीसीकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर वाजवी वेळेत भाग पूर्वस्थितीत आणण्यात आला नाही तर, आरएलडीसीकडून पूर्व स्थितीत आणावयाच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर तो भाग, दुरुस्तीसाठी बंद असण्याच्या कालावधीत उपलब्ध नाही, म्हणून विचारात घेण्यात येईल.

## परिशिष्ट – एक

## एसी वाहिन्यांचे सर्ज इम्पिडन्स लोडिंग (एसआयएल)

| अनु. क्र. | वाहिनीचे व्होल्टेज (केव्ही) | कण्डक्टरचे कॉन्फ्युगरेशन | एस आय एल (मेगावॅट) |
|---|---|---|---|
| १ | ७६५ | Quad Bersimis | २२५० |
| २ | ४०० | Quad Bersimis | ६९१ |
| ३ | ४०० | Twin Moose | ५१५ |
| ४ | ४०० | Twin AAAC | ४२५ |
| ५ | ४०० | Quad Zebra | ६४७ |
| ६ | ४०० | Quad AAAC | ६४६ |
| ७ | ४०० | Triple Snowbird | ६०५ |
| ८ | ४०० | ACKC(500/26) | ५५६ |
| ९ | ४०० | Twin ACAR | ५५७ |
| १० | २२० | Twin Zebra | १७५ |
| ११ | २२० | Single Zebra | १३२ |
| १२ | १३२ | Single Panther | ५० |
| १३ | ६६ | Single Dog | १० |

## परिशिष्ट - दोन

## पारेषण भागाच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेच्या परिगणनेसाठी सूत्र

$AV_o$(Availability of *o* no. of AC lines) $= \sum_{i=1}^{o} \frac{Wi(Ti - T_{NA}i)}{Ti} \Big/ \sum_{i=1}^{o} Wi$

AVs(Availability of s no. of HVDC pole) $= \sum_{j=1}^{s} \frac{Wj(Tj - TNAj)}{Tj} \Big/ \sum_{j=1}^{s} Wj$

$AV_q$(Availability of *q* no. of ICTs) $= \sum_{K=1}^{q} \frac{Wk(Tk - T_{NA}k)}{Tk} \Big/ \sum_{k=1}^{q} Wk$

$AV_r$(Availability of r no. of SVCs) $= \left[\sum_{l=1}^{r} \frac{0.5W_Il\,(T_Il - T_{NAI}l)}{T_Il} + \sum_{l=1}^{r} \frac{0.5\,W_Cl(T_Cl - {}_{AC}l)}{T_Cl}\right] \Big/ \left[\sum_{l=1}^{r} 0.5W_Il + \sum_{l=1}^{r} 0.5\,W_Cl\right]$

AV*p*(Availability of *p* no. of Switched Bus reactors) $= \sum_{m=1}^{p} \frac{Wm(Tm - T_{NA}m)}{Tm} \Big/ \sum_{m=1}^{p} Wm$

AVt (Availability of t no. of HVDC Back-to-back Blocks) $= \sum_{n=1}^{t} \frac{Wn(Tn - T_{NA}n)}{Tn} \Big/ \sum_{n=1}^{t} Wn$

| | | | |
|---|---|---|---|
| Where | W*i* | = | Weightage factor for $i^{th}$ transmission line |
| | Wj | = | Weightage factor for $j^{th}$ HVDC pole |
| | W*k* | = | Weightage factor for $k^{th}$ ICT |
| | $W_Il$&$W_Cl$ | = | Weightage factors for inductive & capacitive operation of $l^{th}$ SVC |
| | Wm | = | Weightage factor for $m^{th}$ bus reactor |
| | Wn | = | Weightage factor for $n^{th}$ HVDC back to back block. |

$Ti$, Tj, $Tk$, $T_Il$, $T_Cl$, $Tm$&$Tn$ = The total hours of $i^{th}$ AC line,$j^{th}$ HVDC pole, $k^{th}$ ICT, $l^{th}$ SVC (Inductive Operation), $l^{th}$ SVC (Capacitive Operation),$m^{th}$ Switched Bus Reactor &$n^{th}$ HVDC back-to-back block during the period under consideration (excluding time period for outages not attributable to Transmission Licensee for reasons given in Para 6 of the procedure)

| | |
|---|---|
| $T_{NA}i$ ,$T_{NA}j$ , $T_{NA}k$ = $T_{NA}m$, | The non-availability hours (excluding the time period for $T_{NAI}l$, $T_{NAC}l$, outages not attributable to transmission Licensee taken as $T_{NA}n$, deemed availability as per Para 5 of the procedure) for $i^{th}$ AC line, . $j^{th}$ HVDC pole, $k^{th}$ ICT, $l^{th}$ SVC (Inductive Operation), $l^{th}$ SVC (Capacitive Operation), $m^{th}$ Switched Bus Reactor and $n^{th}$ HVDC back-to-back block. |

**अश्वनी कुमार,**

सचिव,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,

दिनांक ८ डिसेंबर २०१५.